मराठी अस्मितेचा आवाज बुलंद करण्याचे कार्य गेली २७ वर्षे करणारे 'दैनिक वृत्तमानस' आता घरोघरी पोचवण्याचे काम आम्ही करणार आहोत. वाचकांना आमच्या लोकप्रिय दैनिकाची प्रत उपलब्ध होत नसेल तर या दूरध्वनींवर संपर्क साधावा.
**दातार अँड सन्स न्युज पेपर डिस्ट्रिब्युटर्स**
भ्रमणध्वनी - ८६५५१९४४५२, ८५९१६६२६१६,९८६७३०८०६३

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://epapervrittamanas. in/

# वृत्तमानस



गुजरातमध्ये पुरामुळे 15 जणांचा मृत्यू

पान ४

Email : vrittamanas1@gmail. com | मुंबई/ पालघर | मुंबई, गुरुवार, २९ ऑगस्ट २०२४ | वर्ष- २९ | अंक - ७० | पाने- ८ | आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

## प्रासंगिक

## सिंधुदुर्गात अराजक...



**सिंधुदुर्गात** राडे गेल्या तीस-पस्तीस वर्षांपासून होतच आहेत. त्यामुळे राडा होणे हे काही नवे नाही. तसा तो आज झाला. परंतु गेली काही वर्षे तळकोकण बऱ्यापैकी शांत होते. पण आज मालवणच्या सागरकिनारी अक्षरशः दंगल झाली. दोन्ही गटांच्या कार्यकर्त्यांमध्ये मारामारी झाली. पोलीसही जखमी झाले. सध्याचे राजकारण बघता येत्या काळात लोकांना कोकणात शब्दश: 'धुमशान' बघायला मिळण्याची शक्यता आहे. इथे मूळ प्रश्न आहे प्रशासनाच्या नाकर्तेपणाचा. आधीच 'सार्वजनिक बांधकाम'च्या कर्तृत्वामुळे महाराजांचा पुतळा कोसळला आणि आता नाकर्त्या प्रशासनामुळे पुन्हा प्रचंड तणाव जिल्ह्याने अनुभवला. आठ दिवसांवर गणेशोत्सव आहे. त्यानंतर विधानसभा निवडणूक लागेल. त्यामुळे आगामी काळात प्रशासनाची मोठी परीक्षा आहे. आता जिल्ह्यात असलेले प्रशासन पूर्णतः पांगळं असल्याचं आजच्या घटनेवरुन दिसून आलं. जिल्हाधिकारी किशोर तावडे व पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल यांचा प्रशासनावर कुठलाही वचक दिसून आला नाही. आज जिल्ह्यात दोन्ही विरोधी पक्षनेते व तीन पक्षांचे वरिष्ठ नेते येणार होते. त्यामुळे प्रशासन सज्ज पाहिजे होतं. परंतु कुठलीही तत्परता दाखवली गेली नाही आणि त्याचा व्हायचा तोच दुष्परिणाम झाला. जिल्ह्याला पुन्हा दंगल अनुभवायला मिळाली. कोकण आणि सिंधुदुर्गाचा इतिहास तसा शांततेचा आहे. गेल्या काही वर्षांतील राजकीय राडे सोडले तर या जिल्ह्यात महाराष्ट्रात सर्वात कमी गुन्हे घडतात. पण राणे आणि राजकीय राडे हे समीकरण गेल्या कित्येक वर्षांपासून महाराष्ट्र अनुभवत आहे. मल्लिकार्जुन प्रसन्ना हे तत्कालिन पोलीस अधिक्षक सोडले तर जिल्ह्यात आलेल्या जवळपास सर्व अधिक्षकांनी राणेंच्या प्रभावाखालीच काम केले. शिवसेनेनेही वेळोवेळी राणेंच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली होती. तशी ती आजही घेतली गेली. मुळात महाराजांचा पुतळा कोसळणे, ही दुर्दैवी घटना होती. त्यामुळे विरोधक आक्रमक होणारच होते. या कारणास्तव पोलिसांनी दक्ष रहाणे गरजेचे होतं. परंतु ही दक्षता कुठेच दिसली नाही. खरं म्हटलं तर गेले दोन दिवस राणे शांत होते. परंतु पुतळा कोसळण्याच्या घटनेचं 'मायलेज' विरोधकांना घेऊ द्यायचं नाही, या हेतूने आज राडा झाल्याची शक्यता वरकरणी तरी दिसत आहे. एकतर सत्ताधाऱ्यांनी कितीही नाकारलं तरी पुतळा कोसळण्याच्या घटनेमुळे दिल्लीपासून गल्लीपर्यंत खळबळ उडाली आहे. त्यात थेट मुख्यमंत्री पुत्राचे 'कनेक्शन' समोर येत असल्याने व पंतप्रधानांच्या हस्ते या पुतळ्याचे लोकार्पण झाल्याने भाजप व शिंदेंवर प्रचंड 'प्रेशर' आहे. येत्या काही दिवसांत या प्रकरणात अजून काही गौप्यस्फोट होण्याची शक्यता आहे. आधीच तेथील बांधकाम विभाग प्रशासन वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. आता पोलीस प्रशासनाचा डरपोकपणाही समोर आला आहे. आजच्या राड्यामुळे जिल्ह्यात पुन्हा तणावाचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता असून काही वर्षांपूर्वी झालेल्या 'वेंगुर्ला एपिसोड'ची पुनरावृत्ती म्हणावी लागेल. गेल्या दोन दशकात 'ठाकरे विरोध' हाच राणेंच्या राजकारणाचा पाया राहिला आहे. भाजप राणेंचा यासाठी पुरेपूर उपयोग (का दुरुपयोग) करून घेत आहे. आज राणे कुठल्याही मंत्रीपदी नाहीत. पण लोकानियुक्त खासदार आहेत. त्यामुळे ते त्यांच्या 'स्टाईल'ने आंदोलन करणार, याची कल्पना जिल्हा प्रशासनाला येणं गरजेचं होतं. पण ज्युनिअर राणेंनी काही महिन्यापूर्वी 'सागर'वर आपला साहेब बसलाय, असं वक्तव्य जाहीर सभेत केलं होतं. त्याचाच दबाव पोलिसांवर होता की काय, हेही समोर आलं पाहिजे. एकेकाळी मुख्यमंत्रीपद भूषविलेल्या राणेंनी आज पोलीस व कॅमेऱ्यासमोर थेट धमकीच दिली. ठाकरे शिवसेना व राणेंच्या भाजपचा हा 'सामना' अजून कितीकाळ चालणार, हे येणारा काळच ठरवेल. बदलापूर असेल किंवा अन्य कारणांमुळे आधीच गृहविभाग विरोधकांच्या टार्गेटवर आहे. आता मालवणच्या राड्याचे नवे प्रकरण विरोधकांना मिळाले आहे. आता यापुढे राणे राडा करतील की लोकसभा निवडणुकीसारखी शांत भूमिका घेतील, हे येत्या काळात समजणार आहे.

**- शाम देऊलकर**

तळकोकणात राडा

# घरात घुसून मारुन टाकेन!

## माजी केंद्रीयमंत्री राणेंचा मालवणात थयथयाट

**मालवण**

छत्रपती शिवाजी महाराज यांचा राजकोट किल्ल्यावरील पूर्णाकृती पुतळा कोसळल्यानंतर महाराष्ट्राचे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांनी बुधवारी राजकोट किल्ल्याला भेट देऊन स्थितीचा आढावा घेतला. यावेळी ठाकरे शिवसेना व भाजप नेते नारायण राणे यांचे कार्यकर्ते समोरासमोर आले. त्यांच्यात मोठ्या प्रमाणात धक्काबुक्की झाली. नारायण राणे यांनी थेट मविआच्या कार्यकर्त्यांना घरात घुसून मारुन टाकण्याची उघड धमकी दिली. यामुळे तेथील स्थिती चांगलीच चिघळली.

- **'राजकोट'वर ठाकरे - राणेंचे कार्यकर्ते समोरासमोर**
- **शिवरायांच्या पुतळ्यावरुन तणाव**
- **मविआचे नेते पोलिसांच्या गराड्यात पडले किल्ल्याबाहेर**

भाजप नेते तथा माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे बुधवारी दुपारी 12 च्या सुमारास राजकोट किल्ल्यावर दाखल झाले. त्यावेळी त्यांच्यासोबत त्यांचे पुत्र माजी खासदार नीलेश राणेही उपस्थित होते. त्याचवेळी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवारही उपस्थित होते. त्यांनी नारायण राणे यांच्याशी हस्तांदोलनही केले. त्याचवेळी ठाकरे सेनेचे आमदार आदित्य ठाकरे राजकोटवर पोहोचले. त्यांच्यासोबत विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, माजी खासदार विनायक राऊत, आमदार वैभव नाईक उपस्थित होते. शरद पवार राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व मेहबूब शेखही यावेळी तिथे होते.

आदित्य ठाकरे राजकोटच्या प्रवेशद्वारापाशी येताच राणे समर्थकांनी त्यांच्याविरोधात घोषणाबाजी केली. त्यानंतर ठाकरे समर्थकांनीही प्रत्युत्तरादाखल घोषणाबाजी केली. यावेळी काही कार्यकर्त्यांनी एकमेकांना धक्काबुक्की केली.यामुळे किल्ल्यावर प्रचंड तणाव निर्माण झाला. या स्थितीतच आदित्य ठाकरे यांनी किल्ल्यावर जाऊन स्थितीची पाहणी केली. दुसरीकडे, नारायण राणे यांनीही यावेळी आक्रमक भूमिका घेतली. आम्ही या भागातील आहोत. बाहेरचे येथे येऊन दादागिरी करत असतील व पोलिस त्यांना संरक्षण देणार असतील तर आम्ही येथून अजिबात हलणार नाही. काय करायचे ते करा. आम्हाला गोळया घाला. असे आंडू-पांडू आम्ही खूप पाहिले, असे ते म्हणाले. राणे यांनी यावेळी एका वृत्तवाहिनीच्या पत्रकाराशी दमदाटी केली. मात्र एकेकाला घरातून खेचून रात्रीतून मारून टाकण्याच्या राणेंच्या जाहीर धमकीची चर्चा राजकिय वर्तुळात सुरु झाली आहे.



***आदित्य ठाकरेंना बाहेर काढा, निलेश राणेंचा इशारा***
*निलेश राणे म्हणाले, पोलिसांनी मला समजावून सांगू नये. आम्ही स्थानिक आहोत. अगोदर त्या आदित्य ठाकरे यांना बाहेर काढा. यावर पोलीस हतबल होऊन निलेश राणेंना समजावण्याचा प्रयत्न करत होते.*

***पेंग्विन व कोंबडीचोरच्या घोषणांवरुन घमासान***
*ठाकरे आणि राणे आमने-सामने आल्यानंतर कार्यकर्त्यांकडून जोरदार घोषणाबाजी सुरू झाली. नारायण राणे समर्थक आणि विनायक राऊत समर्थक आमने सामने आल्यानं राजकोट किल्ल्यासमोर घोषणाबाजी देत एकमेकांच्या अंगावर धावून जाण्याचा प्रसंग घडला. यावेळी आदित्य ठाकरे तिथे पोहोचले असता पेंग्विन, पेंग्विन अशा घोषणा देण्यात आल्या. त्यावर ठाकरे समर्थकांनी आम्ही कोंबड्या घेऊन आलो नाहीत, असे म्हणत राणेंना उद्देशून 'कोंबडीचोर'च्या घोषण्या देण्यात आल्या.*

## नितीन गडकरींनी मैदानात उतरावं!

### विधानसभेसाठी सक्रिय भूमिका बजावण्याचा संघाचा आग्रह

**नागपूर**

सध्याची राजकीय स्थिती आणि भाजपसमोर निर्माण झालेलं राजकीय आव्हान बघता केंद्रीय रस्ते आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरींनी आता विधानसभा प्रचारात काहीअंशी अधिक भूमिका बजावावी, अशी आग्रही मागणी केल्याची माहिती आहे. गडकरींचा विकासात्मक आणि तुलनेत मवाळ चेहरा तसंच मंत्री म्हणून केलेल्या कामासंदर्भात राज्यातल्या जनतेच्या मनात त्यांची प्रतिमा पाहता गडकरी हे महाराष्ट्र भाजपच्या मदतीचे ठरतील असं संघाला वाटतंय.



दरम्यान या संदर्भात भाजपकडून अजून अंतिम निर्णय झालेला नाही.

केंद्रातील मोदी सरकारमधील ज्या काही मोजक्या मंत्र्यानी स्वतःची वेगळी छाप सोडली आहे. नितीन गडकरी जे फक्त स्वतःच्या महाराष्ट्र राज्यापुरतं लोकप्रिय नाहीत, तर ज्यांची लोकप्रियता महाराष्ट्राच्या बाहेर आणि पक्षीय पातळीच्यावर आहे. त्याच नितीन गडकरी यांनी यंदा महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने जास्त सक्रिय भूमिका बजवावी असं संघाला वाटतं आहे.

## ...तर मुख्यमंत्री शिंदेंच्या निवासासमोर धरणे धरणार

### महाराष्ट्र एकिकरण समिती मुख्यमंत्र्यांची सीमाप्रश्नी गणेशोत्सवापूर्वी घेणार भेट

**बेळगाव**

सीमाप्रश्न व सीमावासीयांकडे महाराष्ट्र सरकारचे अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयातील खटल्याचे कामकाज रखडले आहे. याबाबत जाब विचारण्यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व दोन्ही सीमा समन्वय मंत्र्यांच्या घरासमोर गणेशोत्सवानंतर धरणे धरण्याचा व त्यातूनही काही निष्पन्न न झाल्यास मोठे आंदोलन उभारण्याचा ठराव मध्यवर्ती म. ए. समितीच्या बैठकीत करण्यात आला. परंतु धरणे आंदोलनापूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मुंबईत भेटून निवेदन देण्याचेही यावेळी ठरले.

सीमाप्रश्नी सर्वोच्च न्यायालयातील दाव्याबाबत कार्यकर्त्यांकडून विचारणा होत आहे. महाराष्ट्रालाही सीमावासीयांचा विसर पडला आहे. याबाबत चर्चा करून पुढील धोरण ठरविण्यासाठी मराठा मंदिरमध्ये बैठक आयोजित केली होती. कार्याध्यक्ष व माजी आमदार मनोहर किणेकर अध्यक्षस्थानी होते.

कार्याध्यक्ष किणेकर म्हणाले, गेल्या दोन वर्षांत महाराष्ट्र सरकारने सीमावासीयांना दिलेले एकही आश्वासन पाळलेले नाही. वकिलांची फी न दिल्याने सर्वोच्च न्यायालयातील खटला रखडला आहे. सीमा समन्वय मंत्री शंभूराज देसाई यांनीही तोंडाला पाने पुसली आहेत. सीमावासीयांची ताकद क्षीण झाल्याचा महाराष्ट्राचा समज झाला आहे. तो दूर करण्यासाठी गणेशोत्सवानंतर मोठे आंदोलन हाती घेऊन ताकद दाखविणे अत्यावश्यक बनले आहे. तत्पूर्वी, सीमाभागात जनसंपर्क वाढवून संघटन वाढविण्याची गरज आहे. त्यानंतर मुंबईला शिष्टमंडळ नेऊन आधी इशारा देऊया. पुढे घटक समित्यांची मते विचारात घेऊन आंदोलनाचा निर्णय घेण्यात येईल.

खजिनदार प्रकाश मरगाळे यांनी महाराष्ट्राच्या दुर्लक्षाचा पाढाच वाचला. मुंबईत 21 फेब्रुवारी रोजी झालेल्या तज्ज्ञ कमिटीच्या बैठकीत राज्य पुनर्रचना या विषयावर साक्षीदार नेमणे व पॅनलवरील वकिलांची आठ महिन्यांपासून थकलेली फी देण्याबाबत चर्चा झाली होती. पण, सहा महिन्यानंतरही फी दिली नसल्याने सीमा खटल्याला खीळ बसली आहे. सर्वोच्च न्यायालयात कामकाज पाहायला वकील नाहीत. हा सर्व महाराष्ट्र सरकारच्या दुर्लक्षाचा परिणाम आहे. त्यासाठी आंदोलन आवश्यक असून घटक समित्यांनी बैठका घेऊन निर्णय घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. चर्चेअंती आधी मुख्यमंत्री शिंदेंना निवेदन देऊन त्यानंतर त्यांच्यासह सीमासमन्वय मंत्र्यांच्या घरासमोर धरणे धरण्याचा निर्णय झाला.



महाराष्ट्राच्या विकासासाठी नवी गती
नवीन ट्रेनमुळे प्रवास होईल अधिक सुलभ

१०११५/१०११६ वान्द्रे टर्मिनस - मडगांव एक्सप्रेसचा
हिरवा झेंडा दाखवून
शुभारंभ

मुंबईच्या पश्चिम उपनगरातील जनतेचा आता कोकणाशी थेट संपर्क
रोजगारासाठी मुंबईला येणाऱ्या कोकणातील लोकांसाठी लाभदायक
सणासुदीच्या काळात प्रवाशांसाठी ह्या ट्रेनमुळे मिळेल विशेष लाभ
कोकण आणि गोव्याची यात्रा करणाऱ्या पर्यटकांसाठी उपयुक्त

पीयूष गोयल – केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री
अश्विनी वैष्णव – केंद्रीय रेल्वे, माहिती आणि प्रसारण व इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री
देवेंद्र फडणवीस – उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र
रामदास आठवले – केंद्रीय सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री

यांच्या हस्ते

सन्माननीय उपस्थिती

प्रियंका चतुर्वेदी – खासदार, राज्य सभा
संजय राऊत – खासदार, राज्य सभा
सुनील राणे – आमदार, बोरीवली
प्रकाश सुर्वे – आमदार, मागाठाणे
मनिषा चौधरी – आमदार, दहिसर

२९ ऑगस्ट २०२४ | १२:५० वाजता
बोरीवली रेल्वे स्थानक (ईस्ट प्लॅटफॉर्म)

नियमित ट्रेन सेवेचे वेळापत्रक
वान्द्रे टर्मिनस ०४.०९.२०२४ पासून / मडगांव ०३.०९.२०२४ पासून

| ट्रेन नं. १०११५ (बुधवार/शुक्रवार) | स्थानक | ट्रेन नं. १०११६ (मंगळवार/गुरुवार) |
|---|---|---|
| आगमन/प्रस्थान | | आगमन/प्रस्थान |
| ०६.५० | वान्द्रे टर्मिनस | २३.४० |
| ०७.२३/०७.२५ | बोरीवली | २२.४३/२२.४५ |
| ०७.५०/०८.१५ | वसई रोड | २१.५०/२२.१५ |
| २२.०० | मडगांव | ०७.४० |

थांबे : बोरीवली, वसई रोड, भिवंडी रोड, पनवेल, रोहे, वीर, चिपळूण, रत्नागिरी, कणकवली, सिंधुदुर्ग, सावंतवाडी रोड, थिवि आणि करमाळी स्टेशन दोन्ही दिशेला

रचना: वातानुकुलित 2-टियर, वातानुकुलित 3-टियर, वातानुकुलित 3-टियर इकॉनॉमी, शयनयान आणि सामान्य द्वितीय श्रेणी आसन



पश्चिम रेल्वे

हा कार्यक्रम थेट पहा: www.youtube.com/WesternRly/live
आम्हाला फॉलो करा: /WesternRly

२ **वृत्तमानस**
**पालघर, मुंबई**
मुंबई, गुरुवार, २९ ऑगस्ट २०२४

*नायगाव : साई दुर्गा मित्र मंडळाच्या वतीने नायगाव पूर्व येथे दहीहंडी उत्सव मोठ्या उत्सवाने पार पडला. या कायक्रमात 10 वी व 12 वी च्या 90 गुणवत्त विध्यार्थीचा सत्कार प्रमुख पाहुण्याच्या हस्ते करण्यात आला.यावेळी लहान मुलांसाठी वेशभूषा स्पर्धा, महिलांसाठी मटकाफोडी चे आयोजन करण्यात आले होते. तसेच येथील दहीहंडी उत्सवात 25 दहीहंडी पथकांनी सलामी दिली. सर्व पथकांना सन्मान चिन्ह व रोख रक्कम देण्यात आली. या कायक्रमात मा सभापती कन्हैया (बेटा) भोईर, मा सभापती रमेश घोरकना, मा नगरसेवक मिलिंद घरत, मा नगरसेवक प्रविण वर्तक, नायगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रमेश भामे, पोलीस उप निरीक्षक सूरज जगताप , डॉ सचिन मुरके, डॉ संध्या मुरके, डॉ मनोहर सुतार, डॉ प्रिती सुतार, डॉ उदय मस्के डॉ रेखा मस्के, डॉ चेतन सोनावणे, डॉ सुरेश महाजन, तसेच बहुजन विकास आघाडी जेष्ठ नेते, विवेकानंद पाटील, मोरेश्वर पाटील, दत्ताराम भोईर,कॉलनी विभाग अध्यक्ष धरेंद्र कुलकर्णी, जुचंद्र अध्यक्ष विनय पाटील, विश्वजीत पाटील, युवा अध्यक्ष आशिष पाटील, सोमेश्वर नगर अध्यक्ष मनोज पाटील, युवा अध्यक्ष रोहन पाटील, माणिकपूर बँकेचे संचालक चेतक पाटील, कार्यकर्ता विलीन पाटील, उत्तर भारतीय जेष्ठ नेता अरविंद तिवारी, राजीव सिंह , सुनिल सिंह आदी मान्यवर उपस्थित होते.*



## थोडक्यात

### जव्हार शहरात दहीहंडीचा थरार

**जव्हार:** भारताची समृद्ध, सांस्कृतिक विविध पैलू ,अध्यात्म आणि परंपरा साजरे करणाऱ्या अनेक सणांनी सजलेली आहे. असाच एक चैतन्यमय, उत्साही, धाडसी सण म्हणजे दहीहंडी उत्सव, या लोकप्रिय सणाबद्दल तरुणांच्या मनामध्ये विशेष आकर्षण आहे. त्यामुळे या उत्सवामध्ये तरुणांचा उल्लेखनीय असा सहभाग असतो. सर्वत्र दहांडी उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. जव्हार शहरात देखील दहांडी उत्सवाला दिव्य भव्य स्वरूप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून प्राप्त झाले आहे. जव्हार शहरात जय बजरंग बली गोविंदा पथक जव्हार संस्थान , दर्यासारंग गोविंदा पथक, हर हर महादेव गोविंदा पथक अशे तीन गोविंदा पथके असून उंच उंच थर लावण्यासाठी प्रत्येक गोविंदा पथकामध्ये चुरशीची स्पर्धा असल्याने गोविंदा पथकाच्या सरावाला जून महिन्यापासूनच सुरुवात करण्यात आली होती.

### कुत्र्याने घेतला माणसाचा जीव

**मुंबई:** मुंबईतल्या विक्रोळीमध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. ग्रस्तीसाठी नेमण्यात आलेल्या एका श्वानाने त्याचा सांभाळ करणाऱ्या व्यक्तीचा जीव घेतला आहे. हा श्वान तब्बल अडीच ते तीन तास त्या सांभाळ करणाऱ्या व्यक्तीवर हल्ला करत होता. घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली आहे.या श्वानांना कंपनीच्या आवारात घेऊन फिरण्याचे काम इथे हसरत अली करत होता. हसरत अलीकडे ग्रेट डेन जातीच्या कुत्र्याला घेऊन फिरण्याची जबाबदारी होती. मात्र सोमवारी सकाळी या कुत्र्याने हसरत अलीवर जोरदार हल्ला केला.सुमारे अडीच तास हा हल्ला सुरु होता. घटनेची माहिती मिळताच पोलीस, पालिका श्वान पथक आणि काही प्राणी मित्र घटनास्थळी दाखल झाले. कुत्र्याला हसरत अलीपासून लांब करण्याचा प्रयत्न करू लागले. पण वारंवार कुत्र्याचा हल्ला सुरूच होता. अडीच ते तीन तासाने या कुत्र्याला हटवण्यात आले. या घटनेमध्ये हसरतचा मृत्यू झाला आहे.

### महामार्गावर अवजड वाहनांना बंदी

**पालघर:** पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी (ता. ३०) वाढवण बंदराचे भूमिपूजन व अन्य कार्यक्रमांसाठी पालघर दौऱ्यावर येणार आहेत. त्यासाठी कार्यक्रमाच्या वेळी कोणतीही वाहतुकीची समस्या निर्माण होऊ नये, याकरिता गुरुवारी (ता. २९) आणि शुक्रवारी (ता. ३०) मुंबई-अहमदाबाद मार्गावरून सर्व अवजड वाहनांना पूर्णतः प्रवेश बंदी करण्यात आली आहे. मुंबई-अहमदाबाद महामार्ग क्रमांक ४८ वरून दोन्ही बाजूंनी जाणाऱ्या सर्व अवजड वाहनांना शुक्रवारी (ता. ३०) मध्यरात्री एक वाजल्यापासून ते शनिवारी रात्री आठ वाजेपर्यंत पूर्णपणे प्रवेश बंद असेल. ही वाहतूक नियंत्रण अधिसूचना शुक्रवारी मध्यरात्री एक वाजल्यापासून रात्री आठ वाजेपर्यंत अंमलात राहील, असे अधिसूचनेत म्हटले आहे. कार्यक्रमासाठी येणारी वाहने, प्रवासी वाहतूक करणाऱ्या बस व अन्य अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळून सर्व अवजड वाहनांना पूर्णतः प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे.

**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

## आगामी विधानसभा निवडणूक वसई विधानसभा मतदारसंघ काँग्रेस लढवणार?

# तिरंगी लढतीपूर्वी इच्छुकांच्या भाऊगर्दीत वाढ; आमदार हितेंद्र ठाकूर पुन्हा मैदानात?

प्रतिनिधी
■ वसई

विधानसभा निवडणुकांचे बिगूल अद्याप वाजलेले नाही, तारखेची अधिकृत घोषणा झालेली नाही. मात्र त्याआधीच वसई विधानसभा निवडणुकीला रंगत वाढली आहे. येथे तिरंगी लढत होण्याची शक्यता वर्तवली जात असून हा मतदारसंघ काँग्रेसच्या वाट्याला जाण्याची शक्यता आहे. दरम्यान, काँग्रेसकडून विजय पाटील, समीर वर्तक यांच्यात प्रामुख्याने चुरस असून काँग्रेस कोणाला तिकीट देतं ते पाहणे रंजक ठरणार आहे.



वसईसारखा पारंपरिक गड काँग्रेसच्या ताब्यात जाण्याची जवळपास शक्यता अधिक आहे. त्यामुळे ठाकरे गटाचे वर्चस्व असलेल्या या मतदारसंघातील ठाकरे गटात अस्वस्थतेचे वातावरण आहे. या मतदारसंघातून लढण्यासाठी ठाकरे गटाचे काही चेहरे इच्छूक आहेत. मात्र जवळपास हा मतदारसंघ मविआकडून काँग्रेसला सोडला जाण्याची शक्यता अधिक असल्याने ठाकरे गटाला येथे काँग्रेस उमेदवाराच्या प्रचाराचे काम करावे लागणार आहे. दरम्यान, नुकत्याच पार पडलेल्या पालघर लोकसभा मतदारसंघात या विधानसभा मतदारसंघात महायुतीच्या डॉ. हेमंत सावरा व महाविकास आघाडीच्या भारती कामडी यांनी जोरदार टक्कर देत बहुजन विकास आघाडीचे उमेदवार राजेश पाटील यांना मात दिली. त्याच मतांच्या बेरजेवर वसई विधानसभेची निवडणूक यावेळेस लढवली जाण्याची शक्यता अधिक आहे. मात्र या मतदारसंघातील बदलेली राजकीय परिस्थिती पाहता आमदार हितेंद्र ठाकूर हे पुन्हा मैदानात उतरणार असल्याची शक्यता अधिक आहे.

वसई विधानसभेत ख्रिस्ती मते मोठ्या प्रमाणात आहेत. ही एकगठ्ठा मते लोकसभेदरम्यान ठाकरे गटाच्या उमेदवाराला मिळाली होती. आता काँग्रेसच्या ताब्यात हा गड गेल्यास ही काँग्रेसची एकगठ्ठा मते काँग्रेस उमेदवाराच्या पारड्यात जातील. तसेच मुस्लीम मतांचा टक्काही काँग्रेसला मिळेल, अशी शक्यता आहे. मात्र वसईतून काँग्रेसचा पारंपरिक गड लढवणार कोण? यावर अद्याप एकवाक्यता नसली, तरी राजकीय धुरीणांच्या अंदाजानुसार येथून काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेश सचिव विजय पाटील किंवा महाराष्ट्र प्रदेश पर्यावरण विभाग अध्यक्ष समीर वर्तक यांच्यापैकी एक नाव येथून निश्चित होऊ शकते.

# वाढवण बंदर भूमिपूजन कार्यक्रमाला राज्यातील मच्छिमार करणार विरोध

## उत्तन येथे झालेल्या सभेत मच्छिमारांनी केला निर्धार



प्रतिनिधी
■ उत्तन

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी ह्यांच्या हस्ते ३०/०८/२०२४ रोजी होणाऱ्या वाढवण बंदराच्या भूमिपूजन सोहळ्याला राज्यातील मच्छिमारांनी विरोध केला आहे. या निर्णयाने त्यांच्यात कमालीची नाराजी पसरली आहे. या भूमिपूजनाला राज्यातील मच्छिमार कडाडून विरोध करण्यात येणार आहे. या संबंधीचा निर्णय २८/०८/२०२४ रोजी उत्तन, भाईंदर येथे झालेल्या समितीच्या सभेत घेण्यात आला असल्याचे अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीचे युवा अध्यक्ष मिल्टन सौदिया यांनी सांगितले.

वाढवण बंदर उभारणीमुळे पालघर आणि ठाणे जिल्ह्यातील ६० पेक्षा जास्त मच्छिमार गावांवर विपरीत परिणाम होणार असून लाखो मच्छिमार आपला व्यवसाय कायमस्वरूपी गमावणार आहेत. मच्छिमार समाज आजतागायत कधीच विकासाच्या आड आला नाही परंतु विकासाच्या नावाखाली मच्छिमारांचा व्यवसाय नष्ट होत असेल तर ते कदापि सहन केले जाणार नाही आणि अश्या विध्वंसक प्रकल्पांना मच्छिमार समाज शेवट पर्यंत कडाडून विरोध करत राहणार असल्याचे समितीचे सरचिटणीस संजय कोळी यांनी सांगितले.

उत्तन येथे झालेल्या बैठकीत मच्छिमारांचे कोण कोणत्या पद्धतीने नुकसान होणार या संबंधी सविस्तर चर्चा करण्यात आली. ह्या प्रकल्पामुळे फक्त डहाणू तालुक्यातील मच्छिमार बाधित होणार नसून मुंबई, ठाणे, उत्तन, वसई, अर्नाळा सातपाटी येथील मासेमारी व्यवसाय बाधित होणार आहेत कारण समुद्रातील एकूण ३० हजार एकर क्षेत्र मासेमारीसाठी प्रतिबंधित करण्यात येणार असल्याचे भारतीय मत्स्यकी संशोधन संस्थेच्या (CMFRI) अहवालात स्पष्ट नमूद करण्यात आले असल्यामुळे ह्या प्रकल्पाला राज्यातील सर्व किनारपट्टीवरून विरोध होणार असल्याचे समितीचे कार्याध्यक्ष बर्नार्ड डिमेलो यांनी सांगितले.

सदर सभेला मच्छिमार कृती समितीचे अध्यक्ष देवेंद्र दामोदर तांडेल, कार्याध्यक्ष बर्नार्ड डिमेलो, सरचिटणीस संजय कोळी, युवा अध्यक्ष मिल्टन सौदिया, उत्तन वाहतूक संस्थेचे चेअरमन विंसन बांड्या, उत्तन विकास संस्थेचे जॉन गऱ्या , वसई मच्छिमार संस्थेचे चेअरमन नाझरेथ गोडबोले, एडविन केळीखादया, जॉन्सन भयाजी डिकसन डीमेकर, पास्कु मनभाट, स्टीफन कासुघर, डोंगरी चौक मच्छिमार संस्थेचे विलियम गोविंद, पास्कोल पाटील, मनोरी मच्छिमार संस्थेचे चंद्रकांत फाजींदार, पाली मच्छिमार संस्थेचे माल्कम कासुकर, लीन्टन मुनिस, लॉरेन्स घोसाल, सचिन मिरांडा, भाटी मच्छिमार संस्थेचे जितेंद्र कोळी, उत्तन मच्छिमार विविध संस्थेचे अंतोनी ताण्या, किशोर कोळी, भाटेबंदर मच्छिमार संस्थेचे रुपेश डिमेकर आदी उपस्थित होते.

# समुद्राचा ताजा मावरा बाजारात; मात्र श्रावणामुळे अपेक्षित भाव नसल्याने मच्छीमारांची पाटी कोरी

■ वसई

नारळी पौर्णिमा सणानंतर मासेमारांनी समुद्रात बोटी सोडल्या असून चांगली ताजी मासळी बाजारात दाखल होऊ लागली आहे. मात्र श्रावण महिना सुरू असल्याने ताज्या मासळीला अपेक्षित भाव मिळत नसल्याने येईल त्या किंमतीला मासेमारांना मासळी विकावी लागत आहे. त्यामुळे या महिन्यात मासेमारांचीदेखील आर्थिक ओढाताण होताना दिसत आहे.

उपवासाचा महिना असलेल्या काळात महिनाभर मांसाहार वर्ज्य असल्याने बहतांश नागरिक मासळी, मटण, चिकनकडे पाठ फिरवतात. या महिन्यात शुद्ध पौष्टिक भाज्यांना मात्र चांगलाच भाव वधारला आहे. पट्टीचे मांसाहार खवय्ये असलेले नागरिकदेखील कडक उपवास या महिन्यात करत असल्याने गावोगावात तसेच शहराच्या ठिकाणील मच्छी मार्केटमध्ये कोळीण महिला ज्या मासळी विक्रीसाठी येतात त्यांची पाटी कोरीच राहत असल्याचे चित्र दिसून येते. त्यामुळे हवा तसा भाव मासळीला मिळत नसल्याने बऱ्याच मासेमारांसाठी हा महिना कोरडाठाक जातो.

सध्या समुद्राची चांगली फ्रेश मासळी बाजारात दाखल झाली असून त्यात बोंबिळ, सुरमई, पापलेट, कोळंबी, दाताळ, तांबी मासा, पाकट, वाव, मुशी अशा मासळीचा समावेश आहे. ही मासळी महाग असते. मात्र सध्याच्या चालू उपवासाच्या महिन्यात या मासळीला कोणी गिऱ्हाईक मिळत नसल्याने जे उपवासाचा महिना पाळत नाहीत असेच नागरिक मिळेल त्या किंमतीला ती मासळी विकत घेत आहेत. त्यामुळे या महिन्यात मच्छीमारांची पाटी कोरीच दिसून येते.

# विक्रोळीत दरड कोसळल्याने अनेक घरे बाधीत

प्रतिनिधी
■ वसई

केवळ दीड वर्षांपूर्वी बांधलेली आधार भिंत व दरड कोसळल्याने चार घरे बाधीत झालेली असून काही दुकानांचेही या भिंतीमुळे नुकसान झाले आहे. हा प्रकार विक्रोळी पार्क साईट या ठिकाणी झाला असून तातडीने ही भिंत बांधण्यात यावी, अशी मागणी ईशान्य मुंबई महाविकास आघाडीचे खासदार संजय दिना पाटील यांनी केली आहे.

पावसाळ्यात वारंवार दरडी कोसळण्याच्या घटना घडून अनेकांचे बळी जातात. त्यामुळे विक्रोळी येथे आधार भिंत बांधण्यात आली होती. मात्र आज पहाटे विक्रोळी येथील लोकमान्य नगर, टाटा पावर हाऊस जवळ, वर्षानगर या ठिकाणी दरड कोसळली. ही दरड आधार भिंतीवर पडल्याने सर्व मलबा घरांवर पडला. त्यामुळे या घटनेत चार घरे व काही दुकानांचे नुकसान झाले. घटनास्थळावर युवासेना कार्यकारीणी सदस्या राजोल पाटील शिवसेनेच्या स्थानिक नगरसेविका स्नेहल मोरे यांनी धाव घेऊन बाधीतांना सर्वोतोपरी मदत केली. याबाबत ईशान्य मुंबई महाविकास आघाडीचे खासदार संजय दिना पाटील यांनी ही आधार भिंत तातडीने बांधण्यात यावी, अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

दीड वर्षांपूर्वी बांधलेली आधार भिंत कोसळली



# भाईंदर खाडीतून डबल डेकर पूलाचा अभिनव उपक्रम की गाजर?

प्रतिनिधी
■ वसई

भाईंदर खाडीवरील जुना पूल भंगारात निघाल्यानंतर या पुलावरून हलक्या वाहनांच्या वाहतुकीसाठी एमएमआरडीएने शक्कल लढवत सन 2013 साली त्यासाठी निविदा काढून टेंडर प्रक्रिया राबवायला घेतली होती. मात्र विविध प्रशासनांच्या आडकाठीमुळे ही योजना एमएमआरडीए प्रशासनाला बासनात गुंडाळून ठेवावी लागली. अशातच आता वसई ते मिरारोड असा मेट्रो प्रकल्प व भाईंदर खाडीतून वाहतुकीसाठी पूल अशी डबल डेकर पूलाची संकल्पना एमएमआरडीने विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर समोर आणल्याने भाईंदर खाडीवरील डबल डेकर पूल एमएमआरडीए खरोखरं धसास लावण्यासाठी प्रयत्नशील आहे की, हे केवळ विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दाखवले जाणारे गाजर आहे? असा सवाल वसई- विरारकरांनी उपस्थित केला आहे.

सन 2013 सालापासून भाईंदरवरील जुन्या पुलाचा प्रश्न अधांतरी आहे. त्यामुळे वसई -विरारमधील नागरिकांना द्राविडी प्राणायाम करत मुंबई गाठावी लागते. आधीच्या जुन्या पुलाचे आश्वासन पूर्ण करण्यात एमएमआरडीए प्रशासन अपयशी ठरलेले असताना, त्यात भाईंदर खाडीवरून डबलडेकर पूल उभारण्याची संकल्पना एमएमआरडीने समोर आणली आहे.

दरम्यान, वसई ते मिरारोड असा 23 किलोमिटरचा प्रवास व त्यात 20 स्थानके असलेला आराखडा एमएमआरडीने तयार केला आहे. वसई -विरार व मीरा-भाईंदरचे वाढते नागरिकीकरण लक्षात घेता मेट्रो मार्ग व वाहतुकीसाठी पूल उभारणे असा हा अभिनव उपक्रम आहे. याआधी भाईंदरची खाडी मध्ये असल्याने वसई- विरारपर्यंत मेट्रो मार्ग नेण्यात अडचणी होत्या. इतर मार्गाने वसई- विरारपर्यंत मेट्रो मार्ग पोहोचवणे खर्चिक व वेळखाऊपणाच असल्याने हा मेट्रो मार्ग बारळगळला होता. मात्र आता भाईंदर खाडीतून मेट्रो मार्ग व वाहतुकीसाठी पूल असा डबल डेकर पुल उभारल्यास एकाच खर्चात दोन्ही प्रश्न मार्गी लागतील. अर्थात एकाच खांबावर वाहतुकीसाठी खाली पूल व त्याच्यावर मेट्रो मार्ग उभारायचा असा हा अभिनव उपक्रम एमएमआरडीएने समोर आणला आहे.

अर्थात महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर हे डबल डेकर पुलाचे एमएमआरडीएचे शर्थीचे प्रयत्न केवळ गाजर तर नाही ना? अशी शंका वसई -विरारकरांनी उपस्थित केली आहे. दरम्यान, एमएमआरडीए ज्या डबल डेकर पुलासाठी प्रयत्नशील आहे तो सत्यात उतरल्यास वसईकरांचा मुंबईचा प्रवास निश्चितच सोपा होणार आहे. त्यामुळे रेल्वेवरील प्रवाशांचा ताणही कमी होण्यास मदत होणार आहे. मात्र विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर हे गाजर एमएमआरडीएच्या माध्यमातून दाखवत तर नाही ना? असा संशय वसई- विरारकर उपस्थित करत आहेत.

# वसईत आणखी एका अल्पवयीन विद्यार्थिनीवर अत्याचार

## आठवडाभरातील तिसरी घटना

प्रतिनिधी
■ वसई

शिक्षकाने अल्पवयीन विद्यार्थीनीवर लैंगिक अत्याचार केल्याची आणखी एक घटना विरारमध्ये घडली असून गेल्या आठवडाभरातील ही तिसरी घटना उघड झाल्यामुळे पालक आणि विद्यार्थी वर्गात भेटीचे वातावरण पसरले आहे.

नालासोपारा पूर्वेकडील एका अल्पवयीन विद्यार्थिनीवर शिक्षकाने लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली होती. त्यानंतर अवघ्या काही दिवसातच नायगाव येथील एका शाळेतील सात वर्षीय विद्यार्थिनीवर शाळेतील कॅन्टीनमध्ये काम करणाऱ्या १७ वर्षीय मुलाने लैंगिक अत्याचार केल्याचे उघड झाले. या दोन घटना ताज्या असतानाच विरार मध्ये त्याची पुनरावृत्ती झाली आहे.

विरार पूर्वेकडील मनवेल पाड्याच्या सह्याद्री नगरमध्ये प्रमोद मौर्या नावाचा शिक्षक खासगी ट्युशन क्लास चालवतो.



या क्लासमध्ये शिकणाऱ्या १३ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनीचा मोर्या ने मागील आठवड्यात लैंगिक छळ केला होता. या प्रकाराचा धस घेऊन ती २ दिवस ट्यूशनला गेली नाही. त्यामुळे ट्युशनला का जात नाही असा तिच्या कुटुंबीयांनी प्रश्न विचारल्यावर तिने झाला प्रकार कथन केला.

हा प्रकार समजल्यावर बुधवारी सकाळी मुलीचे पालक आणि परिसरातील संतप्त नागरिक ट्युशनमध्ये गेले. त्यांनी मोर्याला मारहाण करून त्याची धिंड काढली. यथेच्छ धुलाई केल्यानंतर त्याला पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. या शिक्षकाने ३ ते ४ अल्पवयीन मुलींचा लैंगिक छळ केल्याचा आरोप यावेळी संतप्त नागरिकांनी केला. मुलांना शिक्षकांकडे शिकविण्यासाठी विश्वासने पाठवतो परंतु ते असा घृणास्पद प्रकार करत असल्यामुळे आम्ही करायचे काय ? असा चिंतीत प्रश्न पालकांनी यावेळी उपस्थित केला.

# 'आप'च्या मुंबईतील नेत्यांनी घेतली मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरंगे पाटील यांची भेट

प्रतिनिधी
■ मुंबई

आम आदमी पार्टीने आज महाराष्ट्रातील जालना जिल्ह्यातील आंतरवली सारथी गावात मराठा संघर्ष योद्धा,नेते मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. आपच्या राष्ट्रीय नेत्या प्रीती शर्मा मेनन यांच्या मार्गदर्शनाखाली आपचे राष्ट्रीय सहसचिव रुबेन मस्करेन्हास आणि आपचे मुंबई उपाध्यक्ष संदीप कटके आणि स्थानिक कार्यकर्ते होते.

"आम्ही मनोज जरंगे पाटील यांचे नेतृत्व आणि मराठा आरक्षणासाठी जनआंदोलनाबद्दलत्यांचे अभिनंदन केले. आम आदमी पार्टी पक्ष देखील जनआंदोलनाचा निर्माता आहे. सामाजिक बदलावर परिणाम करण्याचा एकमेव मार्ग म्हणून सक्रिय राजकीय सहभागी असल्याचे प्रिती मेनन यांनी सांगितले.

आंदोलनाला दिला पाठिंबा



"आम्ही मनोज जरांगे पाटील यांच्याशी महाराष्ट्राच्या भविष्याबाबत सकारात्मक आणि विधायक चर्चा केली. त्यांच्या आंदोलनाला आम आदमी पार्टीचा पाठिंबा आहे आणि मराठी माणसांच्या न्याय्य हक्कांसाठीच्या लढ्यात त्यांच्यासोबत आहे. असे सांगितले फॅसिस्ट आणि निरंकुश शक्तींचा पराभव करण्याच्या संदर्भात आम्ही एकरूप आहोत. महाराष्ट्रानेही देशाला पुरोगामी राजकारणाचा मार्ग दाखवला असून आगामी राज्याच्या निवडणुका याच विचारावर असतील असे, आम आदमी पार्टीचे मुंबई उपाध्यक्ष ॲड संदीप कटके यांनी सांगितले.

**जाहीर नोटीस**

या नोटीसीव्दारे तमाम नागरीकांना कळविण्यात येते कि, श्री. भावडू राया शिंद ,मू पो कारेगाव ता. मोखाडा जि. पालघर यांनी स्वतःच्या जन्माची नोंद उशीराने होउन मिळणेबाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार यांनी अर्जात श्री भावडू राया शिंद मू पो- कारेगाव ता. मोखाडा जि. पालघर यांच्या जन्माची तारीख-०१/०१/१९५६ नमुद केलेली आहे. ग्रामसेवक, ग्रामपंचायत मु पो कारेगाव ता. मोखाडा जि. पालघर यांच्या अभिलेखात जन्माची नोंद करण्यात आली नसल्याबाबत जन्माची नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र या न्यायालयात सादर केलेले आहे. सदर प्रकरणी निम्न स्वाक्षरीकार यांचे या न्यायालयात सुनावणीचे कामकाज चालु आहे. प्रकरणी नागरीकांचा आक्षेप / तक्रार / हरकती असल्यास त्यांनी आवश्यक त्या दस्तऐवजासह नोटीस प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासुन १५ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात या न्यायालयात दाखल करावे. नमुद कालावधी नंतर येणा-या आक्षेप तक्रार हरकतीचा विचार केला जाणार नाही. तसेच कोणतीही हरकत/आक्षेप / तक्रार या कार्यालयास प्राप्त न झाल्यास जन्म मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील तरतुदीनुसार नोंदीच्या अर्जाबाबत निर्णय घेण्यात येईल, त्याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**केस क्र.एम/जन्म-मृत्यू रेकॉर्ड/**
**एस आर २५६/२०२४**
**तारीख:-२५/०७/२०२४**
**ठिकाण:- मोखाडा**

कार्यकारी दंडाधिकारी
तथा- तहसिलदार मोखाडा

**प्रत-१. ग्रामसेवक, ग्रामपंचायत कारेगाव मोखाडा.**
**2)सदरची नोटीस बोर्डावर प्रसिध्द करून जबाब पंचनाम्यासह अहवाल सादर करावा. तलाठी सजा कारेगाव**
**सदरची नोटीस चावडीवर प्रसिध्द करून जबाब पंचनाम्यासह अहवाल सादर करावा.**

**जाहीर सूचना**

सूचना ह्याद्वारे सर्व जनतेला आणि संबंधितांना देण्यात येत आहे की आम्ही गाव पाचपाखाडी, तालुका आणि जिल्हा ठाणे मधील जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र. १६७, १६८ वर बांधण्यात आलेल्या "पाचपाखाडी शांती सीएचएसएल" मधील साधारणपणे २५ चौरस मीटर बिल्टअप क्षेत्रफळ मोजमाप असलेल्या खोली क्र. ए-१५ (ह्यानंतर नमूद टेनेमेंट असा संदर्भ असलेले) च्या संदर्भात माझे अशील श्री. राकेश भीमराव साबळे आणि श्रीमती पूनम राकेश साबळे ह्यांच्या वतीने शीर्षक तपासत आहोत.
श्री. सुधाकर पांडुरंग कांबळे हे त्या सदनिकेचे मूळ वाटपदार होते, कारण म्हाडाने पंचपाखाडी शांती सीएचएसएलच्या नावे जारी केलेल्या भाडेपट्ट्याच्या करारांतर्गत पुरावा होता कारण सोसायटी आणि तिचे सदस्य संबंधित सदनिका यांच्यात आणि त्याअंतर्गत निर्णायक आणि नोंदणीकृत नसलेल्या विक्री कराराची अंमलबजावणी करण्यात आली होती.
सदर सदनिका विक्री संदर्भात श्री.सुधाकर पांडुरंग कांबळे विक्रेता म्हणून आणि श्री.विनोद अंबादास नलावडे खरेदीदार म्हणून २०.०७.२००४ रोजी आणि त्याअंतर्गत, विक्रेते म्हणून श्री विनोद अंबादास नलावडे आणि खरेदीदार म्हणून सौ. मार्टिन (प्रीती) प्रधान कटके यांच्यात दिनांक २०.०७.२००४ रोजीचा निर्णायक आणि नोंदणी नसलेला विक्री आणि हस्तांतरण करार अंमलात आणला गेला. दिनांक ०९.०१.२००६ रोजी निर्णायक आणि नोंदणीकृत नसलेल्या विक्री आणि हस्तांतरण कराराद्वारे आणि अंतर्गत सदर सदनिकेच्या विक्रीच्या संदर्भात श्रीमती मार्टिन (प्रीती) प्रधान कटके विक्रेता म्हणून आणि श्रीमती गंगुबाई तुळशीराम ठुबे खरेदीदार यांच्यात पार पडली. सदर कराराच्या विक्रीच्या संदर्भात श्रीमती मार्टिन (प्रीती) प्रधान कटके आणि विक्रेते म्हणून श्रीमती गंगुबाई तुळशीराम ठुबे आणि खरेदीदार म्हणून सौ. ज्योती भैरूलाल जैन यांच्यात न्याय्य आणि नोंदणीकृत नसलेला विक्री आणि हस्तांतरण करार अंमलात आणला गेला.
~श्रीमती ज्योती भैरुलाल जैन यांनी दिनांक 12.04.2010 च्या विक्रीसाठी नोंदणीकृत करारनाम्याची अंमलबजावणी करून Regn क्रमांक TNN-2/5107/2010, सदर सदनिका विकली, हस्तांतरित केली आणि श्रीमती अनिता एकनाथ शेडगे यांच्या नावे आणि अटींवर त्यात नमूद केलेल्या अटी. श्रीमती अनिता एकनाथ शेडगे यांची 19.10.2016~ रोजी मुदत संपली आहे, 1) श्री. एकनाथ कृष्णा शेडगे, 2) श्री. अंकुश एकनाथ शेडगे, 3) सौ. ज्योती दीपक गायकवाड आणि 4) सौ. पल्लवी उमेश साळुंके या त्यांच्या एकमेव कायदेशीर कायदेशीर हयात आहेत. वारस आणि प्रतिनिधी. आता, माझे क्लायंट श्रीमती अनिता एकनाथ शेडगे यांच्या हयात असलेल्या कायदेशीर वारसांकडून ती सदनिका खरेदी करण्याचा मानस आहेत आणि पुढे वर वर्णन केलेली सदनिका गहाण ठेवून बँकेकडून गृह कर्ज सुविधा मिळवू इच्छित आहेत. उपरोक्त सदनिकेत मालकी, खरेदी, हस्तांतरण, लीज, गहाण, धारणाधिकार, भेटवस्तू, शुल्क, भाडेकरू, परवाना किंवा अन्यथा कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, शीर्षक, हक्क आणि दावा करणारी कोणतीही व्यक्ती, याद्वारे असे म्हणतात. असा दावा पुष्टी करण्यासाठी खालील पत्त्यावर अधोस्वाक्षरी करणाऱ्यास सर्व दस्तऐवजांसह कळविण्यावर, येथे प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसांच्या आत, असे न झाल्यास असा कोणताही दावा अस्तित्वात नाही असे गृहीत धरले जाईल आणि यापुढे काहीही न करता संदर्भ किंवा सूचना आणि त्यातही असा दावा, जर असेल तर, माफ केला जाईल, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

**देवाशिष दिलीप वाणी,**
**वकील – उच्च न्यायालय,**
**कार्यालय क्र. ११, रोहित चेम्बर्स,**
**प्रिमायसेस सीएसएल, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१**

**जाहिर नोटीस**

तमाम जनतेस सूचित करण्यात येते की, गाव मौजे कोफराड, ता. वसई, जि. पालघर येथील वसई विरार शहर महानगरपालीकेच्या हद्दीतील रूम नं. १६२/ए-६, जे. पी. नगर की ऑप. सो.ली., कोफराड, विरार (पश्चिम), ता. वसई, जि. पालघर हि मिळकत श्री. सुभाषचंद भालचंद अमृते यांचे मालकी कब्जेवहीवाटीची असून श्री सुभाषचंद्र भालचंद्र अमृते हे दिनांक : १७.०८.२०२३ रोजी मयत झाले असुन त्यांना १. श्रीमती गौरी प्रताप पिंपळे पुर्वाश्रमाची निलीमा सुभाषचंद्र अमृते २. श्री. वैभव सुभाषचंद्र अमृते हे दोन कायदेशीर वारस आहे सदरील फ्लॅट तसेच शेअर्स सर्टिफीकेट हे श्री. वैभव सुभाषचंद्र अमृते यांच्या नावे करण्याचे ठरविले आहे. तरी सदर दोन्ही मिळकतीवर कोणाचाही हकक, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, तारण, कुळवहिवाट, वारसा, पोटगी, भाडेपटटा, वहिवाट किवा अन्य स्वरूपाचा दावा वा मागणी असल्यास त्यांनी त्याची लेखी स्वरूपातील हरकत योग्य कागदोपत्री पुराव्यानिशी निम्नस्वाक्षरीकर्ता यांच्याकडे रूम नं. २०२, गोविंद अपार्टमेन्ट (अ), साईनाथ नगर, सिंग्नल जवळ, किणी सदन बाजूला, विरार (पुर्व), ता. वसई, जि. पालघर, पिन क्र.४०१ ३०३ या पत्त्यावर या सुचनेच्या प्रसिध्दीपासुनच्या १४ दिवसाच्या आत पाठवावी वर दिलेल्या मुदतीत जर हरकत पोहचली नाही तर सदर फ्लॅट तसेच शेअर्स सर्टिफीकेटचा व्यवहार हरकत विरहित आणि विक्री योग्य आहे व हरकत असल्यास सोडुन दिली आहे असे गृहित धरून माझे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पुर्ण करतील.

**ॲड. प्रताप अनिल पिंपळे**

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 70**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - ७०**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

**मुंबई:** दहीहंडी उत्सवानिमित्त रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी मुंबईतील विविध दहीहंडी उत्सवांना भेट दिली. रिपब्लिकन पक्षाच्या वतीने मुंबईत आयोजित जुहू गल्ली,वर्सोवा, केतकीपाडा दहिसर, चेंबूर पांजरापोळ आणि स्वप्ननगरी मुलुंड येथील दहीहंडी उत्सवांना ना.रामदास आठवले यांनी भेट दिली.यावेळी रिपब्लिकन पक्षाचे मुंबई प्रदेश अध्यक्ष सिद्धार्थ कासारे आणि आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.



# सरकारची 'लाडका कॉंट्रॅक्टर, लाडका उद्योगपती' योजना सुरु!

## सरपंच संघटनेच्या आंदोलनात उद्धव ठाकरेंची बोचरी टीका

प्रतिनिधी
■ मुंबई

गेल्या आठवड्याभरापासून राज्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये कामकाज ठप्प झाले आहे. याचे कारण सरपंच व उपसरपंच वर्गात प्रचंड नाराजी आहे. सरकारी प्रशासनाला जाग आणण्यासाठी आणि विविध मागण्यांसाठी अखिल भारतीय सरपंच परिषदेने आज २८ ऑगस्टपासून आझाद मैदानात आंदोलनाला सुरुवात केली.या आंदोलनात राज्यभरातून हजारो ग्रामपंचायत अधिकारी सहभागी झाले आहेत. सरपंच संघटनेच्या या आँदोलनात महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सहभाग घेतला आहे. शरद पवार, उद्धव ठाकरे, नाना पटोले सरपंच संघटनेच्या आंदोलनात सहभागी झाले होते. यावेळी उद्धव ठाकरे यांनी सरकारची लाडका कॉंट्रॅक्टर, लाडका उद्योगपती योजना सुरु असल्याचे जहाल टीकास्त्र सोडले.

ग्रामीण जिल्हातील रस्त्यांची दुरवस्था खराब असून, त्यामुळे सरपंच व उपसरपंच यांना ग्रामीण जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागत असल्याचे संघटनेचे म्हणणं आहे. त्यामुळे मुंबईच्या आझाद मैदानात संघटनेच्या वतीने आंदोलन करण्यात येत आहे.

असा कोणताही घटक नाही जो सरकारच्या किळसवाण्या कारभारामुळे त्रासलेला नाही. सरकारची मुळे ही ग्रामपंचायत आणि सरपंच ही लोक असतात. मुळांना कमजोर करण्याचे काम सरकार करत असेल तर हा डोलारा शिल्लक राहिल असं वाटत नाही. सरकारच्या घोषणांची अंमलबाजी करणारे तुम्ही लोक असता. आता सरकारचे प्रतिनिधी येतील आणि लाडका सरपंच अशी घोषणा करुन जातील. सरकारचे लाडके कॉंट्रॅक्टर वेगळे आहेत. निवडणुका आल्यानंतर हे मुख्यमंत्री बोलायला लागले आहेत. तुमच्या मागण्यांमध्ये महत्त्वाचा भाग आहे. सरकारने आज योजना सुरु केल्या आहेत पण त्यांचे तिजोरीकडे लक्ष नाही. योजना राबवणारे असेच बसलेत. सगळ्या योजनांचे पैसे मतांसाठी फिरवले जात आहेत ते बघा," असं उद्धव ठाकरे म्हणाले.

राज्यातील हजारो सरपंचांनी त्यांच्या विविध मागण्यासाठी आझाद मैदानात आंदोलन सुरु केले असून त्यांचा मागण्या रास्त आहेत. भाजपा महायुती सरकार त्यांच्या मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष करत आहे, त्यांचा आवाज सरकारपर्यंत पोहोचण्याचे काम करु आणि महाविकास आघाडीचे सरकार आल्यावर त्यांच्या सर्व प्रलंबित मागण्या मान्य करु, अशी ग्वाही महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे.



**ग्रामपंचायत सदस्यांच्या प्रमुख मागण्या**

- नियमित आणि सन्माननीय मानधन आणि भत्ते असावेत.
- सरपंचाला १५ हजार, उपसरपंचला १० हजार आणि सदस्याला ३ हजार मिळावेत.
- ग्रामपंचायतीशी संबंधित सर्व घटकांवर विमा, पेन्शन, निश्चित वेतन लागू करण्यात यावे.
- मुंबईत सरपंच भवन स्थापन करावे
- ग्रामसेवक आणि ग्रामविकास अधिकारी यांना एकत्र करून पंचायत विकास अधिकारी बोलावण्यात यावे.
- ग्रामरोजगार सेवकाची पूर्णवेळ नियुक्ती करून वेतन निश्चित करण्यात यावे.
- संगणक परिचालकांना ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या श्रेणीत आणण्यासाठी समितीच्या अहवालाची तातडीने अंमलबजावणी करावी.
- संगणक परिचालकांचा भार ग्रामपंचायतीऐवजी शासनाने उचलावा.
- ग्रामपंचायतींना स्वायत्त संस्था बनवून विकास कामे करण्याचे अधिकार देण्यात यावेत.

# विरोधक सरकारच्या नावाने कितीही रडले तरी विधानसभेची हंडी महायुतीच फोडणार

## शिवराज प्रतिष्ठान दहीहंडी उत्सवात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दावा

प्रतिनिधी
■ मुंबई

विरोधकांनो सरकारच्या नावाने किती रडणार. परंतु कितीही रडलात तरी विधानसभेची हंडी महायुतीच फोडणार, असा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाजपा मागाठाणे विधानसभा शिवराज प्रतिष्ठानतर्फे आयोजित करण्यात आलेल्या दहीहंडी उत्सवात बोलताना केला.

मंगळवारी चिंतामणी प्लाझा, अशोकवन दहिसर पूर्व येथे भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांच्या नेतृत्वाखाली आणि शिवराज प्रतिष्ठानतर्फे दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तर मुंबईचे लोकप्रिय खासदार पियुष गोयल, भाजपा मुंबई अध्यक्ष आ. आशिष शेलार यांच्यासह मराठी चित्रपट सृष्टीतील दिग्गज कलाकारांची मांदियाळी यावेळी दिसून आली. तसेच यावेळी लोकशाहीर विठ्ठल उमप थिएटर प्रस्तुत 'गोविंदा आला रे' हा हिंदी, मराठी गीतांचा नृत्यांगणांसह बहारदार कार्यक्रमही सादर करण्यात आला.



याप्रसंगी कार्यक्रमाचे संयोजक आणि मुंबई भाजपाचे उपाध्यक्ष प्रकाश दरेकर, उत्तर मुंबई महिला मोर्चाच्या माधुरी रावराणे, महामंत्री कृष्णकांत दरेकर, सहकाराचे जिल्हा अध्यक्ष अमोल खरात, युवा मोर्चा अध्यक्ष अमित उतेकर, विनायक राजेशिर्के, वॉर्ड अध्यक्ष संजय घाडी, वॉर्ड अध्यक्षा प्रियंका रेडकर, झोपडपट्टी जनता परिषदचे अध्यक्ष सौधागर धस, गुजराती सेलचे अध्यक्ष जयेश भानुशाली, मागाठाणे विधानसभा उपाध्यक्ष विवेक नार्वेकर यांसह मागाठाणे विधानसभा क्षेत्रातील भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# आज पासून सुरु होणारा राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप तूर्तास पुढे ढकलला

प्रतिनिधी
■ मुंबई

.मुख्यमत्र्यांनी अर्थसंकल्पिय अधिवेशात पटलावर ठेवलेल्या निवृती वेतन योजनेची त्वरीत अधिसूचना काढून शासन निर्णय जाहिर करावा,या प्रमुख मागणीसह इतर प्रलंबित मागण्यांसाठी सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीने आज २९ ऑगस्टपासून बेमुदत संपाचा इशारा शासनास दिला होता.

याच विषयावर .मुख्यमंत्री महोदय यांचेशी प्रलंबित मागण्यांशी मंगळवारी चर्चा झाली.सदर चर्चेत राज्य शासनाने अर्थसंकल्पीय अधिवेशनात पटलावर ठेवल्यानुसारच सुधारीत निवृत्तीवेतन योजना राबविली जाईल, असे अभिवचन मुख्यमंत्री महोदयांनी दिले , तसेच इतर विषयांबाबत निर्णायक चर्चा सद्याच्या त्यांच्या व्यस्ततेमुळे दोन/तीन दिवसांनंतर संपन्न होईल, असे सांगितल्यामुळे बेमुदत संप तूर्तास पुढे ढकलण्यात.आला असल्याचे सरकारी-निमसरकारी,शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समिती चे निमंत्रक विश्वास काटकर यांनी सांगितले.

मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या या अभिवचनानंतर समन्वय समितीच्या विस्तारीत सभेत, मुख्यमंत्री महोदयांना अपेक्षित निर्णय घेण्यासाठी काही दिवसांचा कालावधी देणे, योग्य होईल, असा ठराव मंजूर करण्यात आल्याचेही काटकर यांनी सांगितले. या ठरावानंतर दि.२९ ऑगस्ट च्या नियोजित संपाची बदललेली पुढील तारीख ४ सप्टेंबर रोजी होणाऱ्या समन्वय समितीच्या सभेत निर्णय घेऊन , ठरविण्यात येणार आहे. असेही त्यांनी सांगितले.

# म्हाडा मुंबई मंडळ सोडतीतील 370 सदनिकांच्या विक्री किंमतीत 10 ते 25 टक्क्यांपर्यंत कपात - गृहनिर्माण मंत्री अतुल सावे

## म्हाडाच्या 'श्री आणि श्रीमती निवासी' शुभंकर चिन्हाचे गृहनिर्माण मंत्री सावे यांच्या हस्ते अनावरण

प्रतिनिधी
■ मुंबई

म्हाडा मुंबई मंडळातर्फे मुंबईतील २०३० सदनिकांच्या विक्रीसाठी आयोजित संगणकीय सोडतीतील विकास नियंत्रण नियमावली ३३ (५) व ३३ (७) व ५८ अंतर्गत पुनर्विकास प्रकल्पातून म्हाडाला विकासकांकडून प्राप्त झालेल्या म्हाडाच्या हिश्श्यातील गृहसाठ्यापैकी ३७० सदनिकांच्या विक्री किंमती सुमारे १० ते २५ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात येत असल्याची माहिती राज्याचे गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांनी आज दिली.

आधुनिक तंत्रज्ञान युगामध्ये म्हाडाच्या केंद्रस्थानी असलेल्या नागरिकांशी जनसंवाद प्रामुख्याने सुलभ व पारदर्शक राहावा, या उद्देशाने म्हाडातर्फे निर्माण करण्यात आलेल्या 'श्री आणि श्रीमती निवासी' या शुभंकर चिन्हाचे अनावरण गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते आज म्हाडा मुख्यालयात करण्यात आले. या कार्यक्रमादरम्यान सावे बोलत होते.



पुनर्विकास प्रकल्पातून विकासकांकडून म्हाडाला गृहसाठा म्हणून प्राप्त झालेल्या ३७० सदनिका संगणकीय सोडत प्रणालीतून विक्रीसाठी जाहीर करण्यात आल्या आहेत. यातील अत्यल्प उत्पन्न गटातील सदनिकांच्या किंमती २५ टक्क्यांनी कमी करण्यात येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले तसेच अल्प उत्पन्न गटातील सदनिकांच्या किंमती २० टक्क्यांनी, मध्यम उत्पन्न गटातील सदनिकांच्या किंमती १५ टक्क्यांनी, उच्च उत्पन्न गटातील सदनिकांच्या किंमती १० टक्क्यांनी कमी करण्यात आल्याचे सावे यांनी सांगितले.

सावे यांनी पुढे सांगितले की, आज किंमतींमध्ये जाहीर बदलांच्या अनुषंगाने म्हाडा सोडतीत अधिकाधिक नागरिकांना सहभाग घेण्याची संधी उपलब्ध व्हावी म्हणून मुंबई मंडळ सदनिकांच्या विक्रीसाठी सुरू असलेल्या ऑनलाईन अर्ज नोंदणी व अर्ज स्वीकृती प्रक्रियेला दि. १९ सप्टेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात येणार आहे. यावेळी मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद बोरीकर, मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद शंभरकर, मुख्य अभियंता-२ धीरजकुमार पंदिरकर, मुख्य अभियंता-३ शिवकुमार आडे, उपसचिव गृहनिर्माण विभाग अजित कवडे, आदी उपस्थित होते.




**मुंबई :** म्हाडा संघर्ष समीतीच्या वतीने काल आझाद मैदानात एक दिवसाचे धरणे आंदोलन करण्यात आले. या धरणे आंदोलनाला. खासदार अरविंद सावंत, आमदार कालिदास कोळंमकर, आमदार अजय चौधरी, माजी मंत्री बाळा नांदगावकर, आमदार विद्या चव्हाण माजी.नगरसेवक नरवणकर, माजी नगरसेविका सुरेखा लोखंडे, मनोज जामसुतकर शिवसेना उपनेता, रोहिदास लोखंडे नेता भाजपा यांनी मार्गदर्शन केले. महाराष्ट्र सरकारच्या वतीने मुंबई शहर पालकमंत्री दिपक केसरकर हे आंदोलनाला उपस्थित राहीले त्यांनी येत्या ८/१० दिवसात मुख्यमंत्री यांना भेटून हा प्रश्न मार्गी लावला जाईल असे आश्वासन दिले.

# आज नगर पथविक्रेता समितीची निवडणूक आणि निकाल

■ मुंबई

मुंबईतील नगर पथविक्रेत्यांची १ शिखर समिती आणि ७ परिमंडळाच्या प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण ८ समित्यांसाठी आज गुरुवारी निवडणूक होत आहे. या पार्श्वभूमीवर संपूर्ण मुंबई महानगरासाठी असलेल्या शिखर समितीसह सात परिमंडळनिहाय समिती अशा एकूण आठ समित्यांच्या सदस्यपदासाठी निवडणूक होणार आहे. पात्र २३७ उमेदवारांची अंतिम यादी गेल्या मंगळवारी प्रसिद्ध करण्यात आली आहे. २३७ उमेदवारांपैकी १९० पुरुष तर ४७ महिला उमेदवारांचा समावेश आहे.

केंद्र शासनाच्या पथविक्रेता नियम २०१६ मधील तरतुदींच्या अनुषंगाने नगर परिषद प्रशासन संचालनालयाचे आयुक्त तथा संचालक तसेच समन्वयन अधिकारी (फेरीवाला धोरण) यांच्या निर्देशांनुसार, नगर पथविक्रेता समिती गठीत करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक घेतली जात आहे.

**हे मतदार मतदान करणार**

*मुंबईतील नोंदणीकृत नगर पथविक्रेता मतदारांची एकूण संख्या ३२ हजार ४१५ आहे. त्यामध्ये परिमंडळ-१ मधील ७ हजार ६८६, परिमंडळ-२ मधील ५ हजार ३०३, परिमंडळ-३ मधील ४ हजार ६६८, परिमंडळ-४ मधील ७ हजार ५०१, परिमंडळ-५ मधील २ हजार १६०, परिमंडळ-६ मधील ३ हजार ०३३, परिमंडळ-७ मधील २ हजार ०६४ मतदारांचा समावेश आहे. मतदानासाठी प्रत्येक विभाग (वॉर्ड) स्तरावर मतदान केंद्र असतील. या निवडणुकीसाठी ६७ मतदान केंद्र निश्चित करण्यात आली आहे.*

नगर पथविक्रेता शिखर समितीसाठी एकूण ३३ अर्ज वैध ठरले आहेत. त्यामध्ये अनुसूचित जाती- ३, इतर मागासवर्ग- ४, अल्पसंख्यांक (महिला राखीव)- २, दिव्यांग (महिला राखीव) – २, सर्वसाधारण गट (खुला)- १९, सर्वसाधारण गट (महिला राखीव)- ३ उमेदवारी अर्जांचा समावेश आहे.

केनरा बैंक Canara Bank
A Govt. of India Undertaking
सिंडिकेट Syndicate
**मुंबई जे.व्ही.पी.डी. स्कीम ब्रांच (१२१)**
१०१, रेयन बसेरा वल्लभ नगर, सोसायटी, कूपर हॉस्पिटल समोर,
जेव्हीपीडी स्कीम, विलेपार्ले पश्चिम, मुंबई - ४०००५६ ई-मेल : cb0121@canarabank.com
संपर्क क्र.: ८६५५९६३३३५, ९५१८७९७७४६

**ताबा सूचना [कलम ८(१)]**

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (कायदा) २००२ (५४/२००२) (ह्यानंतर कायदा असा संदर्भ असलेले) अंतर्गत कॅनरा बँकेचे प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३ (१२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून श्री. राहुल शिवदास साळवी ह्यांना सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेली रक्कम रु. २१,८२,८८७.७२ (रुपये एकवीस लक्ष ब्याऐंशी हजार आठशे सत्याऐंशी आणि बहात्तर पैसे मात्र) चा भरणा नमूद सूचना प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांच्या आत करण्यासाठी मागणी सूचना दिनांकित ३०.०५.२०२३ जारी करण्यात आली होती.
कर्जदार रकमेचा भरणा करण्यास असमर्थ ठरल्यामुळे सूचना ह्याद्वारे विशेषत: कर्जदार आणि सामान्य जनतेला देण्यात येत आहे की येथे खाली वर्णन करण्यात आलेल्या मालमत्तेचा नमूद नियमनाच्या नियम ८ आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या नमूद कायद्याच्या कलम १३ (४) अंतर्गत त्याना / तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून २७ ऑगस्ट २०२४ रोजी ताबा घेतला आहे.
विशेषत: कर्जदार आणि सामान्य जनतेला ह्याद्वारे सावध करण्यात येत आहे की मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि जर मालमत्तेशी असा व्यवहार झाला असल्यास १९.०८.२०२४ अनुसार रु. २३,३७,९०४.७२ (रुपये तेवीस लक्ष सदतीस हजार नऊशे चार आणि बहात्तर पैसे मात्र) आणि त्यावरील व्याजाचा भरणा कॅनरा बँक कडे करण्यास बाध्य असतील.
सुरक्षित मालमत्ता सोडविण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ (८) मधील तरतुदीकडे कर्जदाराचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

सदनिका क्र. ४०२, ४ था मजला, बेस्ट अपार्टमेंट, मा सरस्वती हॉस्पिटल आणि डायलिसीस सेंटरजवळ, गाव मोरे नालासोपारा पूर्व, तालुका वसई जिल्हा पालघर ४०१२०९ येथे असलेल्या मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड.
सीमा: उत्तर दिशेला: साई आस्था बिल्डींग, दक्षिण दिशेला: साई निवास बिल्डींग, पूर्व दिशेला: मा दुर्गा बिल्डींग, पश्चिम दिशेला: रोड

**दिनांक: २७.०८.२०२४**
**ठिकाण: वसई**
सही/-
प्राधिकृत अधिकारी
कॅनरा बँक

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**
**जलव्यवस्थापन विभाग**
**नवीन पनवेल**
सत्यमेव जयते

**ई-निविदा सुचना क्र. २१ सन २०२४-२५**

अतिरिक्त ४० द. ल. लि. जे. एन. पी. टी. पाणी पुरवठा योजना. ता. उरण, जि. रायगड. (पुर्ण ठेव )जासाई गावठाणामध्ये गव्हाणफाटा ते करळफाटा साखळी क्र. २४०० ते ४२७५ (एकुण लांबी १८७५) मध्ये १११८ मि. मी. व्यासाची मृदु पोलादी जलवाहिनी टाकणे. या कामाच्या निविदा मजीप्राकडून मागविण्यात येत आहे. कामाची अंदाजित रक्कम रू. ११,७९,६६,०९८/- आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दि. २९/०८/२०२४ पासून www.mahatenders.gov.in या वेब पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

निविदा प्रक्रिया कार्यक्रमाच्या सर्व तारखा www.mahatenders.gov.in या वेब पोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सुचनेनुसार राहतील.

दिनांक : २३/०८/२०२४

स्वाक्षरी/-
(एस.पी. वेंगुर्लेकर)
कार्यकारी अभियंता
म.जी. प्रा. जलव्यवस्थापन
विभाग नवीन पनवेल

डी.जी.आय.पी.आर/आरओसी२०२४-२५/क्र.५/सी२४३९

**मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ**
**(म्हाडाचा घटक)**
म्हाडा MHADA

**ई - निविदा सुचना**

कार्यकारी अभियंता ई-२ विभाग, मुं. इ. दु. व पू. मंडळ, इ. क्र. ३४, तळ मजला, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई-३३ यांनी खाली दर्शविलेल्या कामाकरीता महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे नोंदणीकृत कामगार सहकारी संस्था कडून बी-१ (टक्केवारी नमुन्यात) ऑनलाईन ई निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेचे अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत रक्कम | कामगार सहकारी संस्थेचा नोंदणी वर्ग | निविदा रक्कम (१२% GST सहीत) | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | विशेष दुरुस्ती अंतर्गत पुनर्रचित इमारत समाधान निवास ए विंग ई-२ वार्ड, मुंबई. येथील इमारतीतील खोलीच्या छताची, इमारतीवरील पाण्याच्या टाकीची, जी. आय. पाईप व पी.व्ही.सी. पाईपची दुरुस्ती करणे. | १९,९६,९८१/- | निरंक | २०,०००/-(५०% सुरुवातीस ५०% बिलातुन कपात) | वर्ग-अ | ५९०/- | १८ महिने (पावसाळ्याचा कालावधी धरुन) |
| २. | विशेष दुरुस्ती अंतर्गत पुनर्रचित इमारत समाधान निवास बी-विंग ई-२ वार्ड, मुंबई. येथील इमारतीतील खोलीच्या छताची, इमारतीवरील पाण्याच्या टाकीची, जी. आय. पाईप व पी.व्ही.सी. पाईपची दुरुस्ती करणे. | १९,९०,०७६/- | निरंक | २०,०००/-(५०% सुरुवातीस ५०% बिलातुन कपात) | वर्ग-अ | ५९०/- | १८ महिने (पावसाळ्याचा कालावधी धरुन) |
| ३. | विशेष दुरुस्ती अंतर्गत पुनर्रचित इमारत समाधान निवास सी-विंग ई-२ वार्ड, मुंबई. येथील इमारतीतील खोलीच्या छताची, इमारतीवरील पाण्याच्या टाकीची, जी. आय. पाईप व पी.व्ही.सी. पाईपची दुरुस्ती करणे. | १४,८०,३५९/- | निरंक | १५,०००/-(५०% सुरुवातीस ५०% बिलातुन कपात) | वर्ग-ब व त्यावरील | ५९०/- | १८ महिने (पावसाळ्याचा कालावधी धरुन) |

| अ. क्र. | स्टेज | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १. | जाहिरात दिनांक | ३०/०८/२०२४ सकाळी १०:०० वाजता |
| २. | निविदा विक्री सुरू | ३०/०८/२०२४ सकाळी १०:०५ वाजता |
| ३. | निविदा विक्री बंद | ०६/०९/२०२४ सायंकाळी १७:३० वाजेपर्यंत |
| ४. | निविदा स्विकृती सुरू | ३०/०८/२०२४ सकाळी १०:०५ वाजता |
| ५. | निविदा स्विकृती अंतिम दिनांक | ०६/०९/२०२४ सायंकाळी १७:३५ वाजेपर्यंत |
| ६. | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | ०९/०९/२०२४ सकाळी ११:०० वाजता |
| ७. | आर्थिक बोली उघण्याचा दिनांक | ०९/०९/२०२४ सकाळी ११:०० वाजता |

१) संपूर्ण निविदा पध्दती ही ऑनलाईन स्वरूपाची राहील. त्याबाबतच्या सर्व सुचना, अटी व शर्थी http://mahatenders.gov.in म्हाडाच्या MHADA Website-http://mhada.gov.in या संकेतस्थळांवर प्रसिध्द केल्या जातील.
२) निविदा विषयीची कागदपत्रे दि. ३०/०८/२०२४ रोजी सकाळी १०.०५ नंतर ते ०६/०९/२०२४ सायंकाळी १७:३० वाजेपर्यंत http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करू शकता येतील.
३) निविदा अर्जाची रक्कम तसेच इसारा रक्कम ऑनलाईन भरणे आवश्यक राहील.
४) तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक ०९/०९/२०२४ सकाळी ११:०० वाजता व आर्थिक बोली उघण्याचा दिनांक ०९/०९/२०२४ सकाळी ११:०० वाजता कार्यकारी अभियंता ई-२ विभाग, मुं. इ. दु. व पू. मंडळ, इ. क्र. ३४, तळ मजला, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई-३३, यांचे दालनात उघडल्या जातील.
५) निविदाकारांनी ई निविदेद्वारे अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या मुळ प्रती तांत्रिक बोली उघण्याच्या वेळेस खातरजमा करण्याकरीता सादर करणे आवश्यक राहील.
६) निविदाकारांनी तांत्रिक बोली मध्ये नमूद कागदपत्रे पीडीएफ फॉर्मेट मध्ये तांत्रिक बोलीच्या लिफाफ्यात सादर करावीत.
७) निविदाकारांकडे वर्ग II / III मान्यताप्राप्त प्राधिकरणाकडून मिळविलेली डीजीटल सिग्नेचर प्रमाणपत्रे असणे आवश्यक राहील.
८) कार्यकारी अभियंता ई-२ विभाग, मुं. इ. दु. व पू. मंडळ, यांचेकडे ( निविदा स्विकृती अधिका-यांकडे) निविदा स्विकारण्याचा अथवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार राहील.
९) निविदाकारांनी जीएसटी अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र अपलोड करणे बंधनकारक आहे
१०) ई निविदा कागदपत्रे व ई निविदा विषयक मार्गदर्शक सुचना http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावरून डाऊनलोड करता येतील. मदतीसाठी :१८००-३०७०-२२३२ Mail- eproc.support@maharashtra.gov.in
११) जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा कमी दरांचा असेल तर प्रथम न्युनतम देकार सादर करणा- यांनी अतिरिक्त सुरक्षा अमानत रक्कम ८ दिवसांच्या आत भरली नाही तर द्वितीय न्युनतम देकाराच्या निविदाकारास लेखी विचारणा करुन त्यांनी प्रथम न्युनतम पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असेल तर त्यांची निविदा मंजूर केली जाईल अतिरिक्त सुरक्षा अमानत बाबत सविस्तर सुचना पहावी

**CPRO/A/630**
Follow us: @mhadaofficial
सही/-
कार्यकारी अभियंता ई-२ विभाग, (अ.का.)
मुं. इ. दु. व पू. मंडळ, मुंबई
म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

**REMSONS**
INDUSTRIES LIMITED
**सीआयएन:** एल५११९००एमएच१९७१पीएलसी०१५१४१
**नोंदणी कार्यालय:** ४०१, ४ था मजला, गॅलेडीओला, हनुमान रोड विले पार्ले (पूर्व), मुंबई ४०००५७.
दूर क्र: ०२२-२६२६२१००., २६११२२३६८
ई - मेल आयडी: corporate@remsons.com,
संकेतस्थळ: www.remsons.com

**रेमसंस इंडस्ट्रीज लिमिटेडची ५२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की रेमसन्स इंडस्ट्रीज लिमिटेड ('कंपनी') च्या सदस्यांची ५२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम') शुक्रवार, २० सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११:३० (भाप्रवे) व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे ('व्हिसी') / इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यम ('ओएव्हीएम) कंपनी कायदा, २०१३ ('अधिनियम') च्या तरतुदींचे पालन करून, त्याखाली बनवलेले नियम, सेबी (सूचीबद्ध दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता ) विनियम, २०१५ आणि या संदर्भात कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय ('एमसीए') आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया ('सेबी') यांनी जारी केलेल्या सर्व लागू परिपत्रकांसह वाचले, सदस्यांच्या सामायिक ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थितीशिवाय, ५२ व्या एजीएमची सूचना दिनांकित १४ ऑगस्ट २०२४ मध्ये नमूद केल्यानुसार कामकाजावर विचारविनिमय करण्यासाठी वाजता आयोजित केली जाईल.
लागू असलेल्या एमसीए आणि सेबी च्या परिपत्रकांनुसार, ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या वार्षिक अहवालासह ५२ व्या एजीएमची सूचना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने फक्त त्या सदस्यांना पाठवली जाईल, ज्यांचे ई-मेल पत्ते नोंदणीकृत आहेत. कंपनी / रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट ('आरटीए') / डिपॉझिटरी सहभागी. वार्षिक अहवालाची हार्ड कॉपी पाठवण्याची आवश्यकता एमसीए आणि सेबी ने त्यांच्या संबंधित परिपत्रकांद्वारे पूर्ण केली आहे. वार्षिक अहवालासह ५१ व्या एजीएमची सूचना कंपनीच्या वेबसाइटवर देखील उपलब्ध असेल. www.remsons.com, स्टॉक एक्सचेंजची वेबसाइट म्हणजे बीएसई लि. उदा. www.bseindia.com, नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड उदा. www.nseindia.com आणि सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेडची वेबसाइट (५१ एजीएम दरम्यान रिमोट ई-व्होटिंग सुविधा आणि ई-व्होटिंग प्रणाली प्रदान करणारी एजन्सी) उदा. www.evotingindia.com.
सदस्य केवळ व्हिसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे ५२ व्या एजीएममध्ये सामील होऊ शकतात आणि सहभागी होऊ शकतात. ५२ व्या एजीएममध्ये सामील होण्याच्या तपशीलवार सूचना आणि ५२ व्या एजीएमच्या सूचनेमध्ये रिमोट ई-व्होटिंग किंवा ई-व्होटिंग सिस्टीमद्वारे मतदान करण्याची पद्धत ५२ व्या एजीएममध्ये देण्यात आली आहे. व्हीसी/ओएव्हीएमद्वारे सभेला उपस्थित राहणाऱ्या सदस्यांची गणना अधिनियमाच्या कलम १०३ अन्वये कोरम मोजण्याच्या उद्देशाने केली जाईल.
कंपनीने शुक्रवार, १३ सप्टेंबर २०२३ ही ५१ एजीएम आणि ई-व्होटिंगला उपस्थित राहण्यासाठी आणि ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी अंतिम लाभांश देण्यासाठी सभासदांचे हक्क निश्चित करण्यासाठी 'कट-ऑफ तारीख' निश्चित केली आहे. ५२ व्या एजीएममध्ये मंजूर केल्यास प्रदान करण्यासाठी निश्चित करण्यात आला आहे.
बँक खात्यांचे तपशील उपलब्ध नसल्यामुळे कंपनी कोणत्याही सदस्याला इलेक्ट्रॉनिक माध्यमातून लाभांश देण्यास असमर्थ असल्यास, कंपनी लाभांश वॉरंट/डिमांड ड्राफ्ट पोस्टाने पाठवेल. तथापि, साथीच्या आजारामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे टपाल सेवेत व्यत्यय आल्यास, पोस्टल सेवा पूर्ववत झाल्यावर ती पाठवली जाईल.
भौतिक स्वरूपात समभाग धारण करणाऱ्या सदस्यांना विनंती करण्यात आली आहे की त्यांनी ते कंपनीच्या आरटीएला म्हणजेच लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेडकडे द्यावे. ई-मेल पत्त्याची नोंदणी/अपडेट करण्याची तपशीलवार प्रक्रिया ५१ व्या एजीएमच्या सूचनेमध्ये प्रदान केली आहे.
सदस्यांना दूरस्थपणे किंवा ५२ व्या एजीएम दरम्यान इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीद्वारे ५१ व्या एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार व्यवसायावर मतदान करण्याची संधी असेल. ५१ व्या एजीएम दरम्यान रिमोट ई-व्होटिंग आणि ई-व्होटिंगची पद्धत ५१ व्या एजीएम च्या नोटिसमध्ये प्रदान केली आहे.
ई-वोटिंग प्रक्रियेशी संबंधित कोणत्याही शंका/तक्रारी श्री राकेश दळवी, वरिष्ठ व्यवस्थापक, सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड, ए विंग, २५ वा मजला, मॅरेथॉन फ्युचरेक्स, मफतलाल मिल कंपाउंड्स, एन एम जोशी मार्ग, लोअर परेल यांच्याकडे पाठवल्या जाऊ शकतात. (पूर्व), मुंबई-४०००१३ किंवा helpdesk.evoting@cdslindia.com वर ईमेल पाठवा किंवा ०२२-२३०५ ८५४२/४३ वर कॉल करा. सदस्य कंपनी सचिव आणि कंपनीच्या अनुपालन अधिकाऱ्याला ई-मेल आयडी वर देखील लिहू शकतात. cs@remsons.com किंवा वर नमूद केल्याप्रमाणे नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता.

**रेमसन्स इंडस्ट्रीज लि. करीता**
**सही/-**
**रोहित दोरजी**
**कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी**
**सभासद क्र. ए ३७०७७**
**ठिकाण: मुंबई**
**दिनांक: २८ ऑगस्ट २०२४**

हिंसेच्या मार्गाने एखादी गोष्ट साध्य होते तेव्हा ते यश तात्पुरते असते. त्यामुळे होणारे नुकसान मात्र दीर्घकालीन असते.



- महात्मा गांधी

वृत्तमानस

मुंबई, गुरुवार, २९ ऑगस्ट २०२४

# खड्ड्यात गेला असा महामार्ग

मुंबई- गोवा महामार्ग आणि खड्डे हे समीकरणच झालेलं आहे. पावसाळा आला की खड्डे पडणार आणि गणेशोत्सवासाठी पुन्हा ठिगळं लावून कोकणवासीयांच्या तोंडाला पानं पुसणार, हे नेहमीचंच झालेलं आहे. या महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या खड्डेरूप महामार्गाची पाहणी करून तातडीन उपाययोजना करण्याचे आदेश दिले असून, ही एक समाधानाची बाब मानली पाहिजे. असे असले तरी गेली कित्येक वर्षे रखडलेल्या या अत्यंत महत्त्वाच्या महामार्गाची चाळण का झाली याच्या मुळाशी जाणेसुद्धा महत्त्वाचे ठरते. या महामार्गाचे काम गेल्या तेरा वर्षांपासून रखडले आहे. या महामार्गावरील रस्त्याची अवस्था आणि त्यावरील खड्डे याची वारंवार चर्चा होत असते. या मार्गावरून प्रवास करणारे नागरिक या रस्त्याच्या अवस्थेबद्दल वारंवार प्रश्न उपस्थित करीत असतात. या रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत असल्याचेदेखील पाहायला मिळतं. पण तरीही या महामार्गाची अवस्था ही जैसे थे असल्याची तक्रार नेहमीच होते. धक्कादायक बाब म्हणजे या महामार्गावरील अपघाती मृत्यूंचा आकडा दोन हजार पार गेला असून, त्यात दररोज भरच पडत आहे. या रस्त्याची पुरती दाणादाण झाली असल्याचे चित्र आजही दिसते. दरवर्षी पहिल्याच पावसात या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडतात. हे प्रशासनाला माहीत असूनदेखील पावसाळ्यापूर्वी या रस्त्याची डागडुजी करणे क्रमप्राप्त असताना या रस्त्याकडे दुर्लक्ष झाल्याने ही परिस्थिती उद्भवली आहे. पेण तालुक्याला लागून जाणाऱ्या मुंबई गोवा महामार्गालगत वाशी नाका ते वडखळ या सर्व्हिस रोडकडे दुर्लक्ष झाल्याने आणि या रस्त्यावर खड्डेच खड्डे पडल्याने या रस्त्यावरून ये- जा करणाऱ्या दुचाकीस्वारांना याचा मोठा फटका बसतो. रस्त्यावरील खड्ड्यांमध्ये पावसाचे पाणी साठल्याने किती मोठा खड्डा आहे याची कल्पनादेखील येत नसल्याने अनेक वेळा दुचाकीस्वार गाडीवरून पडण्याच्या घटना नेहमीच घडतात. मुजोर ठेकेदार, बेफिकीर अधिकारी आणि ढिम्म राजकारणी नेतेमंडळींच्या दुर्लक्षामुळे मुंबई-गोवा महामार्गाचे खड्ड्यांचे विघ्न संपलेले नसून, या महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. काही ठिकाणी अर्धवट काँक्रीटीकरण करून काम सोडून दिले आहे. साइडपट्ट्या अर्धवट अवस्थेत आहेत. गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे कोकणात गणेशोत्सवासाठी जाताना या गणेशभक्तांना विविध प्रकारच्या त्रासाला सामोरे जावे लागणार आहे. विशेष म्हणजे या महामार्गावरील खड्डे भरपावसात भरण्याची ठेकेदाराने लढवलेली शक्कल पूर्णपणे फेल गेली असून, खड्ड्यात टाकलेले डांबर आणि खडी पावसाच्या पाण्यात विरघळली की काय, अशा प्रकारची चर्चा येथे नेहमीच केली जाते. मुंबई- गोवा महामार्गाचा पळस्पे ते इंदापूर हा पहिला टप्पा २०११ साली सुरू झाला. त्यामुळे कोकणात जाणाऱ्या चाकरमानी व प्रवाशांना आनंद झाला होता. मात्र महामार्गाच्या कामाला १७ वर्षे पूर्ण होत आली तरी प्रवासी आजपर्यंत सुखकर प्रवासापासून वंचित आहेत. दरवर्षी गणेशोत्सव जवळ आला की बांधकाम मंत्री, संबंधित नेते, स्थानिक आमदार आदी लोकप्रतिनिधी या महामार्गाची पाहणी करून गणेशोत्सवापूर्वी हे खड्डे भरण्यात येणार असल्याची केविलवाणी घोषणा करीत असतात. मुंबई-गोवा महामार्गाने रोज प्रवास करणाऱ्या चालकांना, प्रवाशांना पाठदुखी, कंबरदुखी, मानदुखी यासारखे आजार जडले आहेत. मात्र नेहमी येतो पावसाळा या उक्तीप्रमाणे दरवर्षी या महामार्गावरून गणेशभक्तांना खड्ड्यातूनच प्रवास करावा लागत असल्याने लोकप्रतिनिधींबाबतदेखील या प्रवासी आणि वाहनचालक नेहमी नाराजी व्यक्त करतात. असे असूनही त्यावर काहीही ठोस उपाययोजना होत नाही हे दुर्दैवी. मुंबईतून तळकोकणात जाण्यासाठी सगळ्यात महत्त्वाचा मार्ग म्हणून मुंबई-गोवा महामार्ग ओळखला जातो. कोकणातील व्यापारी बंदरे, औद्योगिक वसाहती आणि पर्यटनाच्या दृष्टीने या महामार्गाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. अरुंद रस्ता, नागमोडी वळणे, तीव्र उताराचे घाट, महामार्गावरील वाहनांची वाढती संख्या, त्यामुळे होणारे अपघात या कारणांमुळे या ४५० किलोमीटर लांबीच्या महामार्गाचे चौपदरीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला होते. पळस्पे ते इंदापूर या टप्प्यातील महामार्गाचे काम २०११ मध्ये, तर इंदापूर ते झारापदरम्यानचे काम २०१४ मध्ये सुरू करण्यात आले होते. सुरुवातीला पळस्पे ते इंदापूर हे काम डांबरीकरणाच्या माध्यमातून तर इंदापूर ते झाराप हे काम काँक्रीटीकरणाच्या माध्यमातून होणार होते. नंतर मात्र संपूर्ण महामार्गाचे काम काँक्रीटीकरणाच्या माध्यमातून करण्याचा निर्णय घेण्यात आला. उपलब्ध माहितीनुसार महामार्ग बनविण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या काँक्रीट, रेती, खडी आणि इतर सामानाचा दर्जा तपासणारी यंत्रणा महामार्ग प्राधिकरणाकडे आहे का? महामार्ग प्राधिकरणाच्या अभियंत्यांच्या काम करण्याच्या प्रणालीवर आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पूर्वी मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरण करण्याचा ठेका हा डांबरापासून बनविण्याचा काढण्यात आला होता. डांबर आणि कामाच्या सुमार दर्जामुळे या अर्धवट बनलेल्या महामार्गाला वारंवार खड्डे पडत असल्याने येथील राजकारणी आणि नेतेमंडळींनी सिमेंट काँक्रीटच्या महामार्गात रस दाखवला. त्यामुळे या महामार्गाच्या कामाचा ठेका ३-४ पटीने वाढवून मागील दोन वर्षांपासून काँक्रीटीकरणाच्या कामाने वेग घेतला. मात्र झोपेचे सोंग घेतलेल्या महामार्ग प्राधिकरणाला या सिमेंट काँक्रीटची गुणवत्ता तपासण्यास वेळ मिळत नसल्याने या मार्गाची वाताहात झाल्याचा आरोप होतो. सुरुवातीला महामार्गाच्या भूसंपादनामध्ये अडचणी आल्या. शेतकऱ्यांच्या विरोधामुळे भूसंपादन प्रक्रिया लांबली. नंतर भूसंपादनाचा मोबदला देण्यास उशीर झाल्याने जागेचा ताबा मिळण्यास विलंब झाला. कर्नाळा अभयारण्यातून हा महामार्ग जात असल्याने पर्यावरण विभागाची परवानगी मिळण्यात अडचणी आल्या. नंतर ठेकेदाराची दिवाळखोरी आडवी आली. हे काम विहित मुदतीत पूर्ण करता यावे यासाठी ५४० कोटींचा निधी वन टाइम इन्फ्युजन स्किम अंतर्गत उपलब्ध करून दिला. पण त्यानंतरही ठेकेदाराने काम पूर्ण न केल्याने त्याला बडतर्फ करण्याचा निर्णय घेण्यात आला. या बडतर्फीनंतर ठेकेदाराने हे प्रकरण न्यायालयात नेले. न्यायालयीन प्रक्रियेत दोन वर्षांचा कालावधी गेला. अखेर सर्वोच्च न्यायालयाने फेब्रुवारी २०२२ मध्ये ठेकेदाराचा दावा अमान्य केला. यानंतर नवीन ठेकेदार नेमून ही कामे पुन्हा सुरू करण्यात आली. एक दशकाहून अधिकचा काळ लोटला तरी मुंबई-गोवा महामार्गाच्या रखडलेल्या, अर्धवट कामाचा नाहक फटका कोकणवासीयांना अद्याप सहन करावा लागत आहे. त्यामुळे गणेशचतुर्थी असो वा आगामी होळी, या मार्गावरील विघ्न आणि सरकारी शिमगाही संपत नाही. या महामार्गाच्या कामाचे भिजत घोंगडे कायम राहिले आहे आणि ते काम आटोक्यात येण्याचे अजूनही चिन्ह दिसत नाही. वडखळ ते गडब, नागोठणे ते कोलाड, इंदापूर ते माणगाव, टोळ ते महाड आणि महाड ते पोलादपूरदरम्यानही या मार्गावरील परिस्थिती बिकटच म्हणावी लागेल. तसेच बांधकामाच्या अयोग्य नियोजनामुळे पावसाळ्यात या मार्गावर पाण्याचा निचरा होणे कठीण जाते. त्यामुळे पेणसह आजूबाजूच्या अनेक गावांना पुराचाही धोका संभवतो. याबाबतच्या तक्रारींची दखल घेऊन कार्यवाही करण्याचे निर्देश राज्य सरकारने कोकण विभागाला दिले आहेत. या कामाची फेरतपासणी घेणे आवश्यक आहे. कोकणवासीयांवरचा हा अन्याय दूर करण्यासाठी सरकारने हे काम लवकर व चांगल्या दर्जाचे करून असुरक्षिततेची भीती दूर करायला हवी.

# वाढवण असणार जगातील 10 मोठ्या बंदरापैकी एक

**पालघर जिल्ह्यातील वाढवण येथे बंदराच्या उभारणीसाठी ७६ हजार २०० कोटी रु. खर्चाच्या प्रकल्पाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिली...**

महाराष्ट्रात वाढवण बंदर उभारणी करण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. राज्याच्या विकासासाठी ही अत्यंत महत्त्वाची घटना असून त्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्रिमंडळाचे क्रीडा, युवक कल्याण व बंदरे विकास मंत्री संजय बनसोडे यांनी आभार मानले आहेत.

जगातील १० मोठ्या बंदरापैकी वाढवण हे एक मोठे बंदर असणार आहे. या प्रकल्पामुळे राज्यात मोठ्याप्रमावर आर्थिक विकासाला चालना मिळणार आहे. तसेच प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अशी सुमारे १२ लाख रोजगार निर्मिती होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. बंदराकरिता रस्ते व रेल्वे जोडणी उपलब्ध करुन देण्यासाठी करावयाच्या भूसंपादनामुळे कोणत्याही गावाचे स्थलांतर करण्याचे नियोजित नाही. तसेच, प्रस्तावित बंदरामुळे मासेमारीवर होणाऱ्या परिणामांचा सेंट्रल मरीन फिशरीज् रिसर्च इन्स्टिट्यूट (CMFRI) या केंद्र शासनाच्या संस्थेकडून अभ्यास करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने, प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या मच्छिमारांशी सल्लामसलत करुन मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भात महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.



## स्थानिक नागरिकांच्या आर्थिक विकासाचे नवीन दालन खुले होणार

वाढवण परिसरातील स्थानिक मत्स्यव्यवसाय करणाऱ्या व या व्यवसायाशी संबंधीत सर्व घटकांचे पुनर्वसन तसेच त्यांना योग्य तो मोबदला देण्यात येणार आहे. कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यात येऊन रोजगाराच्या नव-नवीन संधी निर्माण करण्यासाठी राज्य शासन प्रयत्न करणार आहे. वाढवण बंदरामुळे राज्याला तसेच स्थानिक नागरिकांना आर्थिक विकासाचे नवीन दालन खुले होणार आहे.

## केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा अनुक्रमे 74 व 26 टक्के

वाढवण बंदर हे जे. एन. पी.टी. व महाराष्ट्र सागरी मंडळ यांच्या संयुक्त भागीदारीतून होणार आहे. या बंदर प्रकल्पाची किंमत ७६,२०० कोटी रुपये इतकी आहे. यामध्ये केंद्र आणिराज्य शासनाचा हिस्सा अनुक्रमे ७४ व २६ टक्के असा असणार आहे.लवकरात लवकर बंदराची उभारणीस सुरुवात होणार आहे.

## वाढवण बंदराची आवश्यकता

जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणाचे (जेएनपीए) विस्तारीकरण होऊन, न्हावा शेवा बंदरातील पद्धतींमधील कार्यक्षमता वाढवली तरी त्या बंदरात सध्या हाताळणी होणाऱ्या सुमारे साडेसहा दशलक्ष कंटेनर (ट्वेंटी फीट इक्विव्हॅलन्ट युनिट : 'टीईयू') चे प्रमाण १० दशलक्ष टीईयूपर्यंतच पोहोचू शकेल. अशा स्थितीत देशातील निर्यात व आयात क्षेत्रात होणारी वाढ पाहता भविष्याच्या दृष्टिकोनातून जवळपास दुसऱ्या बंदराची उभारणी आवश्यक ठरली.

## वाढवणची नैसर्गिक खोली बंदरासाठी अनुकूलता

जेएनपीए येथे सध्या १५ मीटरची खोली प्राप्त असून त्या ठिकाणी १७ हजार कंटेनर (टीईयू) क्षमता असणाऱ्या जहाजांची नांगरणी शक्य होणार आहे. वाढवण येथे १८ ते २० मीटरची नैसर्गिक खोली प्राप्त असून २४ हटेन क्षमतेपेक्षा अधिक जहाजांची बंदर, 7/12 शक्य होईल; त्यामुळे भारताचे सिंगापूर, कोलंबो व इतर आंतरराष्ट्रीय बंदरांवरील अवलंबित्व संपुष्टात येईल. शिवाय वाढवण हे 'इंडियन मिडल ईस्ट युरोप इकॉनॉमिक कॉरिडॉर' व 'इंटरनॅशनल नॉर्थ साऊथ ट्रान्स्पोर्टेशन कॉरिडॉर' या आंतरराष्ट्रीय नौकानयन मार्गालगत असल्याने आयात निर्यातीसाठी सोयीचे ठिकाण ठरेल.

## वाढवण बंदर खर्च

भूसंपादनाच्या घटकासह एकूण प्रकल्पाची किंमत 76,220 कोटी रुपये आहे. यामध्ये पीपीपी नुसार मुख्य पायाभूत सुविधा, टर्मिनल आणि इतर व्यावसायिक पायाभूत सुविधांचा समावेश असेल. बंदराच्या पायाभूत सुविधांमध्ये प्रत्येकी 1000 मीटर लांबीचे 9 कंटेनर टर्मिनल, 4 बहुउद्देशीय बर्थ, 4 लिक्विड कार्गो बर्थ, एक रो- रो बर्थ, एक कोस्टल कार्गो बर्थ आणि एक कोस्ट गार्ड बर्थ यांचा समावेश आहे. या प्रकल्पामध्ये ऑफशोअर क्षेत्रात 1,448 हेक्टर क्षेत्र पुनर्संचयित करणे आणि 10.14 किमी ब्रेकवॉटर, कंटेनर/कार्गो स्टोरेज क्षेत्रांचे बांधकाम समाविष्ट आहे. मंत्रिमंडळाने बंदर आणि राष्ट्रीय महामार्गांदरम्यान एमओआरटीएचद्वारे रस्ते कनेक्टिव्हिटी स्थापित करण्यास आणि विद्यमान रेल्वे नेटवर्कशी रेल्वे जोडणी आणि एमओआरद्वारे आगामी समर्पित रेल फ्रेट कॉरिडॉरला मंजुरी दिली आहे.

**राजू धोत्रे**
**विभागीय अधिकारी**

## शाश्वत सागरी क्षेत्राला प्रोत्साहन

भारताची व्यापार धोरणे आणि सागरी वाहतूक क्षेत्रातील घडामोडींमुळे देशात कंटेनरीकरणाची उच्च वाढ झाली आहे. ग्लोबल मेरिटाइम इंडिया समिट दरम्यान लॉन्च करण्यात आलेल्या सर्वसमावेशक रोडमॅपसह भारताचे सागरी क्षेत्र बदलणार आहे. बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाने तयार केलेले अमृत काल व्हिजन 2047, मेरीटाइम इंडिया व्हिजन 2030 वर तयार केले आहे आणि जागतिक दर्जाची बंदरे विकसित करणे आणि अंतर्देशीय जलवाहतूक, किनारपट्टी शिपिंग आणि शाश्वत सागरी क्षेत्राला प्रोत्साहन देणे हे उद्दिष्ट आहे. पश्चिम किनाऱ्यावरील तीन प्रमुख कंटेनर हाताळणी बंदरांची क्षमता 2029 पर्यंत पूर्णतः वापरली जाईल आणि क्षमता 24 दशलक्ष TEU च्या मर्यादेपर्यंत आवश्यक असून ही क्षमता वाढवण बंदरातून पूर्ण करणे अपेक्षित आहे.

## वाढवण बंदराच्या विकासामुळे भारत जगातील टॉप 10 कंटेनर बंदरांपैकी एक

वाधवन येथील प्रस्तावित सखोल मसुदा सर्व-हवामान प्रमुख बंदर राष्ट्रीय कंटेनर हाताळणी क्षमतेत 23.2 दशलक्ष TEUs ने वाढ करेल आणि 24,000 TEU वाहून नेण्यास सक्षम असलेल्या मेगा आकाराच्या कंटेनर जहाजांना कॉल करण्याची सुविधा देईल. वाढवण बंदराच्या विकासामुळे भारत जगातील टॉप 10 कंटेनर बंदरांपैकी एक होईल. तयार केलेली क्षमता IMEC (इंडिया मिडल ईस्ट युरोप इकॉनॉमिक कॉरिडॉर) आणि INSTC (इंटरनॅशनल नॉर्थ साउथ ट्रान्सपोर्टेशन कॉरिडॉर) द्वारे EXIM व्यापार प्रवाहाला देखील मदत करेल. सुदूर पूर्व, युरोप, मध्य-पूर्व, आफ्रिका दरम्यान आंतरराष्ट्रीय शिपिंग लेनवर चालणाऱ्या मेनलाइन मेगा जहाजे हाताळण्यास सक्षम अत्याधुनिक टर्मिनल सुविधा निर्माण करण्यासाठी जागतिक दर्जाच्या सागरी टर्मिनल सुविधा, सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPP) ला प्रोत्साहन देणे, कार्यक्षमता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ घेणे सुकर होणार आहे.

## ग्रीन पोर्ट उपक्रम

या प्रकल्पाच्या केंद्रस्थानी पर्यावरणीय कारभारीपणाची बांधिलकी आहे. वाढवण बंदराच्या विकासाची कल्पना "ग्रीनफिल्ड" उपक्रम म्हणून करण्यात आली आहे, ज्यामध्ये शाश्वत पद्धती आणि स्थानिक परिसंस्थांना कमीत कमी व्यत्यय येण्यावर भर देण्यात आला आहे. वाढवण येथील प्रस्तावित बंदराचे उद्दिष्ट अक्षय ऊर्जेचा अवलंब करण्यापासून ते जहाजांसाठी किनाऱ्यावरील उर्जासारख्या कार्यक्षम बंदर ऑपरेशन्सपर्यंत शाश्वत उपायांचा समावेश करणे आणि बंदर परिसंस्थेमध्ये फक्त इलेक्ट्रिकल किंवा ग्रीन इंधन वाहतूक वाहनांना परवानगी दिली जाईल. हरित उपक्रम आणि नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा स्वीकार करून, VPPL एक शाश्वत आणि समृद्ध भविष्याची सुरुवात करून, शून्य उत्सर्जन बंदर बनून भारतातील बंदर विकासासाठी नवीन बेंचमार्क सेट करण्याची आकांक्षा बाळगते.

प्रकल्प विकासामुळे रोजगाराच्या संधी निर्माण होतील आणि टर्मिनलचे बांधकाम आणि कार्यान्वित करताना स्थानिक तरुणांना कौशल्य निर्माण करण्यात मदत होईल आणि ज्या मच्छीमारांच्या जीवनमानावर विपरित परिणाम होईल त्यांना राज्य सरकारच्या धोरणांनुसार भरपाई दिली जाईल. या प्रकल्पामुळे पुढील आर्थिक क्रियाकलापांमध्ये भर पडेल आणि 10,00,000 हून अधिक व्यक्तींना प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

वाढवण बंदराच्या धोरणात्मक स्थानामुळे कंटेनर वाहतुकीची सोय होईल. हे बंदर आंतरराष्ट्रीय आणि भारतीय किनारपट्टीवर पूल करेल ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर अर्थव्यवस्थांना गती मिळेल आणि कमी होईल. याशिवाय, वापी, इंदूर, कर्नाटक आणि महाराष्ट्रातील उद्योगांच्या EXIM गरजा पूर्ण करणार आहेत.

जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण (जनेपप्रा) हे भारतातील प्रमुख कंटेनर हाताळणी बंदरांपैकी एक आहे. २६ मे १९८९ रोजी स्थापन झाल्यापासून, 'जनेपप्रा' ने बल्क कार्गो टर्मिनलमधून देशातील प्रमुख कंटेनर बंदरात रूपांतर केले आहे. अशा प्रकारे, 'जनेपप्रा' च्या समृद्ध अनुभवाचा फायदा घेत, भारत सरकारने प्रकल्पाच्या अंमलबजावणीची जबाबदारी जनेपप्रा वर सोपवली आहे. सध्या, 'जनेपप्रा' पाच कंटेनर टर्मिनल्स चालवते एनएसएफटी (NSFT), एनएसआयसीटी (NSICT), एनएसआयजीटी (NSIGT), बीएमसीटी (BMCT) आणि एपीएमटी (APMT) बंदरात सामान्य मालवाहतुकीसाठी उथळ पाण्याचा बर्थ देखील आहे. जेएनपीटीए पोर्टवर उपस्थित असलेले लिक्विड कार्गो टर्मिनल बीपीसीएल-आयओसीएल कन्सोर्टियमद्वारे व्यवस्थापित केले जाते. याव्यतिरिक्त, नव्याने बांधलेला किनारी धक्का इतर भारतीय बंदरांना जोडतो आणि किनारपट्टीवरील कंटेनरची वाहतूक वाढवण्यास सुलभ करतो. २७७ हेक्टर जमिनीवर वसलेले, JNPA भारतातील निर्यात-केंद्रित उद्योगांना चालना देण्यासाठी, अत्याधुनिक पायाभूत सुविधांसह, काळजीपूर्वक डिझाइन केलेले बहु-उत्पादन सेफ (SEZ) देखील चालवते. ●

# हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद

**मेजर** ध्यानचंद मैदानी हॉकीपटू हे आतापर्यंतचे सर्वोत्कृष्ट खेळाडू असल्याचे अनेकांचे मत आहे. ध्यानचंद यांचा जन्म 29 ऑगस्ट 1905 रोजी अलाहाबाद येथे कुशवाह राजपूत कुटुंबात झाला. ते रामेश्वर सिंह आणि शारदा यांचे पुत्र होते. मूल सिंग आणि रूप सिंग हे ध्यानचंद यांचे दोन भाऊ. नंतरचे एक हॉकीपटू तसेच, फील्ड हॉकीमध्ये भारतासाठी स्पर्धा केली आणि 1932 आणि 1936 ऑलिम्पिकमध्ये सुवर्ण पदके जिंकली. चंदच्या वडिलांनी ब्रिटिश भारतीय सैन्यात सेवा दिली, जिथे ते हॉकी संघाचे सदस्य होते. चंद त्याच्या अपवादात्मक चेंडू हाताळणी आणि गोल करण्याच्या कौशल्यासाठी प्रसिद्ध होते. या विजयांच्या पलीकडे, त्याचा प्रभाव 1928 ते 1964 दरम्यान झालेल्या आठ ऑलिम्पिकमध्ये दिसून येतो, जिथे भारताने सात वेळा फील्ड हॉकी स्पर्धा जिंकली.

राष्ट्रीय क्रीडा दिन हा विविध देशांमध्ये राष्ट्रीय क्रीडा संघ आणि त्या देशांच्या क्रीडा परंपरांचा सन्मान करण्यासाठी साजरा केला जाणारा सार्वजनिक सुट्टीचा दिवस आहे. या दिवशी विविध वयोगटातील लोक खेळांमध्ये भाग घेतात. दरवर्षी 29 ऑगस्ट रोजी भारतात हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या स्मरणार्थ जयंती दिवशी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जातो. ध्यानचंद या दिवशी जन्मलेल्या सर्वकालीन महान हॉकी खेळाडूंपैकी एक. हा दिवस भारतासाठी ऑलिम्पिकमध्ये तीनदा सुवर्णपदक जिंकणारे हॉकीपटू मेजर ध्यानचंद सिंग यांचा वाढदिवस आहे. त्यांच्या आत्मचरित्र 'गोल्स' नुसार त्यांनी त्यांच्या कारकिर्दीत 1926 ते 1949 मध्ये 900 गोल केले. त्यांनी त्यांच्या घरच्या आणि आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत 185 सामन्यांमध्ये 570 गोल केले. 1956 मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मभूषण, भारतातील तिसरा-सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान केला, त्याच वर्षी ते मेजर पदासह सैन्यातून निवृत्त झाले.

राष्ट्रीय क्रीडा दिन विविध स्पर्धा, क्रीडा कार्यक्रम आणि शाळा, महाविद्यालये आणि क्रीडा संघटनांमध्ये उपक्रमांसह साजरा केला जातो. इव्हेंटमध्ये वारंवार मॅरेथॉन, शाळांमधील फिटनेस स्पर्धा, ॲथलीट श्रद्धांजली समारंभ आणि फिटनेस आव्हाने यांचा समावेश होतो. यावर्षी राष्ट्रीय क्रीडा दिन ची थीम 'प्रमोशन आणि शांततापूर्ण आणि समावेशक समाजासाठी खेळ' आहे. ही थीम ॲथलेटिक्स सामाजिक बंधने कशी मजबूत करू शकतात, व्यक्तींना एकत्र आणू शकतात आणि सर्वसमावेशकता आणि शांतता वाढवण्यासाठी समुदायांना आवश्यक असलेली साधने कशी देऊ शकतात यावर प्रकाश टाकते.

मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार हा भारतातील खेळ जगतातला सर्वात उच्च पुरस्कार आहे. ध्यानचंद पुरस्कार अधिकृतपणे क्रीडा व खेळांमधील 'ध्यानचंद जीवन गौरव पुरस्कार' हा खेळ जगतातील आजीवन कर्तृत्वासाठीचा भारतीय सरकार तर्फे देण्यात येणारा पुरस्कार आहे. 1926 ते 1948 या काळातील 20 वर्षांपेक्षा जास्त कारकिर्दीत 1000 पेक्षा अधिक गोल नोंदविणाऱ्या भारतीय हॉकीपटू ध्यानचंद यांच्या नावावर हा पुरस्कार देण्यात आला आहे. हा पुरस्कार दरवर्षी क्रीडा व युवा मंत्रालयाद्वारे सादर केला जातो. पहिला पुरस्कार हा 2002 साली देण्यात आला होता. ह्या पहिल्या पुरस्काराचे मानकरी होते शाहूराज बिराजदार (मुष्टियुद्ध), अशोक दिवाण (हॉकी) आणि अपर्णा घोष (बास्केटबॉल). दरवर्षी हा पुरस्कार 3 ते 5 खेळाडूंना देण्यात आला आहे.



आंतरराष्ट्रीय हॉकीमध्ये मेजर ध्यानचंद हे दिग्गज होते. 1928, 1932 आणि 1936 च्या उन्हाळी ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकून भारताच्या पहिल्या ऑलिम्पिक हॅट्ट्रिकमध्ये त्याने महत्त्वाची भूमिका बजावली. ध्यानाला "चांमद" म्हणून ओळखले जात असे कारण तो दिवसभराच्या नियमित कामानंतर रात्री हॉकीचा सराव करत असे. त्याच्या कलेबद्दलचे समर्पण दाखवून खेळाडूंचे आश्चर्यकारक पराक्रम आणि त्यांचा समाजावर खोल प्रभाव, त्यांच्या वचनबद्धतेची आणि अपवादात्मक कामगिरीची आठवण करून देणारा हा महत्त्वाचा दिवस आहे. क्रीडा जगतात अमिट छाप सोडणाऱ्या खेळाडूंनाही हा दिवस श्रद्धांजली अर्पण करतो.

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आम्ही भारतीय खेळाडूंच्या कर्तृत्वाचा गौरव करतो आणि आपल्या संस्कृतीतील खेळांच्या मूल्याबद्दल जागरुकता निर्माण करतो. याशिवाय मेजर ध्यानचंद यांच्या वारशाचा आणि भारतीय खेळांसाठीच्या त्यांच्या बांधिलकीचा सन्मान करण्याचा हा दिवस आहे. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त देशभरात अनेक क्रीडा उपक्रम होतात. वय, लिंग किंवा क्षमता पातळी विचारात न घेता, कोणीही या इव्हेंटमध्ये सहभागी होऊ शकतो. लोकांना खेळांमध्ये सहभागी होण्यासाठी आणि निरोगी आणि सक्रिय जीवनशैलीला प्रोत्साहन देणे हे ध्येय आहे. राष्ट्रीय क्रीडा दिनी प्रमुख ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार भारताच्या राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान केले जातात. ज्या खेळाडूंनी क्रीडा क्षेत्रात अपवादात्मक कामगिरी केली आहे ते ही पारितोषिके मिळविण्यास पात्र आहेत, जे भारतीय क्रीडा क्षेत्रातील सर्वात मोठे सन्मान आहेत.

राष्ट्रीय क्रीडा दिन हा ॲथलेटिसिझम, सांघिक कार्य आणि खिलाडूवृत्तीचा देशव्यापी उत्सव असल्याचे वचन देतो. दिवंगत भारतीय हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांना सन्मानित करणाऱ्या या वार्षिक सोहळ्यात, सक्रिय आणि निरोगी जीवनशैलीला चालना देण्यासाठी खेळाचे महत्त्व मान्य करण्यासाठी देशभरातील समुदाय एकत्र येतील. युनिव्हर्स पब्लिक स्कूल राष्ट्रीय क्रीडा दिन 2024 मोठ्या उत्साहात आणि जोमाने साजरा करण्यासाठी सज्ज आहे. विद्यार्थ्यांच्या जीवनात खेळ आणि शारीरिक तंदुरुस्तीच्या मूल्यावर भर देण्यासाठी या वर्षीच्या उत्सवाचा भाग म्हणून अनेक रोमांचकारी कार्यक्रम आणि उपक्रम आयोजित केले जातील. राष्ट्रीय क्रीडा दिन हा खेळाडूंच्या भावनेचा आणि शारीरिक तंदुरुस्तीच्या महत्त्वाचा उत्सव आहे. संघटित होण्याची, आमच्या खेळाडूंना पाठिंबा देण्याची आणि क्रीडा नायकांच्या आगामी पिढीला प्रेरित करण्याची ही वेळ आहे. त्यांचा वाढदिवस साजरा करण्यासाठी, भारताने 2012 मध्ये राष्ट्रीय क्रीडा दिनाची स्थापना केली. क्रीडा नायकाला श्रद्धांजली अर्पण करणे आणि शारीरिक तंदुरुस्ती आणि आरोग्यावर भर देऊन, दैनंदिन जीवनातील खेळांच्या मूल्याबद्दल जनजागृती करणे हे या उत्सवाचे उद्दिष्ट आहेत. या दिवशी, प्रमुख क्रीडा तारे भारताच्या राष्ट्रपतींकडून खेलरत्न, अर्जुन, द्रोणाचार्य आणि ध्यानचंद पुरस्कार यासारखे महत्त्वाचे पुरस्कार प्राप्त करतात. ध्यानचंद यांचा मृत्यू 3 डिसेंबर 1979 रोजी झाला. आज त्यांच्या जयंती निमित्त सर्वांना 'राष्ट्रीय क्रिडा दिनाच्या' हार्दिक शुभेच्छा !

**- सुदाम खारकर**

## वशेणी इतिहास संपादकीय मंडळाचा वर्धापनदिन साजरा

**उरण :** जनसेवेतून आनंद देणा-या वशेणी इतिहास संपादकीय मंडळाचा सहावा वर्धापनदिन विविध सामाजिक उपक्रम साजरे करून उत्साहात संपन्न झाला.या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य रायगडभूषण प्रा.एल. बी .पाटील होते. या वेळी त्यांनी मंडळाच्या कार्याचा गौरव करताना जे काम सरकारचे आहे,जे काम स्थानिक स्वराज्य संस्थाचे आहे ते काम आज वशेणी इतिहास संपादकीय मंडळ करत आहे. टाकला संवर्धन,समुद्र किना-याचा अभ्यास, जेष्ठनागरिकांना सिटिंग बेंचेस, पाणी साठवण , एकादशी साज-या करणे या सारख्या छोट्या छोट्या उपक्रमातून जनसेवेचा आनंद देणारे आणि गावाचा इतिहास लिहिणारे हे एकमेव मंडळ आहे. असे गौर उद्गार काढले. सदर कार्यक्रमास उरण पंचायत समिती शिक्षण विभागाच्या डाटा ऑपरेटर निलम पाटील, उरण शिक्षक पतपेढीच्या चेअरमन शर्मिला गावंड, डी.एस.स्कूल कला सायन मुंबई चे तानाजी मांगले,अहमदनगर जिल्हा सामाजिक कार्यकर्ते बच्चा ओमप्रकाश मल्लिकार्जुन, ग्रामपंचायत सदस्य सुनिल ठाकूर, सेवानिवृत्त मुख्याध्यापक सदाशिव पाटील, गजानन गावंड आदि मान्यवर उपस्थित होते.



## म ह त्वा चे

### पलावा येथे वाहनांच्या काचा फोडल्या

**डोंबिवली :** शिळफाटा रस्त्यावरील रुणवाल गार्डन, पलावा या गृहसंकुलातील तीन रहिवाशांच्या मोटारींच्या काचा अज्ञात चोरट्याने सोमवारी संध्याकाळी फोडून मोटारीमधील कारटेप आणि सामान असा मिळून दोन लाख ९५ हजार रूपयांचा ऐवज चोरट्याने चोरून नेला आहे. पलावा, रुणवाल गार्डन येथे भक्कम सुरक्षा कडे आणि सुरक्षा रक्षक तैनात असताना या घटना घडल्याच कशा, असा प्रश्न रहिवाशांकडून उपस्थित करण्यात आला आहे. आर गॅलरी रुणवाल गार्डन, कासारिओ स्मशानभूमीजवळ पलावा येथे या घटना घडल्या आहेत. या घटनेप्रकरणी कासाबेला, पलावा येथील सवाना सोसायटीत राहणारे देवेंद्र बाळकृष्ण शहाणे यांनी मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. पोलिसांनी सांगितले, पलावा वसाहतीत राहणारे देवेंद्र शहाणे यांची वॅगनॉर कार त्यांनी ते राहत असलेल्या सोसायटीच्या तळ मजल्याला वाहनतळावर उभी करून ठेवली होती. त्याच बरोबर त्यांच्या सहकाऱ्यांच्या दोन मोटारी आर गॅलरी येथे वाहनतळावर उभ्या करून ठेवण्यात आल्या होत्या. सोमवारी संध्याकाळी साडे तीन नंतर अज्ञात चोरट्याने वाहनतळाच्या जागेत प्रवेश केला.

### नवी मुंबईत वीस लाखांचे हेरॉईन जप्त

**नवी मुंबई :** नवी मुंबई पोलिसांनी हेरॉईन हा अंमलीपदार्थ विक्री प्रकरणी दोन पुरुष आणि एका महिलेस अटक केले आहे. त्यांच्याकडे १०० ग्रॅम वजनाचे हेरॉईन आढळून आले असून त्याचे मूल्य वीस लाख आहे. ही कारवाई अंमली पदार्थ विरोधी पथकाने केली आहे. तुर्भे एमआयडीसीतील प्रेमनगर येथील नवजीवन शाळेनजीक असणाऱ्या एका घरातून अंमली पदार्थ पुरवले जात आहेत अशी माहिती पोलीस हवालदार गणेश पवार यांना मिळाली. या माहितीच्या आधारे सहाय्यक पोलीस आयुक्त, भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत नायडु, पोलीस हवालदार रमेश तायडे, उत्तम लोंखडे, गणेश पवार, पोलीस शिपाई योगिता शेळके, अर्चना पाटील, अंनत सोनकुळ, या पथकाने या ठिकाणी छापा घातला. पथकाच्या हाती तीन आरोपी लागले असून त्यात एका महिलेचा समावेश आहे. आरोपींकडे २० लाख रुपये किमतीचा १०० ग्रॅम वजनाचा हेरॉईन हा अंमली पदार्थ आढळून आला.

# बदलापूर अत्याचार प्रकरणानंतर राज ठाकरेंनी केलेला दौरा काही मिनिटात आटोपला

## पोलिसांना विना अडथळा काम करू देण्यावर शेअर केली पोस्ट

प्रतिनिधी
■ बदलापूर

बदलापूर येथील शाळेत दोन चिमुरडीवर झालेल्या अत्याचाराच्या प्रकरणानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पोलीस आणि राज्य सरकार विरोधात संताप व्यक्त केला होता. अशातच राज ठाकरे बुधवारी बदलापूर दौऱ्यावर आले होते. त्यावेळी त्यांनी स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून कुटुंबीयांशी संवाद साधला. त्यावेळी राज ठाकरे यांनी रिकाम्या खुर्च्या पाहिल्या अन् 10 मिनिटांत बदलापूर दौरा आटोपला. मात्र, राज ठाकरेंनी सोशल मीडियावर पोस्ट करत राज ठाकरेंनी भावना व्यक्त केल्या.

बदलापूरची दुर्दैवी घटना आहे. महाराष्ट्र नवनिर्माण महिला सेनेच्या पदाधिकारी संगीता चेंदवणकर आणि महिला सेनेच्या इतर पदाधिकाऱ्यांनी ही घटनाउघडकीस आणली, त्या



दुर्दैवी पालकांच्या कुटुंबियांना आधार दिला. या घटनेच्या आसपास मी नवनिर्माण यात्रेच्या दरम्यान विदर्भात होतो. यामुळे महाराष्ट्र सैनिकांशी आणि इतरांशी फोनवर संवाद साधला. आज मात्र बदलापूरला जाऊन, तिथल्या महाराष्ट्र सैनिकांशी, तिथल्या स्थानिकांची जाऊन भेट घेतली, असं राज ठाकरे म्हणाले.

बदलापूरची घटना, त्यावर एका महिला पोलीस अधिकाऱ्याने (पोलीस अधिकारी महिला असून देखील त्यांना त्या मुलींची व्यथा समजू नये?) दाखवलेला हलगर्जीपणा, बेफिकिरी इतकी टोकाची होती की लोकांचा राग अनावर होणं, त्यातून निदर्शनं होणं हे स्वाभाविकच होतं. अशा उद्रेकानंतर परिस्थिती ही नरमाईने हाताळायची असते. पण इथे आंदोलकांवर गुन्हे दाखल केले गेलेत. लोकांच्या मागे ससेमिरा लावला गेला आहे. हे चूक आहे. असं होता कामा नये, असं मत राज ठाकरे यांनी मांडलं आहे.

मी पोलीस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बोलून, आंदोलकांना त्रास न देण्याचा आग्रह त्यांच्याकडे धरला. मी नेहमी म्हणतो तसं की महाराष्ट्रातील पोलिसांवर इतका ताण असताना पण ते ज्या पद्धतीने राज्य हाताळतात ते वाखणण्याजोगं आहे. पण शेवटी पोलिसांवर पण कुठून कुठून येणारा ताण, राजकीय हस्तक्षेप याचा त्यांना कायम त्रास असतो. तस इथेही राजकीय हस्तक्षेप आहे असं मला जाणवतंय, याबद्दल मी सरकारशी बोलणार असल्याचं देखील राज ठाकरेंनी यावेळी सांगितलं. सामान्यांना वेठीस धरण्याच्या ऐवजी, राज्यातील स्त्रिया सुरक्षित राहतील हे पाहिलं तर अशा प्रकारची निदर्शनंच होणार नाहीत. त्यामुळे सरकारने आपलं प्रथम कर्तव्य या घटना होऊ न देणे, गुन्हेगारांना शासन करणे हे विसरू नये आणि मागे मी म्हणलं तसं महाराष्ट्र सैनिकांनी या घटनेत जशी सतर्कता दाखवली तशी यापुढे पण कायम दाखवावी.

# माजी पोलीस महासंचालक संजय पांडेंच्या अडचणी वाढल्या

## पैसे उकळल्याप्रकरणी 7 जणांवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी
■ ठाणे

महाराष्ट्र राज्याचे माजी पोलीस महासंचालक संजय पांडे यांच्यासह 7 जणांवर ठाण्याच्या ठाणे नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार संजय मिश्रीमल पुनमिया यांनी ठाणे नगर पोलीस ठाण्यात 2016 साली दाखल गुन्ह्याच्या तपास आणि खोट्या गुन्ह्यात अडकवण्याचा धमकीसह अन्य व्यावसायिकांकडून पैसे उकळल्याचा गुन्हा दाखल केला आहे. सादर धमकावण्याचा प्रकार मे 2021 ते 30 जून 2024 या कालावधित ठाणे आणि मुंबईच्या विविध ठिकाणी घडला. या प्रकरणी ठाणे नगर पोलीस अधिक तपास करत आहेत.

तक्रारदार संजय मिश्रीमल पुनमिया (58 रा मारिन ड्राइव्ह सी फेस मुंबई ) हे व्यावसायिक आहेत. ठाण्याच्या ठाणे नगर पोलीस ठाण्यात दाखल 201/2016 या गुन्ह्याचा बेकायदेशीर तपास सुरु करुन तक्रारदार पुनमिया यांच्यासह अनेक व्यावसायिकांना खोट्या गुन्ह्यात अडकवण्याच्या धमक्या देऊन त्यांच्याकडून पैसे उकळल्याचा आरोप त्यांनी केला. शासनाचं खोटं पत्र तयार करून स्पेशल पब्लिक प्रॉसिक्युटर असल्याचं भासवून कोर्टाचीही दिशाभूल केल्या प्रकरणी तक्रारदार संजय पुनमिया यांनी ठाणे नगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. या तक्रारीत महाराष्ट्र राज्याचे सेवानिवृत्त पोलीस महासंचालक संजय पांडे, वकील शेखर जगताप, सेवानिवृत्त एसीपी सरदार पाटील, श्यामसुंदर अग्रवाल, शुभम अग्रवाल, शरद अग्रवाल आदींची नावं आहेत. त्यांनी ठाणेनगर पोलीस ठाण्यात सोमवारी 12 वाजताच्या सुमारास ईमेलद्वारे ही तक्रार केली आहे. पोलीस ठाण्याला ईमेल तक्रार दाखल झाल्यानंतर ठाणेनगर पोलिसांनी सोमवारी रात्री गुन्हा दाखल केला. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक एन. आर. शिर्के करत आहेत. या गुन्ह्यात अद्यापपर्यंत कुणालाही अटक झालेली नसल्याचं पोलीस सूत्रांनी सांगितलं.

# पालिकेतील अतिरिक्त आयुक्तांविरुद्ध पोलिसात विनयभंगाचा गुन्हा दाखल

प्रतिनिधी
■ उल्हासनगर

राज्यातील बदलापूर बाल लैंगिक अत्याचाराची घटना ताजी असतानाच आणखी काही बलात्कार व अत्याचाराच्या घटना समोर येत आहेत. महापालिकेतील अतिरिक्त आयुक्तांविरुद्ध पोलिसांत विनयभंगाचा गुन्हा दाखल झाला आहे. महापालिकेत असलेल्या महिला कर्मचाऱ्याला कॅबिनमध्ये बोलावून तिच्याशी लगट केल्याचं पीडित फिर्यादी महिलेने तक्रारीत म्हटलं आहे. संबधित आयुक्त हे पीडित महिला कर्मचाऱ्याला केबिनमध्ये बोलावून कमेंट पास करायचे, तू छान दिसतेस, तुझे कपडे खूप छान आहेत, पीडित महिला कर्मचारी या अधिकाऱ्याला बोलायची तुम्ही माझे वरिष्ठ आहात तुम्ही असे माझ्याशी बोलू नका तरीही अधिकारी वारंवार कमेंट पास करत असल्याने अखेर महिलेच्या फिर्यादीनंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सध्या सामान्य प्रशासन विभागात कनिष्ठ लिपिक या पदावर कर्तव्य बजावत आहे. विशेष म्हणजे 20 मार्च 2024 रोजी राष्ट्रीय महिला आयोगाकडेही ईमेलद्वारे त्यांनी तक्रार केली होती. त्यानुसार, मला पोलीस ठाण्यात बोलावण्यात आले होते, पण मी वैयक्तिक कारणास्तव हजर राहू शकले नाही, असे पीडित महिलेनं पिर्यादीत म्हटलं आहे.

# बदलापूर प्रकरणातील आरोपी विरोधात पोलिसांना मिळाला पुरावा

## आरोपी शाळेच्या गेटच्या बाहेरच्या सीसीटीव्हीत कैद

प्रतिनिधी
■ बदलापूर

बदलापूर चिमुकल्या मुलींवर झालेल्या अत्याचार प्रकरणामुळे सर्वत्र संतापाची लाट उसळली आहे. राज्यात विरोधी पक्षांनी ठिकाठिकाणी आंदोलन सुरु केले आहे. दरम्यान, या प्रकरणाची चौकशी राज्य शासनाने एसआयटीमार्फत सुरु केली आहे. बदलापूर चिमुकली अत्याचार प्रकरणाचा तपास करण्यासाठी एसआयटी प्रमुख आरती सिंह बुधवारी बदलापूर पोलीस ठाण्यात दाखल झाल्या. त्या दिवशी पोलीस ठाण्यात घडलेल्या प्रकरणाची चौकशीसुद्धा त्या करत आहेत. दरम्यान पोलिसांना या प्रकरणातील मुख्य आरोपी अक्षय शिंदेविरोधात महत्त्वाचा तांत्रिक पुरावा सापडला आहे. शाळेच्या गेटच्या बाहेरच्या सीसीटीव्हीत अक्षय शिंदे शाळेत जाताना आणि येताना दिसून



येत असल्याचा पुरावा सापडला.

घटनेच्या महिन्याभर आधीपासून शाळेतील सर्व सीसीटीव्ही बंद होते. सीसीटीव्ही बंद असल्याने तांत्रिक पुरावे जमा करण्यात पोलिसांना अडचणी येत होत्या. शाळेतील सर्व सीसीटीव्ही बंद असल्याने घटनेच्या वेळी शाळेत असल्याचा पुरावा अद्याप हाती आला नव्हता. त्यामुळे एसआयटीकडून अनेक दिवस शोधमोहीम राबवल्यानंतर सीसीटीव्हीचा महत्त्वाचा पुरावा पोलिसांच्या हाती लागला आहे. एका दुकानात लागलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात घटनेच्या दिवशी अक्षय शिंदे शाळेच्या आत जाताना आणि बाहेर पडताना दिसून येत आहे. बदलापूरमध्ये घडलेल्या दोन चिमुकलीवर अत्याचार प्रकरणात न्यायालयीन कोठडीत असलेल्या अक्षय शिंदेवर आता दुसरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भिवंडीत वर्षभरात 14 हजार जणांना कुत्र्याचा चावा

■ भिवंडी

भिवंडीत भटक्या कुत्र्यांची दहशत वाढत आहे. भटकी कुत्री आता माणसांवरही हल्ले करत आहेत. भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात जखमी होण्याचे प्रमाण वाढले आहेच शिवाय काही जणांना प्राणही गमवावे लागले आहेत. जिल्ह्यातील शहरी भागाप्रमाणेच ग्रामीण भागातही कुत्र्यांचा त्रास वाढला आहे. एप्रिल 2023 ते जुलै 2024 या वर्षभरात जिल्ह्यात जवळपास 14 हजार 216 श्वानदंशाच्या घटना घडल्या आहेत. भिवंडी महानगरपालिका हद्दीतील भटक्या कुत्र्यांची नसबंदी करणारे श्वान निर्भजीकरण केंद्र मागील 2012 पासून बंद असल्यामुळे भिवंडी शहरात भटक्या कुत्र्यांची हजारोच्या संख्येत वाढ होऊन त्यामध्येही पिसाळलेल्या कुत्र्यांची संख्या वाढीस लागल्याच या घटनेनंतर दिसून आले आहे.

भिवंडी शहरात भटक्या कुत्र्यांचा त्रास बहुतांश वेळा रात्रीच्या वेळी नागरिकांना दुचाकी चालकांना होतो. या भटक्या कुत्र्यांपैकी काही पिसाळल्याने अनेकांना दंश करण्याच्या घटना भिवंडी शहरात वाढीस लागलेल्या आहेत. 7 आणि 8 जुलै या दोन दिवसात तब्बल 135 जणांना श्वान दंश झाल्याची घटना घडली होती. कुत्र्याच्या हल्ल्यात जखमी झालेल्यांमध्ये सर्वाधिक लहान मुलामुलींचा समावेश असून त्यामधील दोघांची प्रकृती गंभीर होती. खळबळजनक बाब म्हणजे गेल्या जून महिन्या मधील तीस दिवसात 886 जणांना भटक्या कुत्र्यांनी चावा घेऊन जखमी केल्याची माहिती इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयाच्या अधिक्षका डॉ. माधवी पंधारे यांनी दिली आहे. 7 जुलै रोजी भिवंडी शहरातल्या कामतघर परिसरात 60 नागरिकांना भटक्या कुत्र्याने चावा घेऊन जखमी केले. तर शांतीनगर भागात आठ जुलै रोजी 45 जणांना एकाच भटक्या कुत्र्याने चावा घेऊन जखमी केले.

# शेकापच्या दहीहंडीतून पोलिसांना सलामी

■ उरण

महाराष्ट्रात दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. उरण मध्ये पारंपारिक पद्धतीने दहीहंडी साजरा करण्याची गावोगावी पद्धत आहे. शेतकरी कामगार पक्षातर्फे आज उरण मध्ये शेकापचे रायगड जि. खजिनदार प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या संकल्पनेतून भव्य "दहीहंडी-2024" चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पाच, सहा आणि सात थर लावणाऱ्या गोविंदा पथकांना रोख पारितोषिक आणि सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले. पिरकोन येथील वाघेश्वर गोविंदा पथकाने गेला काही दिवसांमध्ये पोलिसांनी केलेल्या कामगिरीबद्दल उरण पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना चार थराची सलामी देऊन उपस्थित सर्व पोलीस अधिकारी वर्गाला सन्मान



दिला.

यावेळी पनवेलचे आदर्श मा नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, उरण पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ, शेकाप रायगड जि. खजिनदार प्रितम म्हात्रे, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पालिकेकडून पर्यावरणपूरक सण साजरा करण्यासाठी प्रदर्शन



■ उल्हासनगर

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाकडून सणांचे पर्यावरणपुरक साजरीकरण करणच्या अनुषंगाने नागरीकांमध्ये जनजागृती करण्याबाबत निदेश प्राप्त झाले आहेत. त्या अनुषंगाने आयुक्त विकास ढाकणे, अतिरिक्त आयुक्त, जमीर लेंगरेकर तसेच उपायुक्त, डॉ. सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनानुसार श्रीम. विशाखा सावंत, पर्यावरण विभागप्रमुख यांनी महापालिकेच्या मिटटाऊन हॉल, गोल मैदान, उल्हासनगर-१ याठिकाणी २८ ऑगस्ट, २०२४ रोजी पर्यंत पर्यावरणपुरक गणेशमुर्ती तसेच पर्यावरणपुरक आकर्षक सजावट साहित्यांचे प्रदर्शन भरविले. प्लास्टर ऑफ परोस च्या केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार मुर्त्यांवर बंदी घालण्यात आलेली आहे.

प्लास्टर ऑफ परीसच्या मुर्त्यांचे जलाशयात विसर्जन केल्यानंतर सदर मुर्त्यांचे पाण्यात विघटन होत नाही. तसेच सदर मुर्त्यांवर रंगरंगोटीसाठी वापरलेल्या रासायनिक रंगामुळे पाणी प्रदुषित होवुन जलाशयातील जलचरांचे जीवन धोक्यात येते. याकरीता नागरीकांनी मातीपासुन किंवा पर्यावरणपुरक साहित्यापासुन तयार केलेल्या व लहान आकाराच्या मुर्त्यांचा वापर करावा तसेच प्लास्टीक व थर्माकोलचा वापर करू नये याबाबत जनजागृती करणेसाठी सदर प्रदर्शन भरविण्यात आले आहे.

बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
A GOVT. OF INDIA UNDERTAKING
एक परिवार एक बैंक

एल. जे. रोड माहीम शाखा: मांग्रीश कॉ-ऑप. हाऊसिंग सो. १०१, एल. जे. रोड. माहीम मुंबई ४०००१६, महाराष्ट्र , दूर. क्र. (०२२) २४४५३४०५/ २४४५८०१६ ई-मेल: brmgr108@mahabank.co.in bom108@mahabank.co.in मुख्य कार्यालय: लोकमंगल, १५०१, शिवाजीनगर, पुणे ४११००५, महाराष्ट्र
AN5/Adv/NPA-Lubrimart/13-4 Notice/2024-25 Date: 21.08.2024

**ताबा सूचना (स्थावर मालमत्तेसाठी) (नियम ८(१))**

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार सिक्युरिटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (५४/२००२) च्या अंतर्गत बँक ऑफ महाराष्ट्रचे प्राधिकृत अधिकारी असून सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कलम १३ (१२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून कर्जदार मे. संकल्प स्ट्रक्चरर्स प्रायव्हेट लिमिटेड, कर्जदार श्री. संदेश शांताराम कदम संचालक आणि हमीदार श्रीमती साक्षी संदेश कदम, संचालक, आणि हमीदार ह्यांना सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेली १०.०४.२०२४ मागणी सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेली रक्कम म्हणजेच रु. २०७.६६ लक्ष (रुपये दोन कोटी सात लक्ष सहासष्ट हजार मात्र) त्यावरील १०.०४.२०२४ पासूनचे व्याज रु. २.७१ लक्ष आणि त्याशिवाय असलेले व्याज+ खर्च आणि वसुली होई पर्यंतच्या दिनांकापर्यंत आकारण्यात आलेल्या खर्चाचा भरणा नमूद सूचना प्राप्त झाल्यापासून ६० दिवसांच्या आत करण्यासाठी मागणी सूचना दिनांकित १०.०४.२०२४ जारी करण्यात आली होती.

कर्जदार/ हमीदार हे रकमेचा भरणा करू न शकल्यामुळे सूचना ह्याद्वारे कर्जदार आणि सामान्य जनतेला देण्यात येत आहे की येथे खालील परिशिष्टामध्ये वर्णन करण्यात आलेल्या मालमत्तेचा नमूद नियमावलीच्या नियम ८ सह वाचल्या जाणाऱ्या नमूद कायद्याच्या कलम १३(४) अंतर्गत त्यांना/ तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून२१ ऑगस्ट २०२४ रोजी ताबा घेतला आहे.

विशेषत: कर्जदार आणि सामान्य जनतेला ह्याद्वारे सावध करण्यात येत आहे की मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि जर मालमत्तेशी असा व्यवहार झाला असल्यास बँक ऑफ महाराष्ट्रकडे रु. २०७.६६ लक्ष (रुपये दोन कोटी सात लक्ष सहासष्ट हजार मात्र) त्यावरील १०.०४.२०२४ पासूनचे व्याज रु. २.७१ लक्ष आणि त्याशिवाय असलेले व्याज+ खर्च आणि वसुली होई पर्यंतच्या दिनांकापर्यंत आकारण्यात आलेल्या खर्चाचा भरणा करण्यास बाध्य असतील.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

१. दादरकर अपार्टमेंट सीएचएसएल, रोड क्र. ०२, लिबर्टी गार्डन, मालाड पश्चिम, मुंबई ४०००६४ येथील सदनिका क्र. १०२, २०२, ६०१, ७०१, ८०१, ९०१ वरील दादरकर सोसायटीच्या पुनर्विकास प्रकल्पामधील विकासकाच्या हिस्स्याचे नोंदणीकृत गहाण
२. सदनिका क्र. बी १०४, आदिमाय अंबाबाई सीएचएस ४ बंगलोज अंधेरी पश्चिम मुंबई ४०००५३ चे नोंदणीकृत गहाण.

**ठिकाण: मुंबई**
**दिनांक: २१.०८.२०२४**

सही/-
प्राधिकृत अधिकारी
बँक ऑफ महाराष्ट्र

**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ
म्हाडा MHADA

**ई-निविदा सुचना**

कार्यकारी अभियंता [ पश्चिम ] विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३७, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ ( दुरध्वनी क्र. ०२२६६४०५४३२) हे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे / सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन/सिपीडब्लूडी / एमईएस/मुंबई मनहानगरपालिका / सिडको / रेल्वे / बीपीटी / एमआयडीसी एम. जे. पी. यांचेकडे नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकुण ३ कामांकरीता बी-१ (Percantage Rate) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर http://mahatenders.gov.in, उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | टप्पा | कालावधी | अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा विक्री सुरू | ३१/०८/२०२४ सकाळी १०:३० वाजता | २ | निविदा विक्री बंद | ०७/०९/२०२४ दुपारी ६:१५ वाजता |
| ३ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | ०९/०९/२०२४ सकाळी १०:३० नंतर | ४ | आर्थिक बोली उघडण्याचा दिनांक | ११/०९/२०२४ सकाळी १०:३० नंतर |

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निवदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.
टिप : १. विस्तृत ई- निविदा सुचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.
टिप : २. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.
**CPRO/A/ 631**

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
Follow us: @mhadaofficial

सही/-
कार्यकारी अभियंता (प),
मुं. झो. सु. मंडळ, मुंबई

# पालिकेकडून वृक्षसंगोपन, बागकाम क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींची नवी मुंबईत नेमणूक

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) वृक्ष संवर्धन आणि संवर्धन अधिनियम 1975 अन्वये महानगरपालिका क्षेत्रातील वृक्षांचे संवर्धन, संरक्षण व जतन करणे, कर्तव्य ही वृक्ष प्राधिकरणाची मुख्य जबाबदारी आहे.

याबाबत पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन परिपत्रक, क्र. वृक्षक 2021/प्र.क्र.26/तां.क्र.4, दिनांक 24 जून 2021 अन्वये स्थानिक वृक्ष प्राधिकरणाच्या कर्तव्यांमध्ये या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींचा सल्ला व मार्गदर्शन घेण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

त्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी, सार्वजनिक ठिकाणावरील वृक्ष तोडणे अथवा स्थलांतरित करणेकरिता वृक्षसंगोपन तज्ज्ञ, बागकामतज्ज्ञ या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींची नेमणूक करणेत आलेली आहे. यामुळे महापालिका क्षेत्रातील कोणतेही वृक्ष विनाकारण तोडले जाणार नाहीत.



या अनुषंगाने विकास कामामध्ये येणा-या किंवा धोकादायक वाटणाऱ्या प्रत्येक झाडाची प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करण्यात येणार आहे. त्यामुळे वृक्ष आहे त्याच जागी ठेवून वाचविणे शक्य असल्यास त्यादृष्टीने प्रयत्न करण्यात येतील. तसेच सदर वृक्ष बाधित होणार असल्यास त्या वृक्षाचे इतर ठिकाणी स्थलांतर करताना शास्त्रीय पध्दतीने पुनर्रोपण करण्यात येईल.

त्याचप्रमाणे काही वृक्षावर कीड किंवा रोगाचा प्रादुर्भाव आढळल्यास आवश्यकतेनुसार उपाययोजना करण्यात येणार आहे. या वृक्षांची तपासणी करताना रजिस्ट्रोग्राफ सारख्या अत्याधुनिक उपकरणांचाही वापर करण्यात येणार आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेने याकामी नेमणूक केलेल्या वृक्षसंगोपन तज्ज्ञ, बागकामतज्ज्ञ क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींमध्ये असिम गोकर्ण हरवंश, नकुल सवानी, गौरवी गोपाळ ठसाळे, ऋतिक मुरुडकर, वैभव राजे अशाप्रकारे 5 तज्ज्ञांचा समावेश आहे.

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ठाणे**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ठाणे, लिली अपार्टमेंट पहिला मजला, पारसी अगरी लेन, टेंभी नाका, ठाणे.

**चौकशीची जाहीर नोटीस**

**एस.आर. एन. क्रमांक : THN/13817/18/23**
**फेरफार अहवाल/अर्ज क्रमांक : ACC-I/209/2024**
**सार्वजनिक न्यासाचे नाव : ग्लोबल आशा फाऊंडेशन ..... बाबत.**
**न्यासाचा पत्ता :** अमित अरविंद मोरे, फ्लॅट नं. २४०३, डी/३, जिनिया, नीलकंठ ग्रीन्स, मानपाडा, ठाणे (डबल्यु.), ठाणे.
**अर्जदार : अमित अरविंद मोरे,**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, ठाणे, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत:-
१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय?
२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| १. | रोख | १०००/- |

**(अ) जंगम मिळकत:- रोख रु. १०००/- मात्र (अक्षरी रुपये एक हजार मात्र फक्त)**

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ. क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत/कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0.00 |

**(ब) स्थावर मिळकत:- रोख रु. ०/- मात्र (अक्षरी रुपये मात्र फक्त )**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.
ही नोटीस माझे सहीनिशी व कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक २८/०८/२०२४ रोजी दिली.

शिक्का

सही/-
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
ठाणे

**नवी मुंबई महानगरपालिका**

**जाहीर नोटीस सूचना क्र./वृक्ष प्रा./21/2024-2025**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम 1975 च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या कलम 8(3) अन्वये या नोटीसाव्दारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ. क्र. | अर्जदाराचे नांव व पत्ता | झाडाचा प्रकार | एकूण तोडणे | एकूण स्थलांतरीत | झाड तोडणे/स्थलांतरीत करावयाचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| 1. | कनिष्ठ अभियंता (पा.पु.), अ विभाग बेलापूर, नवी मुंबई महानगरपालिका. | बदाम | 0 | 1 | सदरची झाडे से.1 येथील पाण्याच्या टाकीच्या बांधकामामध्ये अडथळा निर्माण करित असल्याने एकुण 20 झाडांपैकी एकुण 8 नग झाडे तोडणे व एकुण 12 नग झाडे स्थलांतरित करणे. |
| | | सातवीन | 0 | 1 | |
| | | नारळ | 3 | 4 | |
| | | पाम ट्री | 0 | 1 | |
| | | जांभुळ | 2 | 0 | |
| | | आंबा | 1 | 2 | |
| | | सुरु | 1 | 0 | |
| | | बोर | 1 | 0 | |
| | | बॉटल पाम | 0 | 1 | |
| | | शेवगा | 0 | 1 | |
| | | कडीपत्ता | 0 | 1 | |

**सदर प्रस्तावास वृक्ष तोडणे/स्थलांतरित करण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरीकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांच्या आत लेखी स्वरूपात कोकण रेल्वे इमारत, तळ मजला, से.11, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई विभागास कळविणे. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या हरकती सूचनांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी..**

.जाहिरात प्रसिध्दीचा दिनांक 29 / 08 /2024

सही /-
(दिलीप नेरकर)
उप आयुक्त (उद्यान) तथा सचिव वृक्ष प्राधिकरण
नवी मुंबई महानगरपालिका

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/291/2024

## मनोज जरांगे राजकोट किल्ल्यावर भेट देऊन पुतळ्याची पाहणी करणार

**जालना :** दोन दिवसापूर्वी मालवण येथील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळल्याची घटना घडली. या प्रकरणी आज महाविकास आघाडीने मोर्चा काढला होता. यावेळी ठाकरे गट आणि राणे समर्थक समोरासमोर आल्याचे पाहायला मिळाले आणि दोन्ही गटात हाणामारी झाल्याचे पाहायला मिळाले. यामुळे राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. दरम्यान,आता मराठा आरक्षणाचे मनोज जरांगे पाटील राजकोट किल्ल्याला भेट देणार आहेत. मनोज जरांगे पाटील यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. जरांगे पाटील यांनी यावेळी महायुती सरकारवर टीकाही केली. जरांगे पाटील म्हणाले, '१ सप्टेंबर रोजी आम्ही मालवण येथील राजकोट किल्ल्याला भेट देणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळला आहे, त्याची पाहणी करणार आहे. मालवण हा कोणाचा बालेकिल्ला असं काही नाही,छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे आमच्यासाठी दैवत आहे'. "हे स्मारक कोसळल्यामुळे अठरापगड जातींच्या भावना दुखावल्या आहेत. हा आमच्यासाठी धक्कादायक विषय आहे. आम्ही आमच्या राजासाठी राजकोट किल्ल्याला भेट दिली पाहिजे, हे माझ्या मनात आलं. म्हणून आम्ही भेट देणार आहे, असंही मनोज जरांगे पाटील म्हणाले.

### महत्त्वाचे

#### राधानगरीमधून पाण्याचा विसर्ग सुरू

**कोल्हापूर :** हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार घाटमाथ्यावर गेल्या 48 तासात धुवाधार पाऊस झाला. जिल्ह्यात 24 तासात 32.9 मिलिमीटर पाऊस पडला. हा पावसाचा जोर मंगळवारी काहीसा ओसरला. शहरात दिवसभर अधून मधून हलक्या व मध्यम सरी कोसळत होत्या. मात्र धरण क्षेत्रात पावसाचा जोर कायम आहे. गेल्या 24 तासात राधानगरी सह 13 धरण क्षेत्रात अतिवृष्टी झाल्यामुळे पंचगंगेच्या पाणी पातळीत वाढ सुरूच असून रात्री नऊ वाजता पाणी पातळी 34 फूट दहा इंचावर पोहोचली होती. पंचगंगेची वाटचाल आता 19 फूट या इशारा पातळीकडे सुरू आहे जिल्ह्यात 52 बंधारे पाण्याखाली गेले आहेत. राधानगरी धरणाचे सध्या 4 स्वयंचलित दरवाजे खुले असून त्या धरणातून 5,784 क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. कोयना धरणातून 10,000 क्युसेक विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

#### पुण्यात साथीच्या आजारात वाढ

**पुणे :** सततचा पाऊस, ढगाळ हवामान, दुपारी उकाडा आणि रात्री गारवा अशा संमिश्र वातावरणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. त्यातच पावसाच्या पाण्याने रस्त्यावर मोठे मोठे खड्डे तयार झालेत. या खड्ड्यांमध्ये पाणी साचला आहे. याच पाण्यात एडीएस इजिप्ति डासांची पैदास होत असल्याने शहरातील अनेक भागांमध्ये ताप, डेंगी, झिका आणि चिकनगुनियाचे रुग्ण आढळून येत आहेत. झिगा, डेंगी आणि चिकनगुनियामुळे पुणेकर त्रस्त झाले आहेत. साथींच्या आजारांचा विषाणूजन्य जंतूंचा संसर्ग वाढत असल्याने आजार बळावत असून काळजी घेण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. शहरांमध्ये साथीच्या आजारांचा प्रसार वेगात होत आहे. त्यामुळे दवाखान्यांमध्ये गर्दी वाढलेली दिसून येत आहे. शहरात आजपर्यंत सुमारे १०७ पेक्षा जास्त डिंगीचे रुग्ण आढळून आले आहेत. झिकाचे 94 तर चिकनगुनिया चे 68 रुग्ण आढळून आले आहे.

# मी महाराष्ट्रातील 13 कोटी जनतेची माफी मागतो

## मालवणमधील घटनेबाबत उपमुख्यमंत्री अजित पवारांनी व्यक्त केली दिलगिरी

प्रतिनिधी
■ लातूर

महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा २६ ऑगस्ट रोजी कोसळल्या घटना घडली. या घटनेबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माफी मागितलीय. या संदर्भात मी महाराष्ट्रातील १३ कोटी जनतेची माफी मागतो, असे अजित पवार सभेत म्हणालेत. छत्रपती शिवाजी महाराज हे आपले दैवत आहेत. वर्षभरात त्यांचा असा पुतळा कोसळणे हा आपल्या सर्वांसाठी धक्कादायक असल्याचंही ते म्हणाले.



अजित पवार यांची जन सन्मान यात्रा लातूर जिल्ह्यात पोहोचलीय. यावेळी येथील नागरिकांना संबोधित करतांना अजित पवार यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा पडल्याप्रकरणी माफी मागितलीय.

याप्रकरणाची सखोल चौकशी करत दोषींवर कारवाई केली जाणार असणार असल्याचं वक्तव्य त्यांनी केलंय. छत्रपती शिवाजी महाराज हे सर्व जनतेचं दैवत आहेत, मी राज्यातील १३ कोटी जनतेची माफी मागतो, विधान अजित पवार यांनी केलंय.

जे कोणी दोषी असतील त्यांची चौकशी करून कारवाई केली जाईल. आता वृत्तपत्रांमध्ये पुतळा पडण्याच्या घटनेला कोण दोषी आहेत, त्यांची नावे समोर येत आहेत, यात जे कोणी दोषी असतील मग यात कोणी मोठा असो किंवा लहान अधिकारी सर्वांवर कारवाई केली जाईल, असं अजित पवार म्हणालेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या वर्षी ४ डिसेंबर रोजी या पुतळ्याचे अनावरण केले होते. बरोबर ८ महिन्यांनंतर २६ ऑगस्ट रोजी पुतळा पडल्याची घटना घडली. या प्रकरणी पुतळा उभारणीच्या कामाच्या ठेकेदाराविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आलाय. बांधकाम विभागाने पोलिसात तक्रार केल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आलाय. तक्रारीनुसार, पुतळ्याचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्याचा दावा करण्यात आलाय. पुतळ्यासाठी वापरलेले नट आणि बोल्ट गंजलेले आढळल्याचं म्हटलंय.

देवेंद्र फडणवीस यांनीही दोषींवर कारवाई केली जाणार असल्याचं म्हटलंय. मालवणच्या घटनेवर कोणी राजकारण करू नये. ही घटना कमीपणा आणि दुःखद घटना आहे. योग्य चौकशी करत दोषींवर कारवाई केली जाईल. ज्यांनी चुका केल्या त्यांना शासन होणार असल्याची ग्वाही उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणालेत. याआधी उद्धव ठाकरे यांनी आणि शरद पवार यांनी सरकारमध्ये भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात होत असल्याचा आरोप केलाय.

# 'जय श्रीराम' म्हणत हिंदू संस्कृतीचं रक्षण केलं पाहिजे

## स्वप्नील कुसाळेचं वक्तव्य



प्रतिनिधी
■ पुणे

दहीहंडी उत्सवाचा जल्लोष राज्यभर साजरा करण्यात येत आहे. मंगळवारी राज्यातील गोविंदांनी दहीहंडी फोडून एकतेचा काला जनतेला वाटला. पुण्यात मात्र ऑलिम्पिकची दहीहंडी फोडून मेडल पटकावणाऱ्या आघाडीचा नेमबाज स्वप्निल कुसाळे यानं गोविंदांबरोबर जल्लोष केला. जय श्रीराम म्हणून हिंदू संस्कृतीचं भक्कमपणे रक्षण केलं, तरचं हिंदूराष्ट्र मोठं होईल, असं स्वप्निल कुसाळे यानं यावेळी स्पष्ट केलं. हिंदू संस्कृतीचं रक्षण करण्याचं आवाहनही त्यानं यावेळी केलं. त्यामुळे स्वप्निल कुसळेचं वक्तव्य चर्चेत आलं आहे.

"हिंदू संस्कृती जपली पाहिजे, जय श्रीराम म्हणून हिंदू संस्कृती पुढं नेली पाहिजे, तरच हिंदू राष्ट्र मोठं होईल. सगळ्यांनी हिंदू संस्कृतीचं रक्षण केलं, तर हिंदू राष्ट्र पुढं जाईल. त्यासाठी आपलं आरोग्य जपा, असं मत ऑलिम्पिक मेडल विजेता नेमबाज स्वप्निल कुसाळे यानं पुण्यातील दहीहंडी उत्सवात व्यक्त केलं. स्वप्निल कुसाळे यानं केलेल्या या वक्तव्यावरुन आता वाद होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

यावेळी स्वप्निल कुसाळे म्हणाला, "आजचा कार्यक्रम हा माझ्यासाठी खूपच विशेष आहे. मी या अगोदर कधीही आपले हिंदू सण बघितले नाहीत. मला स्पर्धेच्या तयारीमुळे वेळच मिळत नव्हता. आज खूपच आनंद होत आहे. आपली दहीहंडी ही मला पाहता येणार आहे आणि मी पूर्ण बघूनच जाणार आहे. हिंदूंची संस्कृती ही आपण पाळलीच पाहिजे. लहान मुलांमध्ये ही संस्कृती रुजवली पाहिजे. जेणेकरून आपलं हिंदू राष्ट्र हे पुढं मोठं होत जाणार आहे." आपण चांगलं जेवण करा आणि वेळेवर करा जेणेकरून आपलं शरीर बळकट होईल आणि आपण अजून जास्त उत्साहानं आपले सण साजरे करू, असं आवाहन देखील यावेळी स्वप्निल कुसाळे यानं तरुणांना केलं.

दहीहंडी उत्सवात नेमबाज स्वप्नील कुसाळे याचा सत्कार केला. यावेळी बोलताना नेमबाज स्वप्निल कुसाळे यानं उपस्थित गोविंदांचा उत्साह वाढवला. स्वप्निल कुसाळे यानं यावेळी गोविंदांना आरोग्य जपण्याचा सल्लाही दिला. यावेळी बोलताना स्वप्निल कुसाळे म्हणाला, "इतक्या वर जाऊन दहीहंडी फोडणं मोठ्या कष्टाचं काम आहे. त्यामुळे शरीर सुदृढ ठेवण्यासाठी चांगलं सकस अन्न खा. बाहेरचं काहीच खाऊ नका. आपलं आरोग्य जपा, तरच हिंदूराष्ट्र निर्मितीचं स्वप्न पूर्ण होईल". गोविंदांना आरोग्य जपण्याचा संदेश देत देशाचा आघाडीचा नेमबाज स्वप्नील कुसाळेनं बालेवाडीत तरुणांच्या काळजाचा अचूक नेम साधला. उपस्थित तरुणांची आरोग्याच्या बाबत जनजागृती केली.

# सरसंघचालक मोहन भागवत यांच्या सुरक्षेत वाढ

## केंद्रानं पुरवली ॲडव्हांस सेक्युरिटी लायझनिंग सुरक्षा

प्रतिनिधी
■ नागपूर

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख डॉ मोहन भागवत यांची सुरक्षा वाढवण्यात आलेली आहे. केंद्रीय गृह मंत्रालयानं सरसंघचालक मोहन भागवत यांच्या सुरक्षेत वाढ करण्याचा हा निर्णय घेतलाय. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांना पंतप्रधान मोदी व गृहमंत्री शाह यांच्यासारखी ASL म्हणजे ॲडव्हांस सेक्युरिटी लायझनिंग प्रकारची सुरक्षा देण्यात आली आहे.

पूर्वी सीआयएसएफची झेड प्लस सुरक्षा : डॉ मोहन भागवत यांना या पूर्वी सीआयएसएफची



झेड प्लस सुरक्षा पुरवण्यात आलेली आहे. मात्र, आता सुरक्षा ताफ्यात स्थानिक प्रशासन, पोलीस, आरोग्य, अन्न व औषध प्रशासन यांचा समावेश असेल. कुठलाही धोका टाळण्यासाठी मल्टी लेयर सुरक्षा यंत्रणा डॉ मोहन भागवत यांना पुरवण्यात येणार आहे.

# कोयत्याने वार करत अल्पवयीन मुलांनी कबड्डीपटूला संपवले

## घटनेशी संबंधित 5 मुले ताब्यात

प्रतिनिधी
■ सांगली

सांगली शहरातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. तरुणाच्या डोक्यात कोयत्याने वार करत त्याची निर्दयीपणे हत्या करण्यात आली आहे. सांगली येथील जामवाडी येथील मरगुबाई मंदिराजवळ पूर्ववैमनस्यातून ही हत्या करण्यात आली आहे. या प्रकरणी पाच अल्पवयीन मुलांना ताब्यात घेण्यात आले असल्याची माहिती सांगली पोलिस उपअधीक्षक अण्णासाहेब जाधव यांनी दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सांगली येथील जामवाडी येथे राहणाऱ्या 22 वर्षीय अनिकेत हिप्परकर असे



खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. अनिकेत एका आर्थिक संस्थेत पिग्मी एजंटचे काम करत होता तसेच तो एक कबड्डीपटू असून सार्वजनिक मंडळातही सक्रिय होता.

जामवाडी येथील मरगुबाई मंदिराजवळ अनिकेत उभा असताना संशयित अल्पवयीन मुलांनी येऊन पूर्वी झालेल्या वादाचा जाब विचारला. तेव्हा पुन्हा एकदा वादाला सुरुवात झाली होती.

मात्र हा वाद इतका विकोपाला गेला की संशयित अल्पवयीन मुलांनी अनिकेतवर कोयत्याने सपासप वार केले. कोयत्याच्या वारांमुळे अनिकेत तिथेच रक्ताच्या थारोळ्यात पडला आणि आरोपी अल्पवयीन मुलांनी तिथून पळ काढला. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धावव घेत तपास करण्यास सुरुवात केली. सांगली शहर पोलिस उपअधीक्षक अण्णासाहेब जाधव, शहर पोलिस ठाण्याचे निरीक्षक संजय मोरे व स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे निरीक्षक सतीश शिंदे यांच्यासह फौजफाटा घटनास्थळी दाखल झाला होता. आरोपींची श्वानपथकाद्वारे शोध मोहीम सुरू केली.

# पक्ष बळकट करण्यासाठी स्वबळावर आमदार निवडून आणावे लागतील - केंद्रीय मंत्री आठवले

प्रतिनिधी
■ पुणे

रिपब्लिकन पक्षाला पुढे जायचे असेल तर स्वतःच्या बळावर काही लोक निवडून आणावे लागतील.आपण महायुतीचे घटक पक्ष आहोत पण मागायचे किती दिवस? स्वबळावर आमदार निवडून आणल्याशिवाय रिपब्लिकन पक्ष बळकट होऊ शकत नाही. त्यामुळे पक्ष बळकट करण्यासाठी शिस्त पाळा; सर्व जाती धर्मियांना सोबत घ्या; लोकांचा विश्वास जिंकून विधानसभेत आपले लोक निवडून आणा असे आवाहन आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री



ना रामदास आठवले यांनी केले.

पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिर सभागृहात तिसऱ्यांदा केंद्रीय राज्यमंत्री झाल्याबद्दल ना.रामदास आठवले यांचा रिपब्लिकन पक्षाच्या पुणे शहर तर्फे भव्य सत्कार करण्यात आला. सर्वधर्मीय गुरूंच्या हस्ते ना.रामदास आठवले यांचा सपत्नीक भव्य सत्कार करण्यात आला.यावेळी ना.रामदास आठवले यांच्या पत्नी सीमा आठवले या उपस्थित होत्या. यावेळी महाथेरो भन्ते नागघोष (धम्मदायाद बुध्द बिहार), फादर भाऊसाहेब संसारे (रेक्टर, पिपल्स सेमिनरी), ग्याणी अमरजित सिंग (अध्यक्ष, गुरुनानक दरवार रेसकोर्स), संजय भोसले (उपाध्यक्ष, इस्कॉन इंटरनॅशनल), मौलाना सय्यद मुसा (दारूल उलूम, पुणे), रावसाहेब झेंडे (जेष्ठ रिपब्लिकन कार्यकर्ता) यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला.

# सावर्डेमधील महिलेची हत्या, दागिनेही नेले चोरुन

प्रतिनिधी
■ सावर्डे

सावर्डे-नांदगाव येथे ६० वर्षीय महिलेच्या डोक्यात सिलेंडर घालून अज्ञाताने हत्या केल्याची घटना उघडकीस आली. संबंधित महिलेच्या अंगावरील साडी घरापासून काही अंतरावर मिळाली, तर त्यांचे दागिनेही चोरीला गेल्याने खळबळ उडाली आहे.

सुनिता परशुराम पवार (नांदगाव खुर्द, गोसावीवाडी) असे या महिलेचे नाव आहे. ही महिला घरी एकटीच होती. दहीहंडीच्या उत्सवानिमित्त पती आणि वाडीतील नागरिक बाहेर गेले होते. त्याच दरम्यान




अज्ञात इसमाने महिलेच्या घरात प्रवेश करुन तिच्या डोक्यात सिलेंडर मारुन तिचे दागिने आणि पैसे लुटून नेल्याची घटना घडली आहे. संबंधित महिलेच्या अंगावर केवळ परकर आणि ब्लाऊज होते, तर त्यांच्या अंगावरील साडी घरापासून काही अंतरावर नांदगाव रस्त्याच्या पलीकडे आढळून आली.

नांदगाव येथे घडलेल्या या हत्येच्या घटनेची खबर सावर्डे पंचक्रोशीत पसरल्यानंतर गावागावातून अनेक लोक नांदगावमध्ये आले. महिलेची हत्या झाल्याची पाहून सर्वांना धक्का बसला. उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रकुमार राजमाने यांच्यासह अन्य पोलीस यंत्रणेने तात्काळ घटनास्थळी भेट देऊन या घटनेचा तपास सुरु केला आहे. संबंधित महिलेचे पती पोलीस खात्यातून सेवानिवृत्त झाले असून त्यांचा मुलगा मुंबई येथे पोलीस अधिकारी म्हणून काम करीत आहेत.

# पुणे-मिरज रेल्वे बिकानेरपर्यंत धावणार

प्रतिनिधी
■ पुणे

मध्य रेल्वेने पुणे-मिरज या 279 किलोमीटर रेल्वे मार्गाच्या दुहेरीकरण व विद्युतीकरणाचे काम 2016 मध्ये सुरू केले. हे काम मे 2023 पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट होते. या प्रकल्पासाठी 4 हजार 882 कोटी रुपये खर्च मंजूर करण्यात आला आहे. या मार्गाच्या दुहेरीकरणासाठी सातारा व पुणे जिल्ह्यात भूसंपादनासाठी शेतकऱ्यांच्या हरकती व इतर अडचणींमुळे कामाला वेळ लागत होता. करोना काळातही काही दिवस काम बंद असल्याचा फटका या कामाला बसला आहे. सध्या तारगाव-मसूर व मसूर-शिरवडे अशा दोन टप्प्यांतील 18 किलोमीटरचे दुहेरीकरण पूर्ण झाल्याने शिरवडे ते तारगाव दरम्यान वेगाच्या चाचणीत जास्तीत जास्त 130 किलोमीटर प्रतितास वेग गाठण्यात आला. ही चाचणी यशस्वी झाल्याने सुरक्षा आयुक्तांनी या मार्गावरून ताशी 90 किलोमीटर वेगाने गाड्या चालविण्यास मान्यता दिली आहे. उरलेल्या 63 किलोमीटर मार्गाच्या दुहेरीकरणास आणखी सहा महिने कालावधी लागणार आहे. तयार झालेल्या 217 किलोमीटर दुहेरी मार्गावरून माल व प्रवासी वाहतूक सुरू करण्यात आली आहे.

पुणे ते बिकानेरपर्यंत धावणारी पुणे-बिकानेर एक्सप्रेस आजपासून मिरज बिकानेर एक्सप्रेस म्हणून धावणार आहे.

# शक्तीपीठ महामार्गानंतर पुणे-नाशिक महामार्गाला विरोध

प्रतिनिधी
■ नाशिक

गोवा शक्तीपीठ महामार्गानतंर पुणे नाशिक महामार्ग प्रकल्पात देखील मोठा अडथळा आला आहे. या महामार्गासाठी 8000 कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. निधी मंजूर होऊन प्रकल्प रखडण्याची चिन्हे आहेत. या प्रकल्पाविरोधात 14 गावचे ग्रामस्थ एकवटले आहेत. या महामार्गामुळे पुणे-नाशिक प्रवास फक्त 3 तासात पूर्ण करता येणार आहे. तसेच या महामार्गामुळे राजगुरुनगर, चाकण, मंचर मार्गे थेट शिर्डीला जाता येणार आहे.

राज्यभरात मोठ्या प्रमाणात



महार्गांचे जाळे तयार केले जात आहे. या पैकीच एक आहे तो पुणे-नाशिक औद्योगिक महामार्ग. पुणे-नाशिक औद्योगिक महामार्ग हा सरकारचा एक महत्वाकांक्षी प्रकल्प आहे. पुणे-नाशिक औद्योगिक द्रुतगती महामार्गामुळे जलद प्रवास आणि वेळेची बचत करणारा आहे. या महामार्गमुळे पुणे-नाशिक अंतर अवघ्या तीन तासात पार होणार आहे. या महामार्गावरुन राजगुरुनगर, चाकण, मंचर मार्गे थेट शिर्डीला जाता येणार आहे. हा महामार्ग 213 किलोमीटर लांबीचा असणार आहे. या महामार्गासाठी 20,000 कोटींचा खर्च अपेक्षित आहे. केंद्रात सत्तेत असलेल्या मोदी सरकारने हिरवा कंदील दिला असून त्यासाठी तब्बल 8 हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

पुणे नाशिक महामार्गाला औद्योगिक वाहतुकीसाठी पर्यायी बंधीस्त मार्ग बांधला जात आहे. पुणे जिल्ह्यात येणाऱ्या जुन्नर तालुक्यातील 14 गावच्या ग्रामस्थांनी या महामार्गाला विरोध केला आहे. हा मार्ग बागायती क्षेत्र, लोकवस्तीमधून जात असल्याने शेतकऱ्यांनी पुणे नाशिक औद्योगिक महामार्गाच्या जमिन संपादनाला थेट विरोध केला आहे. आमचा विकासाला विरोध नाही.

# भंडारपुळे समुद्रात मासे पकडताना तरुण बुडाला

प्रतिनिधी
■ रत्नागिरी

तालुक्यातील गणपतीपुळेनजीकच्या भंडारपुळे भागात मासे पकडण्यासाठी गेलेला एक प्रौढ समुद्रात एकजण बुडाला आहे. नौशिन नजीर पेवेकर (३८, रा. मजगाव, रत्नागिरी) असे त्याचे नाव आहे. मंगळवारी सायंकाळी साडेसात ते आठ वाजण्याच्या दरम्यान हा प्रकार घडला.

नारळी पौर्णिमेनंतर पावसाचा जोर काहीसा कमी झाला आहे. मधेमधे मोठी सर येत असली तरी पाऊस सरीवरच असल्याने मासेमारी नव्या जोमाने सुरू झाली आहे.



मंगळवारी सायंकाळी मजगाव येथील तीनचारजण मासे पकडण्यासाठी म्हणून भंडारपुळे येथे गेले होते. तेथे मासा पकडण्याच्या नादात नौशिन पेवेकर तोल जाऊन पाण्यात पडले. त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांना पकडण्याचा बराच प्रयत्न केला. मात्र त्यांना यश आले नाही आणि त्यात नौशिन बुडाले.

# माजी आमदार संगीता ठोंबरेंच्या कारवर दगडफेक

## ठोंबरेंसह ड्रायव्हर जखमी, रुग्णालयात दाखल

प्रतिनिधी
■ बीड

केज विधानसभेच्या माजी आमदार प्रा. संगीता ठोंबरे यांच्या कारवर दगडफेक करण्यात आलीये. संगीता ठोंबरे केज तालुक्यातील दहिफळ वड माऊली येथील एका कार्यक्रमासाठी गेल्या होत्या. दहिफळ वडगाव येथे गेल्यानंतर संगीता ठोंबरे सायंकाळी ऋषी गदळे घरी चहा-पाण्यासाठी जात असताना विजय गदळे यांनी त्यांच्या गाडीवर दगडफेक करण्यात आली आहे.

केजमध्ये झालेल्या दगडफेकीत गाडीचा ड्रायव्हरच्या बाजूचा काच फुटून तो दगड गाडीचा चालक किशोर बबन मोरे याला लागला. त्यानंतर





तोच दगड गाडीमध्ये बसलेल्या माजी आमदार संगीता ताई ठोंबरे यांना लागला. त्यामुळे त्याही जखमी झाल्या आहेत. त्यांच्यावर उपजिल्हा रुग्णालय केज येथे उपचार चालू आहेत. दरम्यान याप्रकरणी पोलिसात तक्रार नोंदवण्याची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, कोणत्या कारणामुळे संगिता ठोंबरे यांच्यावर दगडफेक करण्यात आली हे अद्याप समजू शकलेले नाही.

# मराठा आरक्षणाचा प्रश्न न सोडवू शकणाऱ्या राजकीय पक्षांचे घातले श्राद्ध

प्रतिनिधी
■ लातूर

ओबीसीतून मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या आंदोलनाला उद्या (ता.29) एक वर्ष पुर्ण होत आहे. या पार्श्वभूमीवर निलंगा येथे सकल मराठा समाजाच्या वतीने आरक्षणाचा प्रश्न सोडवण्यात एकाही राजकीय पक्षाला यश आले नाही, याचा निषेध म्हणून आगळे वेगळे आंदोलन करण्यात आले. शहरातील मुख्य चौकात सगळ्याच राजकीय पक्षांचे श्राद्ध घालत सकल मराठा समाजाने निषेध नोंदवला.

यावेळी सगळ्याच राजकीय पक्षांविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. या आंदोलनाने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले



होते. मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी 29 ऑगस्ट 2023 मध्ये आंदोलनाला सुरवात झाली होती.

या दरम्यान अनेक राजकीय घडामोडी, आंदोलने, संवाद दौरे, अंतरवाली ते मुंबईच्या दिशेने मोर्चा, रास्ता रोको, राजकीय नेत्यांना गावबंदी अशा पद्धतीने मराठा समाजाने रस्त्यावर उतरत लढा दिला.

पण आरक्षणासाठीच्या आंदोलनाला एक वर्ष होऊनही हा प्रश्न अद्याप सुटलेला नाही. सगळ्याच राजकीय पक्षांनी मराठा आरक्षणावर केवळ राजकारण केले. याचा निषेध म्हणून निलंगा येथे सकल मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी सगळ्याच राजकीय पक्षांचे श्राद्ध घालत निषेध नोंदवला. सकल मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न कोणत्याही राजकीय पक्षाने सोडवला नसल्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज चौकात सर्वच राजकीय पक्षाचे श्राध्द घालण्यात आले. ओबीसी प्रवर्गातून मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी एक वर्षापूर्वी अंतरवाली सराटी येथे उपोषण सुरू केले होते. या आंदोलकांवर लाठीचार्ज करत गोळीबार करण्यात आला होता.

# पॅरिस पॅरालिम्पिक गाजवण्यासाठी भारतीय खेळाडू सज्ज

**पॅरिस :** पॅरालिम्पिक स्पर्धा 28 ऑगस्टपासून फ्रान्सची राजधानी पॅरिसमध्ये सुरू होणार असून ती 8 सप्टेंबरपर्यंत चालणार आहेत. यावेळी भारतातून एकूण 84 पॅरा ॲथलीट पॅरालिम्पिक स्पर्धेत सहभागी होणार आहेत. हे सर्व खेळाडू 12 विविध खेळांच्या स्पर्धांमध्ये सहभागी होणार आहेत. गेल्या पॅरालिम्पिक स्पर्धेत भारताकडून 54खेळाडूंचा संघ गेला होता, ज्यामध्ये एकूण 19 पदके जिंकण्यात यश मिळाले होते. यामध्ये 5 सुवर्ण, 8 रौप्य आणि 6 कांस्य पदके होती. गेल्या पॅरालिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या पाच पॅरा खेळाडूंपैकी चार खेळाडू यावेळीही सहभागी होत आहेत. भारताकडून गेल्या पॅरालिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकणाऱ्या आणि यावेळी सहभागी झालेल्या पॅरा ॲथलीट्समध्ये सुमित अँटिल (पॅरा ॲथलेटिक्स), अवनी लेखरा (पॅरा नेमबाजी), कृष्णा नगर (पॅरा-बॅडमिंटन) आणि मनीष नरवाल (पॅरा नेमबाजी) यांचा समावेश आहे ज्यांच्याकडून यावेळीही पदक जिंकण्याची सर्वांना अपेक्षा आहे.



# NSUI चे 'मुलींना वाचवा, महिलांना वाचवा, महाराष्ट्र वाचवा', अभियान.

प्रतिनिधी
■ मुंबई

बदलापूरच्या घटनेने राज्याची मान शरमेने खाली गेली असून छत्रपती शिवाजी महाराज, शाहू, फुले, व आंबेडकर यांच्या राज्यात महिला तसेच शाळा, कॉलेजातील मुलीही सुरक्षित राहिलेल्या नाहीत. भाजपा महायुती सरकार महिला व मुलींचे संरक्षण करण्यात अपयशी ठरले आहे. या सरकारच्या विरोधात काँग्रेसची विद्यार्थी संघटना एनएसयुआय राज्यातील शाळा, महाविद्यालयामध्ये आंदोलन करणार आहेत, तसेच सह्यांची मोहिम राबवणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे.

टिळक भवनमध्ये पत्रकारांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, भाजपा युती सरकार महिला व मुलींना संरक्षण देऊ शकत नाही. मा. उच्च न्यायालयानेही या सरकारला फटकारले आहे तरीही त्यांना जाग येत नाही. महिलांचे संरक्षण तर ते करु शकत नाहीतच उलट मुलींनी ७ वाजल्यानंतर बाहेर पडू नये असे सल्ले देत आहेत. संवेदना नसलेल्या महायुती सरकारच्या विरोधात काँग्रेसची विद्यार्थी संघटना जनजागृती करुन मुलींना आश्वस्त करणार आहे, असेही पटोले म्हणाले.या आंदोलनाची आणि जागृती मोहिमेची माहिती एनएसयुआयचे प्रदेशाध्यक्ष आमीर शेख यांनी दिली.

# ऑलिम्पिकनंतर भारतीय संघ आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी खेळणार

## 8 सप्टेंबरला चीनविरुद्ध पहिला सामना

## श्रीजेशच्या निवृत्तीनंतर कृष्ण बहादूर पाठक गोलरक्षक

वृत्तसंस्था
■ नवी दिल्ली

चीनमध्ये होणाऱ्या आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी हॉकी इंडियाने बुधवारी 18 सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली. हरमनप्रीत सिंग या स्पर्धेत संघाचे नेतृत्व करणार आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकणाऱ्या १० खेळाडूंना या संघात स्थान देण्यात आले आहे. तर 5 खेळाडूंना विश्रांती देण्यात आली आहे.

ही स्पर्धा ८ ते १७ सप्टेंबर २०२४ या कालावधीत इनर मंगोलियातील हुलुनबुर येथे खेळवली जाईल. भारताचा पहिला सामना यजमान चीनविरुद्ध 8 सप्टेंबरला होणार आहे. भारतीय संघ या स्पर्धेचा गतविजेता आहे. गतवर्षी या संघाने स्पर्धेच्या अंतिम सामन्यात मलेशियाचा पराभव करून विजेतेपद पटकावले होते. त्यामुळे भारतीय संघ या स्पर्धेत आपले विजेतेपद राखणार आहे.



भारतीय हॉकी संघाचा अनुभवी गोलरक्षक पीआर श्रीजेश पॅरिस ऑलिम्पिकनंतर निवृत्त झाला. त्यामुळे संघातील गोलरक्षकाच्या भूमिकेसाठी श्रीजेशच्या जागी कृष्ण बहादूर पाठक आणि सूरज कारकेरा यांची निवड करण्यात आली आहे.

***आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी भारतीय पुरुष हॉकी संघ***

*गोलकीपर: कृष्ण बहादूर पाठक, सूरज कारकेरा.*
*डिफेंडर: जर्मनप्रीत सिंग, अमित रोहिदास, हरमनप्रीत सिंग (कर्णधार), जुगराज सिंग, संजय, सुमित.*
*मिडफिल्डर: राज कुमार पाल, नीलकंठ शर्मा, विवेक सागर प्रसाद (उपकर्णधार), मनप्रीत सिंग, मोहम्मद राहिल मौसीन.*
*फॉरवर्ड: अभिषेक, सुखजित सिंग, अरिजित सिंग हुंडल, उत्तम सिंग, गुरज्योत सिंग.*

# 10वी अ.भा. रेल्वे वेटलिफ्टिंग; मध्य रेल्वे महिला संघाला जेतेपद

## महिला वेटलिफ्टर्सनी केली पदकांची लयलूट



प्रतिनिधी
■ मुंबई

मध्य रेल्वेने २४ ते २८ ऑगस्ट २०२४ याकालावधीत महालक्ष्मी मैदान, मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या १०व्या महिला अखिल भारतीय रेल्वे वेटलिफ्टिंग स्पर्धेत विजय मिळवला. वेस्टर्न रेल्वे स्पोर्ट्स असोसिएशन (डब्लुआरएसऐ) द्वारे आयोजित या प्रतिष्ठित स्पर्धेत सर्व अव्वल रेल्वे वेटलिफ्टर्सचा सहभाग होता.

मध्य रेल्वेच्या महिला वेटलिफ्टर्सनी उत्कृष्ट कामगिरी करून, अनेक पदके मिळवून आणि राष्ट्रीय विक्रम मोडीत काढत संघाला एकूण २२७ गुणांसह शानदार सांघिक जेतेपद patkaavll . मध्य रेल्वेच्या महिला संघाने एकूण सांघिक स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. पश्चिम रेल्वेने २२४ गुणांसह उपविजेतेपद पटकावले.

***मध्य रेल्वेच्या महिला संघाची कामगिरी***

- *वंशिता वर्मा (CCTC, मुंबई विभाग) - क्लीन अँड जर्कमध्ये २ नवीन राष्ट्रीय विक्रम प्रस्थापित करून ८१ किलो गटात सुवर्णपदक मिळवले.*
- *सारिका शिनगारे (वरिष्ठ लिपिक, लोणावळा) हिने ४९ किलो गटात रौप्य पदक जिंकले.*
- *साक्षी म्हस्के (CCTC, लोणावळा) - ५५ किलो गटात रौप्य पदक जिंकले.*
- *सारिका शिनगारे (वरिष्ठ लिपिक, लोणावळा) हिने ४९ किलो गटात रौप्य पदक जिंकले.*
- *साक्षी म्हस्के (CCTC, लोणावळा) - ५५ किलो गटात रौप्य पदक जिंकले.*
- *केतकी नवले (CCTC, मुंबई विभाग) - 76 किलो गटात ब्राँझ पदक जिंकले.*
- *शेहल भोंगळे (पॉइंट्समन, सोलापूर विभाग) - 87 किलो गटात ब्राँझ पदक जिंकले.*
- *अमर्थ ई.पी. (ज्यु. लिपिक, भुसावळ विभाग) - ४५ किलो गटात भाग घेतला, चौथा क्रमांक मिळवला.*
- *मीरा जगदाळे (CCTC, माटुंगा) हिने ५९ किलो गटात चौथे स्थान पटकावले.*
- *सोनल सावंत (CCTC, मुंबई विभाग) - ६४ किलो गटात चौथा क्रमांक मिळवला.*
- *अश्विनी आंबेकर (स्थानक उप-व्यवस्थापक, भुसावळ विभाग) - ७१ किलो गटात पाचव्या स्थानावर.*
- *स्वाती कृष्णा नायर (वरिष्ठ CCTC, मुंबई विभाग) - ७१ किलो गटात १०व्या स्थानावर.*

# कुर्ल्यात भाजपचा दहीहंडी उत्सव पार पडला शिस्तबद्ध आणि उत्साही वातावरणात

प्रतिनिधी
■ मुंबई

कलिना विधानसभा अंतर्गत कुर्ला पश्चिम इक्विनॉक्स बिझनेस पार्क समोर भाजप नेते डॉ. नितीश राजहंस सिंह यांनी आयोजित केलेला भव्य दहीकाला उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी अकरा वाजता सुरू झालेल्या दहीहंडी उत्सवात शेकडो गोविंदा मंडळांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला.



डॉ नितीश राजहंस सिंह यांनी आयोजित केलेल्या या भव्य दहीहंडी कार्यक्रमाचे हे तिसरे वर्ष आहे. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे, मुंबईच्या कानाकोपऱ्यातून मोठ्या संख्येने गोविंदा मंडळ कुर्ल्याच्या या भव्य कार्यक्रमात सहभागी झाले होते. यावेळी गोविंदापथावर यासह आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली होती. बैल बाजारातील श्री बालविकास मित्र मंडळाने हंडी फोडली. लेडी गोविंदानेही मडके फोडण्याच्या कामात सक्रिय सहभाग घेतला.

या कार्यक्रमात मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार राजहंस सिंह, संजय उपाध्याय, आचार्य पवन त्रिपाठी, मुंबई उपाध्यक्ष अमरजीत सिंह, मुंबई सचिव महेश पारकर, मुंबई प्रवक्ते अजय सिंग, अल्पसंख्याक मुंबई अध्यक्ष वसीम खान, अनिल गलगली, जिल्हाध्यक्ष सुषम सावंत, अजय शुक्ला, प्रभाग अध्यक्ष दिपू सिंग, भाग्येश चौधरी यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच यावेळी 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या मराठी विनोदी कार्यक्रमातील रसिकांच्या उपस्थितीने वातावरण विनोदी बनले होते.

# काँग्रेसतर्फे गोरेगावमध्ये दहीहंडी उत्सवाचे आयोजन

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रामध्ये दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला. काँग्रेस पक्षातर्फे मुंबईमध्ये अनेक ठिकाणी लाखोंच्या दहीहंडीचे आयोजन करण्यात आले होते. त्याअनुषंगाने मुंबई महिला उपाध्यक्षा माधवी राणे, ब्लॉक अध्यक्ष गौरव राणे यांच्या संकल्पना, आयोजन व प्रवीण शिंदे यांच्या प्रयत्नातून पुरुष व महिलांसाठी हार्मनी मॉल, भगतसिंग, लिंक रोड, गोरेगाव पश्चिम येथे दहीहंडी उभारण्यात आली होती.

या उत्सवाला प्रमुख अतिथी म्हणून वर्षा गायकवाड यांच्यासह काँग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), राष्ट्रवादी (शरद पवार) यांच्या पक्षाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या दहीहंडी महोत्सवात



मानाची हंडी (पुरुष) जगदंब गोविंदा पथक व (महिला) स्वराज्य महिला गोविंदा पथक या दहीहंडी मंडळाला मान देण्यात आला.

या कार्यक्रमाला मानसी रूपवते, जमनाबेन ठाकूर, वैशाली, सुशीला चौरसिया, मुजंबिल खान, विलास इंदुलकर, विजय जैस्वाल , बालाजी, नासीर खान,विनोद जैस्वाल, सायमन सिक्वेरा, मनीष पटेल, कादिर कछावा, विनोद सोनवणे, अनावर शेख,संदीप कानोजिया, वसीम शेख, हरिश्चंद्र यादव, अतुल कांबळे, राकेश विश्वकर्मा, दीपक गुप्ता, राजेश राय, सुवरात गुप्ता, फिरोज हाश्मी, लक्ष्मण गुप्ता, केतन कासारे, मुन्ना जैस्वाल, मोतीलाल गुप्ता, सतीश माने, युवराज काटे, अजय गुप्ता व काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली.

# यंदाच्या दहीहंडी उत्सवात 245 गोविंदा जखमी

## ३२ दाखल, २१३ उपचारानंतर घरी

प्रतिनिधी
■ मुंबई

यंदाचा ही दहीहंडी उत्सव पारंपरिक.पद्धतीने जल्लोषात साजरा झाला. मात्र उंच असलेली दहीहंडी फोडण्यासाठी रचलेले थर कोसळून २४५ गोविंदा जखमी झाले आहेत. त्यापैकी विविध रुग्णालयात ३२ जखमींना दाखल करून घेण्यात आले आहे. तर २१३ जखमी गोविंदावर उपचार करून त्यांना घरी पाठवण्यात आले आहे.

के ई एम हॉस्पिटल मध्ये दाखल असलेल्या एकूण १० पैकी त्यातील २ रुग्ण डॉक्टरांच्या देखरेखेखाली आहेत त्यांना यदाकदाचित डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार घरी पाठवण्याची शक्यता आहे. मात्र उर्वरित ८ पैकी ५ गोविंदांना गंभीर इजा झाली आहे पण सद्य परिस्थिती मध्ये त्यांच्या जीवितास धोका नाही त्यांच्यावर ऑर्थोपेडिक विभाग अंतर्गत सर्जरी केली जाण्याची शक्यता आहे.

जे जे रुग्णालयात - ४ (१ दाखल ३ घरी पाठवले), सेंट जॉर्ज रुग्णालयात - ८ (३ दाखल ५ घरी पाठवले), पोद्दार रुग्णालयात - १८ (सर्व घरी), जी.टी. रुग्णालय -५ (सर्व घरी) , केईएम रुग्णालयात - ५१ ( ११ दाखल आणि ४० घरी पाठवले), नायर रुग्णालयात - १२ (१ दाखल ११ जणांना घरी पाठवले), सायन रुग्णालयात - २० (३ दाखल १७ घरी पाठवले) ,राजावाडी रुग्णालयात - १४ (१० दाखल ४ घरी पाठवले) , वीर सावरकर रुग्णालय - ३ (सर्व घरी पाठवले), एम टअगरवाल रुग्णालयात - २ (१ दाखल १ घरी पाठवले),कुर्ला भाभा रुग्णालयात - ५(१ दाखल ४ घरी पाठवले) , शताब्दी रुग्णालय , गोवंडी- १३ (सर्वांना घरी पाठवले), वांद्रे भाभा - ९ (सर्व घरी), ट्रॉमा केअर - २७ ( ३ दाखल २४ घरी पाठवले), व्ही एन देसाई - २९ (सर्व घरी),एम डब्ल्यू देसाई रुग्णालय - २(घरी पाठवले), डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय - १९ (३ दाखल १६ घरी ) , आर एन कूपर - ३, लीलावती - १ दाखल असे एकूण २४५ गोविंदा दहिहंडी उत्सव साजरा करताना जखमी झाले. त्यापैकी ३२ जखमींवर विविध सरकारी , महापालिका रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

# साकीनाक्यात सुरक्षेचे निकष डावलले, बांधकाम कंत्राटदारांकडून कामगारांचा जीव धोक्यात

प्रतिनिधी
■ मुंबई

बांधकाम साइटवर काम करणाऱ्या मजुरांच्या सुरक्षेसाठी, महाराष्ट्र सरकारने अलीकडेच महाराष्ट्र बांधकाम आणि इतर कामगार मंडळ 2024 ची स्थापना केली आहे. महाराष्ट्र सरकारने मजुरांना कामावर ठेवणाऱ्या कंत्राटदारांना सुरक्षा नियमांचे पालन करण्याच्या सक्त सूचनाही दिल्या असून, सुरक्षा मानकांचे पालन न करणाऱ्या कंत्राटदारांना तुरुंगात पाठवण्याची तरतूदही या मंडळाकडून करण्यात आली आहे. बोर्डाच्या नियमांचे उल्लंघन कुर्ल्यातील एल वॉर्ड अंतर्गत प्रभाग क्रमांक 156 मधील साकीविहार रोडवर असलेल्या शाह इंडस्ट्रियल इस्टेटमधील इमारतीत 100 खोल्यांच्या लॉजचे बांधकाम कोणतीही कायदेशीर परवानगी न घेता सुरू आहे. कारण ठेकेदाराला काम लवकर पूर्ण करायचे असते, त्यामुळे या बांधकामात कंत्राटदाराकडून कामगारांना सुरक्षा साधने न देता कामे करून घेतली जात आहेत. एवढेच नव्हे तर रात्रंदिवस चोवीस तास काम सुरू आहे. कृपया लक्षात घ्या की बांधकाम कामासाठी, कामगारांना टोप्या, शूज आणि इतर सुरक्षा उपकरणे घालणे अनिवार्य आहे.

जेणेकरून कोणतीही दुर्घटना घडल्यास कामगाराचे मोठे नुकसान होणार नाही. स्थानिक सामाजिक कार्यकर्ते रूपेश रवी ढोणे यांनी महापालिका प्रशासन, अग्निशमन दल आणि पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून देऊन या बांधकामाच्या ठेकेदारावर कारवाई करावी, अशी मागणी केली. महापालिका, अग्निशमन दल आणि पोलिसांचे वरिष्ठ अधिकारी रुपेश रवी ढोणे यांनी संबंधित विभागांना सुरक्षा उपायांचे पालन करण्याच्या सूचना दिल्याची माहिती दिली आहे. मात्र अद्यापही कामगारांना सेफ्टी किट देण्यात आले नसल्याचा आरोप रुपेश रवी ढोणे यांनी केला आहे.अशा परिस्थितीत सर्व कामगारांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे संबंधित विभागाची चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी करण्यात आली आहे.

# अंधेरी विकास मंच आयोजित दहीहंडी उत्सवात शेकडो मंडळांची सलामी

प्रतिनिधी
■ मुंबई

गोविंदा रे गोपाळा यशोदेच्या तान्ह्या बाळा, जय जय बजरंग बली की जय च्या गजरात अंधेरी विकास मंच आयोजित दहीहंडी उत्सवात शेकडो मंडळांनी हजेरी लावत सलामी देऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अंधेरी पूर्व मरोळ येथे शिवसेना पुरस्कृत अंधेरी विकास मंचने आयोजित केलेल्या भव्य दहीहंडीला मोठी गर्दी झाली होती.

गोविंदा उत्सवाचे आयोजक शिवसेना संघटक महाराष्ट्र राज्य, माजी नगरसेवक कमलेश राय आणि युवासेनेचे लोकसभा अध्यक्ष रितेश राय यांच्या माध्यमातून सालाबादप्रमाणे यंदाही वर्षी गोपाळ काळाचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी उत्तर पश्चिम जिल्ह्याचे खासदार रवींद्र वायकर आणि माजी



पोलीस अधिकारी प्रदीप शर्मा यांनी कार्यक्रमात सहभाग घेऊन सर्वांचे अभिनंदन केले. यावेळी गोविंदा उत्सवाचे आयोजक कमलेश राय म्हणाले की भगवान कृष्णाची कृपा सर्वांवर होऊ दे सर्वांना आनंदी आणि निरोगी ठेव. यावेळी एकामागून एक शेकडो गोविंदा पथकांनी मटका फोडण्याचा प्रयत्न केला. मात्र फक्त सात टप्पे गाठू शकले. शेवटी स्थानिक गोविंदांनी यश संपादन केले त्यांना 111111 रुपयांचे बक्षीस व प्रमाणपत्र देण्यात आले. या गर्दीत हितचिंतकांनी कमलेश राय आणि 82 युवा शाखा प्रमुख रितेश राय यांना उभे केले आणि शेवटचे दहीहंडी फोडणाऱ्यां पथकाला निर्धारित बक्षीस दिले. मंचावर शिवसेनेचे अनेक सदस्य, पदाधिकाऱ्यांच्या व्यतिरिक्त हजारो स्थानिक लोक उपस्थित होते.



*मुंबई : शिवसेना कांजूर शाखा आयोजित भव्य दहीहंडी सोहळ्यात कांजूर विभागातील बाळ गोपाळ मित्र मंडळाने आठ थर लावून हंडी फोडली. त्यांना रोख रक्कम व भव्य चषक म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेना अध्यक्ष बाबा कदम व ईशान्य मुंबईच्या युवतीप्रमुख राजोल पाटील यांच्या प्रदान करण्यात आले. यावेळी खा संजय पाटील, आमदार सुनील राऊत, अनंत पाताडे, सिध्दी जाधव, दिपाली पाटील, रवि महाडिक, भारती शिंगटे, कमलाकर पवार, विजय तोडणकर, महेश पाताडे, शुभांगी शिंदे, छाया शिंदे, श्वेता पावसकर, विपुल शिंदे, लीना मांडलेकर, मीनाक्षी पाटील, भास्कर परब इ. कार्यकर्ते उपस्थित होते.*


## बृहन्मुंबई महानगरपालिका

### वृक्ष प्राधिकरण

**-जाहिर सूचना-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ ( जानेवारी, २०१८ पर्यंत सुधारीत) कलम ८(३) (क) मधील तरतुदीनुसार, परिमंडळ- ६ मधील 'एस' विभागातील ०१ प्रस्ताव अशा एकूण ०१ प्रस्तावास महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ (जानेवारी, २०१८ पर्यंत सुधारीत) च्या कलम ८ पोटकलम ६ अन्वये मा. म. न. पा. आयुक्त / अध्यक्ष वृक्ष प्राधिकरण यांची मंजूरी प्राप्त झाली आहे.

उपरोक्त मंजूर केलेल्या प्रस्तावांबाबत संपूर्ण तपशील हा म.न.पा.च्या https://portal.mcgm.gov.in/ संकेतस्थळावर बृहन्मुंबई महानगरपालिके विषयी -- विभाग आणि खाते -- खातेनिहाय माहिती पुस्तिका -- उद्याने व वृक्ष प्राधिकरण -- कागदपत्रे या लिंकवर उपलब्ध आहे. ७२२ ( एस ). सदर प्रस्तावाचे मंजुर मसुदापत्र महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर दि. २६/०८/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले असल्याने, दि. १५/०९/२०२४ रोजी २१ दिवस पुर्ण होत आहेत.

**उद्यान अधिक्षक व वृक्ष अधिकारी**
वृक्ष प्राधिकरण कार्यालय,
हम्बोल्ट पेंग्विन इमारत,
२ रा माळा, वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, भायखळा (पूर्व),
मुंबई - ४०००२७, दुरध्वनी क्र. २३७४२१६२
E.mail sg.gardens@mcgm.gov.in

पीआरओ/०८०/जाही/२०२४-२५

**गप्पी मासे पाळा, मलेरिया टाळा.**

सही/-
उद्यान अधीक्षक व
वृक्ष अधिकारी



महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी मर्यादित

## ई-निविदा सूचना

वायू विद्युत केंद्र, उरण येथे खालील कामांच्या पुरवठा / कामांसाठी अनुभवी व प्रतिष्ठित उत्पादक / पुरवठादार / कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवल्या जात आहेत.

| ई-निविदा | वर्णन | अंदाजित खर्च/ ई.एम.डी. (रु.) | विक्री कालावधी | भरण्याची अंतिम तारीख (१५:०० तासांपर्यंत) |
|---|---|---|---|---|
| ई-निविदा ३००००५०९०१ | वायू विद्युत केंद्र, उरण येथे विविध चाचणी साधनांचा पुरवठा करणेबाबत. | ०९.१५ लक्ष १२,६५२/- | २९.०८.२०२४ ते १६.०९.२०२४ | १७.०९.२०२४ |
| ई-निविदा ३००००५०९७२ | वायू विद्युत केंद्र, उरण येथे विद्युत सहाय्यकांच्या (आवश्यकतेनुसार आणि जेव्हा) प्रतिबंधात्मक आणि संबंधित देखभालीसाठी मदत करण्याचे काम करणेबाबत. | ०७.०२ लक्ष १०,५२९/- | २९.०८.२०२४ ते ११.०९.२०२४ | १२.०९.२०२४ |
| ई-निविदा ३००००५१०५१ | वायू विद्युत केंद्र, उरण येथे इलेक्ट्रोमॅग्नेटिक फ्लो ट्रान्समीटरचा पुरवठा, स्थापना आणि चालू करणेबाबत. | ०५.१६ लक्ष ८,६६०/- | २९.०८.२०२४ ते १६.०९.२०२४ | १७.०९.२०२४ |
| ई-निविदा ३००००५१०५३ | वायू विद्युत केंद्र, उरण येथे रूट व्हॉल्व्हसह विविध ड्रेन आणि व्हेंट पाइपलाइन बदलण्याचे काम करणेबाबत. | ०८.८३ लक्ष १२,३४०/- | २९.०८.२०२४ ते ११.०९.२०२४ | १२.०९.२०२४ |
| ई-निविदा ३००००५१०६७ | वायू विद्युत केंद्र, उरण येथे दुसऱ्या टप्प्यात बॅटरी चार्जरचा पुरवठा, इन्स्टॉलेशन आणि चालू करणेबाबत. | ५८.४७ लक्ष ६१,९७८/- | २९.०८.२०२४ ते ०६.०९.२०२४ | ०७.०९.२०२४ |
| ई-निविदा ३००००५११६० | वायू विद्युत केंद्र, उरण येथे स्टेज ।। गॅस टर्बाइन युनिट्स आणि गॅस स्किड क्षेत्रासाठी गॅस लीक डिटेक्टर अलार्म सिस्टमची देखभाल करण्याचे काम करणेबाबत. | ०१.९९ लक्ष ५,४९८/- | २९.०८.२०२४ ते ०६.०९.२०२४ | ०७.०९.२०२४ |
| ई-निविदा ३००००५११६९ | वायू विद्युत केंद्र, उरण येथे फोर्क टाईप लेव्हल स्विचचा पुरवठा, इन्स्टॉलेशन आणि चालू करणे करणेबाबत. | ०६.७६ लक्ष १०,२६०/- | २९.०८.२०२४ ते १६.०९.२०२४ | १७.०९.२०२४ |
| ई-निविदा ३००००५१३०९ | वायू विद्युत केंद्र, उरण येथे गॅस टर्बाइन एक्झॉस्ट चिमणीसाठी नॉन-मेटलिक एक्स्पेन्शन जॉइंटचा पुरवठा आणि स्थापना करणेबाबत. | ३८.०० लक्ष ४१,५००/- | २९.०८.२०२४ ते १६.०९.२०२४ | १७.०९.२०२४ |
| ई-निविदा ३००००५१३१० | वायू विद्युत केंद्र, उरण येथे 1 वर्षासाठी 100Mbps 1:1 इंटरनेट लीज्ड लाइन (फायबर+RF) सेवा प्रदान करणे करणेबाबत. | ०४.०१ लक्ष ७,५१८/- | २९.०८.२०२४ ते ११.०९.२०२४ | १२.०९.२०२४ |
| ई-निविदा ३००००५१३१२ | वायू विद्युत केंद्र, उरण येथे WHR बॉयलरसाठी बॉयलर डक्ट प्लेट 16Mo3 चा पुरवठा करणेबाबत. | ३२.५८ लक्ष ३६,०८८/- | २९.०८.२०२४ ते १६.०९.२०२४ | १७.०९.२०२४ |

सर्व निविदांसाठी निविदा किंमत रु.११८०/- निविदा खर्च आणि ई.एम.डी. केवळ ऑनलाइन भरणे. आमच्या वेबसाइटवर दिनांक **२९.०८.२०२४** पासून विक्रीसाठी निविदा उपलब्ध आहेत किंवा अधिक तपशीलासाठी कृपया आमच्या वेबसाइटवर भेट द्या **https://eprocurement.mahagenco.in** संपर्क तपशील: - EE (P&C) - 91-9167007841 विक्रेत्यांना विनंती कि ई-निविदेसाठी फर्म नोंदणी करून घ्यावी. कृपया आमच्या वेबसाइटवर लॉग इन करा **https://eprocurement.mahagenco.in**

**Sd/-**
**Chief Engineer, GTPS Uran**

# अखेर महाराष्ट्रद्वेष्ट्यांनी सुरतेच्या लुटीचा बदला घेतलाच...!

- शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळवून गुजराती लॉबीने महाराष्ट्राची अस्मिता मिळवली धुळीस
- कार्यकारी अभियंता सर्वगौड हे बांधकाम मंत्र्यांचे जिल्ह्यातील हस्तक म्हणुन काम पाहत आहेत का?
- भ्रष्ट अधिकाऱ्यावर मंत्र्यांची एवढी मेहेरबानी का?
- बांधकाम विभागाचा संबंध नसेल तर एफआयआर देण्यासाठी बांधकाम मंत्री स्वतः का गेले होते.?
- नवशिक्या पोराला महाराजांच्या पुतळ्याचे कंत्राट देण्यामागे मोठे षडयंत्र
- पुतळ्याचे स्ट्रक्चरल ऑडिट करायची साधी अक्कल बांधकाम विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना नव्हती का?
- शंभर फुटी पुतळा उभारून पुन्हा त्या कामात अधिकचा मलिदा खायचा आहे का?

**"राजकोट** येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा अलीकडेच बांधलेला पुतळा कोसळला...!" ही बातमी ऐकली आणि काळजात एकाएकी धस्स झालं. म्हणायला गेल तर फक्त महाराजांचा पुतळाच कोसळला होता पण खरं सांगायच झालं तर राजकोटला त्या पुतळ्यासोबत महाराष्ट्राची अस्मिता सुद्धा ढासळली होती. महाराष्ट्राचा नेहमीच द्वेष करणाऱ्या गुजराती लॉबीने महाराष्ट्राची अस्मिता असलेल्या शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळवून संपुर्ण जगभरात महाराष्ट्राची आणि पर्यायाने मराठी माणसांची नाचक्की केली. शिवाजी महाराजांनी सुरतेची तब्बल दोन वेळा लूट केली होती ही जखम अश्वत्थामाच्या कपाळावरील जखमेसारखी नेहमीच गुजरात्यांच्या मनात ठसठसत असते. आज गुजरात लॉबीसमोर लाचार झालेल्या आपल्यातीलच काही गद्दारांच्या मदतीने शेवटी या सुरतेच्या लुटीचा गुजराती लॉबीने बदला घेतला. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंनी स्थापन केलेल्या शिवसेनेचे तुकडे-तुकडे करून महाराष्ट्राच्या अस्मितेवर घाव घालण्याच्या गुजरात लॉबीच्या प्रयत्नांना आज तब्बल दोन वर्षांनी घवघवीत यश मिळाले. महाराष्ट्राची अस्मिता पुर्णपणे धुळीस मिळाली. औरंगजेब उभ्या आयुष्यात शिवरायांना एकदाही जमीनीवर खाली पाडू शकला नव्हता आणि या गोष्टीचे त्याला आजन्म शल्य राहिले होते. जी किमया औरंगजेबाला करता आली नाही तीच किमया गुजराती लॉबीने करून दाखवली. महाराष्ट्राचे आराध्य दैवत आणि हिंदवी स्वराज्याचे संस्थापक असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळावा आणि तोही उद्घाटनानंतर केवळ नऊ महिन्यात...? काय चेष्टा चालवलीय काय...?? होय... महाराष्ट्राची चेष्टाच चालवलीय...! दोन वर्षांपूर्वी वेदांता-फॉक्सकॉनचा प्रकल्प गुजरातला पळवला गेला. गुजरात लॉबीने लाचार झालेल्या गद्दारांना सोबत घेऊन महाराष्ट्राचा पद्धतशीरपणे लचका तोडला. आपल्याकडे विरोधकांनी महिनाभर गोंधळ घातला आणि नंतर ते सुद्धा शांत बसले. महाराष्ट्रातील दोन लाख युवकांच्या नोकऱ्यांचा घास हिरावून गुजरातला भरवला जात असताना आपण नुसतेच उघड्या डोळ्यांनी पाहत राहिलो. खरं तर तेव्हाच महाराष्ट्राची अस्मिता एक ना एक दिवस ही गुजरात लॉबी पायदळी तुडवणार, हे निश्चित झाले होते. अखेरीस काल तो दिवस उजाडला आणि महाराष्ट्राची अस्मिता त्या पुतळ्यासोबत पायदळी तुडवली गेली. दहा वर्षांपूर्वी 'छत्रपती का आशीर्वाद, चलो चले मोदी कें साथ' अशा आशयाची होर्डिंग्ज महाराष्ट्रभर लावुन भाजपने विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनतेची मते मिळवली होती. आता त्याच छत्रपती शिवाजी महाराजांचा पंतप्रधान मोदींनी उदघाटन केलेला पुतळा कोसळल्यानंतर तथाकथित विश्वगुरूनी तोंडातून चकार शब्द सुद्धा काढला नाही. आज त्यांनी उदघाटन केलेल्या पुतळयाचे अवशेष इकडेतिकडे अस्ताव्यस्त विखुरलेले असताना स्वतः मोदी कुठल्या बिळात लपुन बसले आहेत...? याजसाठी केला होता का पुतळा उभारणीचा अट्टाहास...? याचाच अर्थ मोदींना शिवरायांविषयी वाटणारा कळवळा हा खोटा होता आणि त्यांनी मराठी लोकांच्या मतांसाठी केलेली ती एक प्रकारची बेगमी होती. गुजराती लॉबीला महाराष्ट्राविषयी फक्त असूया आहे. आता या घटनेनंतरही आपण शांत बसलो तर छत्रपती शिवाजी महाराज आपल्याला कधीच माफ करणार नाहीत.

जरा आठवा ती दिनांक २० जुन २०२२ ची काळी रात्र...! रात्रीच्या अंधारात गद्दारांची एक तुकडी सर्वप्रथम महाराष्ट्रातून सुरतेला रवाना झाली. जी सुरत आमच्या महाराजांनी एकदा नव्हे तर दोनदा लुटली होती, त्याच सुरतेमध्ये गुजराती लॉबीच्या अहमदशाह अब्दालीने लाचार झालेल्या चाळीस गद्दारांना राजाश्रय देत त्यांना आपल्या पायांवर नाक घासायला लावुन महाराष्ट्राचे लचके तोडायची मोहीम हाती घेतली. त्यादिवशी या चाळीस गद्दारांनी महाराष्ट्राची अस्मिता गुजरात लॉबीच्या चरणी अक्षरशः गहाण ठेवली आणि त्यानंतर महाराष्ट्राचे अधःपतन होणार हे सुनिश्चित झाले. त्याअगोदरही साठच्या दशकात मोरारजी देसाईसारख्या तत्कालीन गुजराती लॉबीने महाराष्ट्रातून मुंबई पळवण्यासाठी पुरेपुर प्रयत्न केले होते पण मराठी माणुस मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र या मागणीवर ठाम राहिला. त्यासाठी एकशे पाचहुन अधिक हुतात्म्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. महाराष्ट्रापासुन मुंबई तोडण्याचा गुजराती लॉबीचा डाव फसला. तेव्हा सुद्धा महाराष्ट्रापासुन मुंबई तोडून छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेल्या सुरतेच्या लुटीचा बदला घेण्याचा आटोकाट प्रयत्न तत्कालीन गुजराती लॉबीने केला होता पण महाराष्ट्रातील मराठी लोकांनी प्रसंगी आपले बलिदान देऊन तो यशस्वीरित्या हाणून पाडला. त्यावेळी महाराष्ट्रात सी डी देशमुखांसारखे ताठ कणा असलेले स्वाभिमानी नेते होते. त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी आपल्या केंद्रीय मंत्रीपदाचा राजीनामा भर संसदेत देशाच्या पंतप्रधानांच्या तोंडावर फेकुन मारला होता. महाराष्ट्राच्या अस्मितेपेक्षा आम्हाला कुठलीही गोष्ट अधिक प्रिय नाही, हे संसदेत सर्वांसमोर ठणकावून सांगितले होते. सी डी देशमुखांचा तो आवेश पाहुन गुजराती लॉबीचे धाबे दणाणले आणि मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा त्यांचा प्रयत्न फसला. आता मात्र पाठीचे कणे मोडलेले चाळीस गद्दार पन्नास खोक्यांपायी गुजरात लॉबीसमोर लाचार बनले आहेत आणि त्यामुळेच महाराष्ट्राचे लचके तोडायच्या गुजरात लॉबीच्या प्रयत्नांना यश मिळत आहे. राजकोट येथील महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळवून गुजराती लॉबीने महाराष्ट्राची अस्मिता धुळीस मिळवली आहेच. आता यानंतरही आपण उघड्या डोळ्यांनी तमाशा पाहत बसलो तर गुजराती लॉबी लाचार चाळीस गद्दारांच्या मदतीने आपली मुंबई केंद्रशासित केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेल्या सुरत लुटीचा बदला मुंबई केंद्रशासित झाल्यावरच पुर्ण होणार आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या अस्मितेला नख लावल्यानंतर गुजरात लॉबीचे पुढचे टार्गेट हे मुंबई केंद्रशासित प्रदेश करणे हेच असेल. त्यासाठीच राजकोट येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळला या घटनेकडे आपल्याला महाराष्ट्रद्वेष्ट्यांनी महाराष्ट्राविरुध्द रचलेले षडयंत्र म्हणुनच पाहावे लागेल.

**अनुपम कांबळी**

कालच्या दुर्घटनेनंतर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री म्हणत होते की, समुद्रकिनारी वाऱ्याचा वेग ताशी पंचेचाळीस किलोमीटर असल्यामुळे पुतळा पडला. मग पुतळा उभारला जात असताना समुद्रकिनारी वारा वाहत नव्हता का...? की काल एकाएकीच राजकोटमध्ये जोरजोरात वारा वाहू लागला...? गेली सत्तर वर्षे प्रतापगडावर शिवरायांचा पुतळा मोठ्या दिमाखात उभा आहे, तिकडे वारा वाहत नाही का...? सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण आपली जबाबदारी झटकताना सांगतायत की नौदलाने हा पुतळा उभारला. त्यांच्या विभागाचा पुतळ्याच्या बांधकामाशी काहीही संबंध नव्हता. मग ४ डिसेंबर २०२३ च्या नौदलाच्या कार्यक्रमात डोक्यावरच्या केसांपासून पायाच्या नखापर्यंत भ्रष्टाचाराने माखलेले सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अजयकुमार सर्वगौड पुढेपुढे करून का मिरवत होते...? आजपर्यंत लोकप्रतिनिधींनी अजयकुमार सर्वगौडवर भ्रष्टाचाराचे जाहीर आरोप करून देखील त्यावर सोयीस्करपणे चुप्पी साधुन सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी त्यांना नेहमीच पाठीशी घातले. आज त्यांना एका प्रश्नाचे उत्तर द्यावेच लागेल की, कार्यकारी अभियंता सर्वगौड हे सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील हस्तक म्हणुन काम पाहत आहेत का...? अशा भ्रष्ट अधिकाऱ्यावर मंत्र्यांची एवढी मेहेरबानी का आणि कशापायी...? जर पुतळ्याच्या बांधकामाशी सार्वजनिक बांधकाम विभागाचा संबंध नसेल तर पोलीस स्टेशनला एफआयआर देण्यासाठी सार्वजनिक बांधकाम मंत्री स्वतः का गेले होते...? आणि एफआयआर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहाय्यक अभियंत्याने का दिली...? एफआयआर देण्यासाठी नौदलाचे अधिकारी का उपस्थित राहिले नाहीत...? या प्रश्नाचे उत्तर नामदार रविंद्र चव्हाणांना द्यावेच लागेल. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या साध्या पुलाचे काम करायचे म्हटले तरी टेंडरमध्ये कंत्राटदाराच्या पात्रतेचे निकष नमुद केलेले असतात. त्यात एक निकष असतो तो म्हणजे 'सिमिलर टाईप ऑफ वर्क'...! म्हणजेच सदर टेंडर भरणाऱ्या कंत्राटदाराने अशाच प्रकारचे कोणतेही अन्य काम केलेले असणे बंधनकारक असते. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बनवताना हे सर्व निकष गुंडाळून ठेवण्यात आले होते का...? जयदीप आपटे या चौवीस वर्षांच्या पोराला राष्ट्रपुरुषाच्या पुतळ्याचे काम देताना कोणते निकष लावण्यात आले...? त्याने असे काय दिवे लावले होते की त्याला कोणतेही निकष न लावता छत्रपती शिवाजी महाराजांच्या २८ फुट उंच पुतळ्याच्या कामाचे टेंडर देण्यात आले...? माझ्या माहितीप्रमाणे जयदीप आपटेने हे काम करण्याअगोदर दीड फुट उंचीचे एक-दोन पुतळे बनवले होते. अशा नवशिक्या पोराला ४३ फुट उंच पुतळा बनवण्याचे कंत्राट देणारे अधिकारी खरोखरच डोक्यावर पडले होते का...? दोन मजली घर बांधणाऱ्या नवशिक्या इंजिनियरला कुणी सत्तर मजली टॉवर बांधण्याचे कंत्राट देईल का...? सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्याना महाराजांचा पुतळा हा खेळण्यातला वाटला होता का...? मुळात अशा प्रकारचा राष्ट्रपुरुषाचा पुतळा बनवण्यासाठी जेवढे जयदीप आपटेचे वय आहे तेवढ्या वर्षांचा त्या क्षेत्रातील अनुभव गाठीशी असावा लागतो. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पिंगुळी गावात दाजी पांचाळ नावाचे शिल्पकार आहेत. त्यांनी कन्याकुमारीला स्वामी विवेकानंदांचा पुतळा तयार केला आहे. त्यांच्यासारख्या अनुभवी शिल्पकाराला या पुतळ्याचे कंत्राट का देण्यात आले नाही...? जयदीप आपटेला हे काम देण्यामागे फक्त दोनच निकष होते- पहिली गोष्ट तो मुख्यमंत्र्यांच्या मुलाचा मित्र होता आणि त्याचे सनातन संस्थेसोबत संबंध होते. या दोन निकषांवर या अर्धवटरावाला महाराजांच्या पुतळ्याचे कंत्राट बहाल करण्यात आले. अगदी बारकाईने जयदीप आपटेची फेसबुक प्रोफाईल चेक केल्यास शिवरायांवर वार करणाऱ्या कृष्णा भास्कर कुलकर्णीच्या विकृत पाऊलखुणा आपल्याला त्याच्यामध्ये पाहायला मिळतील. अशा विकृत मानसिकता असलेल्या नवशिक्या पोराला महाराजांच्या पुतळ्याचे कंत्राट देण्यामागे फार मोठे षडयंत्र असण्याची शक्यता नाकारता येत नाही. एका मुलाखतीत या महाभागाने स्वतःची शेखी मिरवताना सांगितले होते की, जो पुतळा बनण्यासाठी साधारणतः तीन वर्षांचा कालावधी लागतो तोच पुतळा मी अवघ्या सहा महिन्यात तयार केला. मला एक गोष्ट कळत नाही की हा आपटे नेमकी कोणती जादूची कांडी घेऊन आलेला की अडीच वर्षे अगोदरच याने महाराजांचा पुतळा पूर्ण केला...? एका पंचवीस वर्षांच्या पोराने तयार केलेल्या पुतळ्याचे स्ट्रक्चरल ऑडिट करायची साधी अक्कल सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे नव्हती का...? की छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा भविष्यात खाली पाडून महाराष्ट्राच्या अस्मितेचे धिंडवडे उडावेत या सुप्त इच्छेपोटी सत्ताधारी पक्षाकडून जाणीवपूर्वक या पुतळ्याचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले नाही...?

पुतळ्याची स्ट्रक्चरल स्ट्रेंथ तपासली जाऊ शकते परंतु सत्ताधाऱ्यांची नैतिक ताकद कशी तपासायची...? ती नैतिक ताकद अंगीभूत असावी लागते. दिपक केसरकरांसारखा या सरकारमधील एक जबाबदार मंत्री म्हातारचळ लागल्यागत अकलेचे तारे तोडतो की वाईटातुनही काहीतरी चांगल घडल. यातूनच या सरकारची नैतिक ताकद तपासता येईल. निर्लज्जपणाची परिसीमा काय असेल तर ते दीपक केसरकरांचे वक्तव्य आहे. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या शिवरायांचा पुतळा कोसळलाय आणि या दुर्घटनेचे या माणसाला साधे सोयरसुतक नाही. इतका उच्च प्रतीचा कोडगेपणा कुठुन येतो...? अरे बेशरम माणसा जनाची नाही पण किमान मनाची तरी लाज बाळगायची...! काय तर म्हणे त्याच ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा शंभर फुटी पुतळा उभारणार...! दिपक केसरकर जो बूंद सें गई वो हौद सें नहीं आती...!! आता त्याच ठिकाणी महाराजांचे शंभर फुटी शंभर पुतळे उभरलात तरी हा पुतळा पडुन महाराष्ट्राची गेलेली अब्रु परत मिळणार नाही. अगोदरच तुमच्या दिवट्यांनी जे दिवे लावलेत त्याच्या लख्ख प्रकाशात सगळीकडे झगमगाट झालाय आणि केसरकरांना त्यात आणखीन दिवे लावायचे आहेत का...? छत्रपती शिवाजी महाराजांची झाली तेवढी अवहेलना कमी झाली नाही का...? की शंभर फुटी पुतळा उभारून त्या कामात पुन्हा एकदा अधिकचा मलिदा खायचा मिळेल म्हणुन नवीन पुतळा उभारायचा आहे...?? मोदींची ग्यारंटी ही भ्रष्टाचाराची ग्यारंटी आहे. अयोध्येत राम मंदिर बांधले तिकडे गळती सुरु झाली. अयोध्येतील रस्ते वर्षाच्या आत खचून गेले. नवीन संसद बांधली त्या संसदेला पहिल्याच पावसात गळती सुरु झाली. तिकडे वाराणसीत पंतप्रधान मोदींच्या मतदारसंघातील पुतळे वाऱ्यानेच उडून गेलेत. बिहारमध्ये एका मागुन एक पुल कोसळत आहेत. विमानतळावर छत कपाळावर कोसळून त्याखाली माणसे मारली जात आहेत. महाराष्ट्रात अटल सेतुला पहिल्याच पावसात भगदाड पडले आणि समृद्धी महामार्ग भ्रष्टाचाराच्या पुरात वाहुन गेला. फक्त पंतप्रधान मोदींमुळे या सर्व गोष्टी शक्य झाल्या आहेत. १९५७ साली तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरूनी प्रतापगडावर उदघाटन केलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा आजही दिमाखात उभा आहे आणि इकडे सिंधुदुर्गात पंतप्रधान मोदींनी उदघाटन केलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा अवघ्या नऊ महिन्यातच कोसळला. खरच सांगतो- "मोदी हैं तो मुमकिन हैं...!"

गुजरातमध्ये 'स्टेच्यू ऑफ युनिटी' हा सरदार वल्लभभाई पटेल यांचा १८२ मीटर उंचीचा पुतळा याच गुजरात लॉबीने उभा केला होता. त्याबद्दल आम्हाला आक्षेप असायचे काहीच कारण नाही. त्या पुतळ्याचे शिल्पकार राम सुतार हे आपल्याच महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यातील आहेत. त्याठिकाणी बांधकाम करण्याचे कंत्राट 'एल अँड टी' सारख्या प्रथितयश कंपनीला देण्यात आले. त्याच वेळी राजकोटला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याचे कंत्राट कुणा एका कंपनीला न देता मजूर संस्थांना त्या कामांचे वाटप करण्यात आले आणि पुतळा बनवण्याचे काम पंचवीस वर्षाच्या नवशिक्या जयदीप आपटेकडे देण्यात आले. सरदार पटेल यांच्यासोबत गुजराती अस्मिता जोडलेली असल्यामूळे त्यांच्या पुतळ्याच्या उभारणीसाठी एल अँड टी सारखी कंपनी आणि राम सुतारांसारखे वयाची नव्वदी पार केलेले अनुभवी शिल्पकार होते. मग महाराष्ट्राच्या अस्मितेचे काय...? गुजरातची अस्मिता ती अस्मिता आणि महाराष्ट्राची अस्मिता आम्ही बाजारात विकायला काढलीय का...? महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या शिवरायांच्या पुतळ्याचे बांधकाम करण्यासाठी पंचवीस वर्षांचा विकृत मानसिकता असलेला पोरगा निवडताना सरकारने अक्कल कुठे गहाण ठेवली होती...? एखादी दुर्घटना घडल्यानंतर त्या खात्याचा मंत्री संबंधित दुर्घटनेची नैतिक जबाबदारी स्वीकारून आपल्या पदाचा राजीनामा देतो असा प्रघात आहे. रेल्वे अपघातानंतर लालबहादूर शास्त्रींनी नैतिक जबाबदारी स्वीकारून आपल्या पदाचा राजीनामा देत हा पायंडा पाडला होता. अगदी अलीकडे सुरेश प्रभुंनी रेल्वे अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारून आपल्या केंद्रीय रेल्वेमंत्री पदाचा राजीनामा दिला. लालबहादूर शास्त्री किंवा सुरेश प्रभु या दोघांनीही "आम्ही काही अपघातग्रस्त रेल्वे चालवत नव्हतो" असे वक्तव्य करून आपली जबाबदारी झटकली नाही. राजकोट मधील शिवरायांचा पुतळा पडला या दुर्घटनेसाठी सर्वस्वी सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण हेच जबाबदार आहेत. त्यांनी या घटनेची नैतिक जबाबदारी स्वीकारून आपल्या पदाचा राजीनमा देणे अपेक्षित आहे. पण नितीमत्तेची अपेक्षा या घटनाबाह्य सरकारमधील मंत्र्यांकडून कशी करायची...? बदलापूरमध्ये चिमुरडीवर झालेल्या बलात्कारानंतर राज्याचे ग्रहमंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा देत नसतील तर त्यांचेच चेले असलेले रविंद्र चव्हाण आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा कशापायी देतील...? आडात नाही तर पोहऱ्यात तरी कुठुन येणार...? एकंदरीतच महाराष्ट्राची अस्मिता धुळीस मिळवण्यासाठी गुजरात लॉबीने हे जाणीवपूर्वक रचलेले षडयंत्र आहे आणि त्याला आपल्याच महाराष्ट्रातील चाळीस गद्दारांची साथ आहे. तसंही महाराष्ट्राला गद्दारीची किड शिवछत्रपतींच्या काळापासूनच आहे. तेव्हासुद्धा सूर्याजी पिसाळ, खंडोजी खोपडेसारखे गद्दार शत्रूला जाऊन मिळाले होते. आज त्यांच्याच औलादी पन्नास खोक्यांसाठी गुजराती लॉबीला जाऊन मिळाल्या आहेत. महाराष्ट्राचे लचके तोडणारे अनाजी पंत आजही शिवछत्रपतींचा बोगस पुतळा बनवुन महाराष्ट्राची अस्मिता धुळीस मिळवण्याची नापक कारस्थाने रचत आहेत. इतिहास साक्ष आहे की अशा कपटी अनाजी पंतांचा शेवट हत्तीच्या पायाखालीच झालेला आहे. येत्या विधानसभा निवडणुकीत गुजराती लॉबीशी हातमिळवणी करून महाराष्ट्राच्या अस्मितेला नख लावू पाहणाऱ्या महाराष्ट्रद्वेष्ट्या मंडळींची राजकीय कारकिर्द आपल्याला याच मातीत गाडून टाकावी लागेल. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची अवहेलना करणाऱ्या गद्दारांना कदापि क्षमा मिळणार नाही. महाराज जमल्यास आम्हांला माफ करा...! ●●●

# मी निराश व भयभीत !

## कोलकाता रेप-हत्या प्रकरणी राष्ट्रपतींचे हताश उद्गार

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**



कोलकाता येथील प्रशिक्षणार्थी डॉक्टरच्या बलात्कार-हत्या प्रकरणानंतर 20 दिवसांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पहिल्यांदाच विधान केले आहे. त्या म्हणाल्या की, या घटनेमुळे मी निराश आणि भयभीत झाले. महिलांवरील अत्याचार आता सहनशक्तीच्या पलीकडले झाले आहे. समाजाला अशा घटना विसरण्याची वाईट सवय आहे.

राष्ट्रपती मुर्मू यांनी मंगळवारी (27 ऑगस्ट) 'वुमेन्स सेफ्टी: इनफ इज इनफ' या लेखासंदर्भात पीटीआयच्या संपादकांशी चर्चा करताना या गोष्टी सांगितल्या. कोणताही सुसंस्कृत समाज आपल्या मुली आणि बहिणींवर असे अत्याचार करू देऊ शकत नाही, असे त्या म्हणाल्या.

कोलकाता येथील आरजी कर मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये 8-9 ऑगस्टच्या रात्री 31 वर्षीय प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आली होती. तिचा मृतदेह सेमिनार हॉलमध्ये आढळून आला. तिची मान मोडली. तोंड, डोळे आणि गुप्तांगातून रक्तस्त्राव होत होता.

राष्ट्रपतींनी लिहिले, कोलकाता येथे एका डॉक्टरच्या बलात्कार आणि हत्येच्या घटनेने देश हादरला आहे. जेव्हा मी याबद्दल ऐकले तेव्हा मी निराश आणि भयभीत झाले. अधिक खेदाची बाब म्हणजे ही घटना काही वेगळी नाही. हा महिलांवरील गुन्ह्यांचा एक भाग आहे.

कोलकात्यात विद्यार्थी, डॉक्टर आणि नागरिक आंदोलन करत असताना, गुन्हेगार इतरत्र पीडितांना शोधत होते. बालवाडीतील मुलींचाही बळींमध्ये समावेश होता. कोणताही सुसंस्कृत समाज आपल्या मुली आणि बहिणींवर असे अत्याचार करू देऊ शकत नाही. देशातील जनतेचा राग रास्त आहे, मलाही राग आहे.

मागच्या वर्षी महिला दिनानिमित्त मी वृत्तपत्रातील लेखाद्वारे माझे विचार आणि आशा व्यक्त केल्या होत्या. महिला सशक्तीकरणात आमच्या मागील कामगिरीबद्दल मी सकारात्मक आहे. भारतातील महिला सक्षमीकरणाच्या या अद्भुत प्रवासाचे मी स्वतःला एक उदाहरण मानते. पण, जेव्हा जेव्हा मी देशाच्या कोणत्याही कोपऱ्यात महिलांवरील गुन्ह्यांबद्दल ऐकतो तेव्हा मला खूप वेदना होतात.

मागच्या वर्षी महिला दिनानिमित्त मी वृत्तपत्रातील लेखाद्वारे माझे विचार आणि आशा व्यक्त केल्या होत्या. महिला सशक्तीकरणात आपल्या मागील यशाबद्दल मी सकारात्मक आहे. भारतातील महिला सक्षमीकरणाच्या या अद्भुत प्रवासाचे मी स्वतःला एक उदाहरण मानते. पण, जेव्हा जेव्हा मी देशाच्या कोणत्याही कोपऱ्यात महिलांवरील गुन्ह्यांबद्दल ऐकतो तेव्हा मला खूप वेदना होतात.

# इंडियन मेडिकल असोसिएशनची मोठी कारवाई; संदीप घोष यांचे सदस्यत्व निलंबित

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली**



पश्चिम बंगालच्या आरजीकर मेडिकल कॉलेजमधील महिला डॉक्टरवरील बलात्कार, हत्या प्रकरणात कॉलेजचे तत्कालीन प्रिंसिपल संदीप घोष यांच्यावर मोठी कारवाई करण्यात आली आहे. इंडियन मेडिकल असोसिएशनने घोष यांचे सदस्यत्व निलंबित केले आहे.

आयएमए मुख्यालयातून राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. आर व्ही अशोकन यांनी एक समिती स्थापन केली होती. आईएमए कोलकाता शाखेचे घोष हे उपाध्यक्ष होते. त्यांचे सदस्यत्व निलंबित करण्याचा निर्णय समितीने घेतला आहे.

सीबीआयने घोष यांची पॉलिग्राफ टेस्ट घेतली होती. याच्या दुसऱ्याच दिवशी ही कारवाई करण्यात आली आहे. कोलकाता येथील प्रशिक्षणार्थी डॉक्टरच्या बलात्कार-हत्येप्रकरणी विद्यार्थी संघटनांनी काढलेल्या निषेध मोर्चानंतर भाजपने आज 12 तासांच्या बंगाल बंदची हाक दिली होती. बंददरम्यान अनेक जिल्ह्यांमध्ये पोलिस आणि भाजप समर्थकांमध्ये हाणामारी झाली आहे. अनेक नेते-कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले आहे.

भाटपारा येथे भाजप नेते प्रियंगू पांडे यांच्या गाडीवर गोळीबार झाला. टीएमसीच्या सुमारे 50-60 लोकांनी हल्ला केला. वाहनावर 6-7 राउंड फायर करण्यात आले आणि बॉम्ब फेकण्यात आले. चालकासह दोघांना गोळ्या लागल्या आहेत. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी तृणमूल छात्र परिषदेच्या 27 व्या स्थापना दिन कार्यक्रमात भाजपवर एआयचा वापर करून आपली बदनामी केल्याचा आरोप केला आहे.

# गुजरातमध्ये पुरामुळे 15 जणांचा मृत्यू

## 23 हजार लोकांची सुटका; 50 ट्रेन रद्द

**वृत्तसंस्था**
**राजकोट**



गुजरातमधील जामनगरमधील पोलीस चौकी पुरात वाहून गेली. रस्त्यांवर डझनभर वाहने पाण्यात बुडाली. गुजरातमध्ये मुसळधार पाऊस आणि पुरामुळे गेल्या तीन दिवसांत 15 जणांचा मृत्यू झाला आहे. राजकोट, आनंद, मोरबी, खेडा, वडोदरा आणि द्वारका येथे लष्कर तैनात करण्यात आले आहे. आर्मी-एनडीआरएफने मिळून 23 हजार लोकांना सुरक्षित स्थळी हलवले आहे.

50 ट्रेन रद्द करण्यात आल्या आहेत. अहमदाबाद, राजकोट, बोटाड, आनंद, खेडा, महिसागर, कराची आणि मोरबी येथील प्राथमिक-माध्यमिक शाळा आणि महाविद्यालये बंद करण्यात आली आहेत. बुधवार आणि गुरुवारी सौराष्ट्र आणि कच्छमध्ये जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. उत्तर प्रदेशातही लखनऊ-आग्रासह 10 जिल्ह्यांत पाऊस पडत आहे. वाराणसीमध्ये एवढा पाऊस झाला की रस्त्यांवर उभी असलेली वाहने पाण्याखाली गेली. गेल्या 24 तासात 40 जिल्ह्यांमध्ये 4.7 मिमी पाऊस झाला आहे. बलियातील सरयू नदी धोक्याच्या चिन्हावरून 1 मीटरने वाहत आहे.

सरकारी आकडेवारीनुसार गुजरातमध्ये पावसाचा कोटा पूर्ण झाला आहे. कच्छ, सौराष्ट्र आणि दक्षिण गुजरातमध्ये पावसाची वार्षिक सरासरी 100 टक्के ओलांडली आहे. राज्यातील 76 धरणे आणि तलाव 100 टक्के भरले आहेत.

सौराष्ट्र-कच्छमध्ये 2 दिवस पावसाचा रेड अलर्ट आहे. याशिवाय इतर जिल्ह्यांतही पावसाचा जोर कायम राहणार आहे. वारा 40-60 किमी/तास वेगाने वाहू शकतो. अनेक जिल्ह्यांमध्ये विजांचा इशाराही देण्यात आला आहे. जम्मू-काश्मीरच्या रामबनमध्ये सोमवारी ढगफुटीनंतर बेपत्ता झालेल्या 5 जणांना शोधण्यासाठी बचावकार्य सुरू आहे. उत्तर प्रदेशात गेल्या 24 तासांत 4.7 मिमी पावसाची नोंद झाली आहे.

# न्यूयॉर्कच्या इंडिया परेडमध्ये घुमला महाराष्ट्र ढोलचा आवाज

**प्रतिनिधी**
**न्यूयॉर्क**



**न्यूयॉर्कच्या इंडिया परेडमध्ये सादरीकरण करणारे मराठी मंडळ डेट्रॉईटच्या शिलेदार ढोलपथकाचे वादक दिसत आहेत.**

न्यूयॉर्कच्या इंडिया परेड मध्ये मराठी मंडळ डेट्रॉईटच्या शिलेदार ढोल ताशा पथकाने आपल्या जोमदार सादरीकरणाने सर्वांची मने जिंकली. 15 ऑगस्ट नंतर येणाऱ्या रविवारी अमेरिकेत भारत दिन (इंडिया डे) साजरा करण्याची परंपरा आहे. यंदाच्या 42 व्या भारत दिनाचे औचित्य साधून न्यूयॉर्कच्या मॅनहटन प्रभागात आयोजित भारताबाहेरील सर्वात मोठा उत्सव उदंड उत्साहात साजरा झाला.

यावेळी काढण्यात आलेल्या मिरवणुकीत राममंदिर प्रतिकृतीसह विविध विषयांना गवसणी घालणाऱ्या पन्नासहून अधिक चित्ररथ आणि चाळीस बँड्स चा समावेश होता. संपूर्ण अमेरिकेतून एक लाखांहून अधिक भारतीय हा उत्सव अनुभवण्यासाठी न्यूयॉर्क मध्ये जमा झाले होते . रविवारी सकाळी अकरा वाजता सुरु झालेल्या या सुमारे दीड किलोमीटर लांबीच्या मिरवणूकीची तब्बल सहा तासांनी सांगता झाली. फेडरेशन च्या पदाधिकाऱ्यांसह प्रसिद्ध अभिनेते पंकज त्रिपाठी, सोनाक्षी सिन्हा, मनोज तिवारी यांनी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती लावली.डेट्रॉईटवरून एक हजार किमी अंतर पार करून न्यूयॉर्कला आलेल्या शिलेदार ढोलपथकाचे नेतृत्व मूळ नाशिककर असणाऱ्या प्रणव औंधकरने केले. प्रणवने ऋतुजा कांबळे, सुरेखा पोकळे, प्रांजली आढाव , साईनाथ जाधव, अमृता पळशीकर, अद्वय पळशीकर, आदित्य दांडेकर, अंकिता दांडेकर, युवान वायकोळे, विहान जोशी, यश घुले, मिहित जोशी, वारूथिनी चौगुले, अथर्व केदार, गुरुनाथ केदार-डोंगरकर, अर्चना केदार, आर्यन केदार डोंगरकर आदींच्या समर्थ साथीने साठहुन अधिक वादकांसह आसमंत दणाणून सोडला. उपस्थित भारतीयांसह उत्सव बघण्यास आवर्जून आलेले अमेरिकन्स व इतर देशांचे प्रेक्षक देखील "जय भवानी जय शिवराय" च्या घोषणामध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. जवळजवळ दीडशे अमेरिकन वाहिन्या व शेकडो ब्लॉगर्सनी सोहळ्याचे थेट प्रक्षेपण केले.


